# आमच्यो दहा देवता

१९९८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू. प्रवास
सं. क्र. ३५४



REFBK-0014268

साहित्य-रसमाला प्रकाशन

सदानंद चेंदवणकर

नियमित वाचा साहित्य-रस स्पर्धा नियमित सोडवा साहित्य

' साप्ता वाचा साहित्य-रस स्पर्धा

साहित्य- हिक नियमित वाचा साहित्य

वेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहिक नियमित वाचा सा

प्रकाशक: देवेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहिक नियमि

काशन संस्था प्रकाशक: देवेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' सा

स माला प्रकाशन संस्था दलाल 'साहि

डवा साहित्य-रस माला प्रक ाशक: देवेन्द्र

नियमित सोडवा साहित्य-रस माला प्रकाशन संस्था प्रक

साहित्य-रस स्पर्धा नियमित सोडवा साहित्य-रस माला प्रका

मित वाचा साहित्य-रस स्पर्धा नियमित सोडवा साहित्य-र

ाप्ताहिक ा साहित्य-रस स्पर्धा निय

हित्य-स्व नियमित वाचा साहित्य-रस

दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहिक नियमित वाचा साहित्य

ाशक: देवेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहिक नियमित

ान संस्था प्रकाशक: देवेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ता

३८८०८
म-२॥—
धपघ९
क्रमांक-
३५४

# आमच्या दहा देवता

: लेखक :

सदानंद चेंदवणकर

मूल्य : रुपये २

दा. क्र. २२८४
REFBK-0014268

साहित्य-रस माला प्रकाशन

-: प्रकाशक :-
श्री. देवेन्द्र दलाल,
साहित्य-रस माला
नीतिन मॅन्शन,
७ वी खेतवाडी, गिरगांव नं. ४

ऑक्टोबर १९६४

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

-: मुद्रक :-
लक्ष्मीबाई नारायण चौधरी,
निर्णयसागर प्रेस,
२६।२८, डॉ. वेलकर स्ट्रीट, मुंबई नं. २

-: प्राप्तिस्थळ :-
साहित्य-रस माला
बुकसेलर्स आणि पब्लिशर्स
२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर
मुंबई २

३७७०६ ग्रं.प्र.काल. ५।२।६५
३५८

# अर्पण पत्रिका

माझ्या

मातोश्री

सौ. भागिरथीबाई

यांना

सादर

अर्पण

—सदानंद चेंदवणकर

# लेखकाचे दोन शब्द

गेल्या नवरात्रांत मी दैनिक 'नवशक्ति'तून महाराष्ट्रांतील नऊ प्रसिद्ध देवतांची माहिती सचित्र अशी लेखरूपानें क्रमशः प्रसिद्ध केली होती. या माहितींत देवी महात्म्य, देवी संबंधीच्या पौराणिक कथा, तिथें जाण्याचे सहज सुलभ मार्ग, तेथलें वैशिष्ट्य, सण, उत्सव इत्यादि माहिती विशेष महत्त्वाची होती. अनेक भाविकांना ही माहिती आवडल्याचें त्यांनीं पत्ररूपानें, तर कांहींनी मजला प्रत्यक्ष भेटून कळविलें.

या देवींसंबंधीच्या लेखमालेनंतर मी थोड्याच दिवसांत महाशिवरात्रीच्या सुमारास बारा ज्योतिर्लिंगांची सचित्र माहिती लेखरूपानें लिहिली होती. हें सगळें लेखनकार्य चालू असतानांच 'नवशक्ति'तून 'आमचे मराठी प्रकाशक' ही गेली दीड वर्ष चाललेली लेखमालाहि चालू होती. या लेखमालेच्या निमित्तानें माझा साहित्य-रस मालेचे प्रकाशक श्री. देवेंद्र दलाल यांचा व त्याचे अन्य बंधु श्री. विनयकांत व श्री. उषाकांत यांचा परिचय झाला. प्रकाशक श्री. देवेंद्र दलाल यांनीं मजकडे 'अष्टविनायक', 'दहा देवता' व 'बारा ज्योतिर्लिंगें' या तीन लेखमाला पुस्तकरूपानें प्रकाशित करण्याचा आपला मनोदय प्रगट केला. आनंद वाटला.

परंतु लोणावळ्याच्या 'न्यू वे प्रेअर एडस'चे चालक आणि आपल्या तत्त्वज्ञानांच्या प्रभावानें पाश्चात्य पंडितांनाहि आकर्षित करून घेणारे सुप्रसिद्ध भारतीय तत्त्वज्ञानी स्वामी श्री विज्ञानानंदजी यांचे, 'बारा ज्योतिर्लिंगें' हे लेख पुस्तकरूपानें कुणी अन्य प्रकाशक प्रकाशित करीत नसतील तर आपण स्वतः ते प्रकाशित करीत आहोंत, अशा आशयाचें पत्र आलें आणि का कुणास ठाऊक! मी त्यांना त्या पुस्तकांसंबंधीचे सारे हक्कहि देऊन टाकले!! आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्यांनीं हस्तलिखित त्यांना दिल्यापासून अवघ्या महिन्याभरांतच पुस्तक छापून माझ्या हातांतहि दिलें. त्या पुस्तकाची संपूर्ण छपाई वाराणसी येथें झाली व काशीविश्वेश्वराच्या पिंडीवर पहिली प्रत ठेवण्यांत आली हें मी माझें सद्भाग्य समजतों.

अर्थात्‌च श्री. दलाल यांना तें पुस्तक मी देऊं शकलों नाहीं. परंतु त्यांनीं माझीं दोन पुस्तकें प्रकाशित केलीं. एक 'अष्टविनायक'-यंदाच्या गणेशोत्सवांत आणि दुसरें हें 'दहा देवता' यंदाच्या नवरात्रौत्सवांत. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें हें मी माझें कर्तव्य समजतों.

आमचे परमस्नेही श्री. दीनानाथ दलाल यांनीं मुखपृष्ठावरील सुंदर चित्र आपल्या कुंचल्यांतून उतरवून दिलें याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहें. निर्णयसागर छापखान्याचे व्यवस्थापक श्री. मोरे व फोरमन श्री. ठाकूर यांनीं स्वतः जातीनें या पुस्तकाच्या छपाईंत लक्ष घातलें, त्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें हें केव्हांहि योग्यच ठरेल.

**अंबिका निवास,**
आग्रा रोड, कुर्ला,
मुंबई ७०

—सदानंद चेंदवणकर

# शुभाशीर्वाद

माझे मित्र आणि मराठीतील एक प्रसिद्ध साहित्यिक श्री. सदानंद चेंदवणकर हे येत्या नवरात्रौत्सवांत महाराष्ट्रांतील दहा प्रसिद्ध देवतांचें माहितीपर असें पुस्तक आमच्या 'दहा देवता' या शीर्षकाखालीं प्रसिद्ध करीत आहेत याबद्दल मला अतिशय आनंद वाटतो.

वेळोवेळीं ते करीत असलेल्या सुकार्यास आणि त्यांनीं योजिलेल्या कामास माझा नेहमींच शुभाशीर्वाद असतो. आतांहि तो मनःपूर्वक देत आहे.

**पी. के. सावंत**

कृषिमंत्री, महाराष्ट्र राज्य

अनु. ३८७०९ वि: ... दि: ...
३५४

## —: अनुक्रमणिका :—

*


१ तुळजापूरची श्री देवी भवानी

२ कोल्हापूरची श्री अंबाबाई

३ काल्योंची श्री एकवीरा देवी

४ पुण्याची श्री चतुःशृंगी

५ वणीची श्री सप्तशृंगी


६ माहूरची श्री रेणुकामाता

७ मुंबापुरीची श्री महालक्ष्मी

८ वज्रेश्वरीची श्री वज्राबाई

९ कवळ्याची श्री शांतादुर्गा

१० गुजरातची श्री अंबाजी



श्री क्षेत्र तुळजापूरची देवी भवानी

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रं. शाखा प्रत

# तुळजापूरची देवी भवानी

आमचा भारत तीर्थक्षेत्रांची पावनभूमि आहे. महाराष्ट्रांत तर कितीतरी लहान मोठीं तीर्थक्षेत्रें आहेत. तीर्थक्षेत्रांनीं समृद्ध असलेल्या या महाराष्ट्रांत चार प्रमुख दैवतें आहेत. १ ) पंढरपूरचा विठोबा, २ ) कोल्हापूरची अंबाबाई, ३ ) जेजुरीचा खंडोबा, आणि ४ ) तुळजापूरची आई भवानी.

तुळजापूरची देवी भवानी ही एक शक्तिदेवता आहे. शक्तीची पूजा-अर्चा, उपासना, जप-जाप्य जगांतल्या कितीतरी प्राचीन संस्कृतींत प्राधान्य पावलेली होती आणि आहेहि! भारतांत तर ती प्रामुख्यानें दिसून येते. ही शक्तिदेवता जगत्‌जननी, जगदोद्धारक, भक्तविनाशिनी असून आपल्या भक्तांचें ती सर्वतोपरीनें संरक्षण करणारी आहे. ती त्रैलोक्याची स्वामिनी आहे अशी जगांत सर्वत्र समजूत आहे.

हिंदु पुराण ग्रंथांतून तर या शक्तिदेवतेचा उदो उदो केला जातो आणि आमच्या महाराष्ट्रांतील मराठमोळीं मनें तर या शक्तिदेवतेनें संपूर्ण काबीज केलेलीं आहेत. महाराष्ट्रांत आदि अंबेची, शक्तिदेवतेचीं साडेतीन पिठें सर्वत्र मान्यता पावलेलीं आहेत. पहिलें पीठ-तुळजापूरच्या तुळजा भवानीचें, दुसरें पीठ-अंबेजोईच्या योगेश्वरीचें, तिसरें पीठ-माहूर किंवा मातापूरच्या रेणुकामाईचें आणि चौथें अर्धे पीठ-कोल्हापूरच्या अंबाबाईचें किंवा करवीरच्या जगदंबेचें. या साडेतीन पीठांत पहिलें आणि आद्यपीठ म्हणून तुळजापूरच्या श्री तुळजा भवानीला मान दिला

जातो. आणि म्हणूनच कीं काय महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून तिचा गौरवशाली उल्लेख केला जातो. तुळजापूरच्या भवानीदेवीचें दैवत जागृत समजलें जातें. फार प्राचीन काळापासून तों आजतागायत या जागृत देवतेचा महिमा यत्किंचितहि कमी झालेला नाहीं, हेंच या देवतेचें वैशिष्ट्य आहे.

मध्य रेल्वेच्या सोलापूर स्टेशनापासून व त्याच रेल्वेच्या बार्शी लाईन फांट्यावरील कुर्डुवाडी-लातूर मार्गावरील येडशी या स्टेशनापासून प्रत्येकीं २८ मैलांवर हें क्षेत्र वसलेलें आहे. उस्मानाबादपासून तें अवघें १४ मैलांवर आहे. १९४१ च्या जनगणनेनुसार ७८१५ एवढी लोकवस्ती असलेल्या या क्षेत्रास वरील ठिकाणाहून नियमितपणें एस. टी. च्या व खाजगी बसेस् सुटत असतात. आई तुळजा भवानीच्या शुभ नांवावरूनच गांवास तुळजापूर हें नांव पडलेलें आहे. या गांवाचें पूर्वीचें नांव चिंचपूर आहे असें सांगण्यांत येतें. आज ज्या ठिकाणीं देवीचें मंदिर व बाजारपेठ आहे त्याठिकाणीं पूर्वीं चिंचेचीं दाट झाडें होतीं असें म्हणतात. फार जुन्या कागदपत्रांतून ठाणें-चिंचपूर असा उल्लेख सांपडतो. कांहीं का असेना पण हें गांव काळाच्या अनेक अवस्थांतूनहि चांगल्या स्थितींत टिकून नांवारूपाला आलेलें आहे. महाराष्ट्रांतील प्रमुख क्षेत्रांपैकीं हें एक प्रमुख महत्त्वाचें क्षेत्र आहे. येथें महाराष्ट्र, कर्नाटक, मराठवाडा, विदर्भ इ. भागाच्या कोनाकोपऱ्यांतील देवीचे भक्त भवानीमातेच्या दर्शनासाठीं येतात. कुणी ओहोर पायां पडण्यासाठीं म्हणजे लग्न झाल्यानंतर नवरा-नवरीनें जोडीनें दर्शन घेण्यासाठीं येतात. कुणी लग्न, मुंज, जावळ काढणें वगैरे संस्कार करण्यासाठीं येतात, तर कुणी नवस फेडण्यासाठीं येतात. अशा प्रकारें येथें बाराहि महिने यात्रिकांची रीघ लागलेली असते.

तुळजापूर हें गांव समुद्र सपाटीपासून २६३० फूट उंच असून तें बालाघाट डोंगराच्या एका पठारी कड्यावर वसलेलें आहे. या डोंगराचें पुराणग्रंथांतील जुनें नांव यमुनागिरी असें होतें. आज येथें पिण्याच्या पाण्याचे नळ, विजेचे दिवे, सिमेंट कॉंक्रिटचे व कांहीं ठिकाणीं डांबराचे रस्ते आहेत त्यामुळें हें गांव सुंदर, टुमदार व व्यवस्थित आहे.

तुळजापूरची आई तुळजा भवानी आज प्रत्येक मराठी माणसाचें श्रद्धास्थान झालेली आहे. तिच्या आशीर्वादासाठीं प्रत्येक मराठी माणूस तिच्या पवित्र चरणकमलावर नतमस्तक होण्यासाठीं धडपडत असतो. कृतयुगापासून तों कलियुगापर्यंत व मार्कंडेय ऋषिमुनींपासून रामायण महाभारतांतील रम्य प्रसंगांतून तों शिवकालीन राजेमहाराजांपर्यंत, मालोजीराव भोसल्यांपासून राजारामापर्यंत आणि सध्यांच्या भारताच्या संरक्षणमंत्र्यांपर्यंतहि सारे श्रेष्ठ आणि कनिष्ठ या भवानीमातेची उपासना-भक्ति करीत आलेले आहेत. खुद्द शिवाजीराजे व समर्थ रामदास स्वामी यांची हीच कुलदेवता होती. आज महाराष्ट्रांतील अनेकांची हीच देवी कुलदेवता आहे. भारताच्या कोनाकोपऱ्यांतून तिची उपासना, भक्ति, पूजा–अर्चा सतत चालू आहे. हीच भवानी जगत्‌जननी आहे व तिच्याच मर्जीनुरूप अखिल जगताचा सारा कारभार बिनबोभाट चालतो. आपलें रक्षण, संवर्धन तिच्याच कृपाछत्राखालीं चालू आहे व तिच्याच कृपाप्रसादानें आपलें जीवन सफल होणार आहे, अशी दृढ श्रद्धा बाळगणारे तिचे लाखों भक्त आहेत.

देवी तुळजा भवानीचें वर्णन अग्निपुराण, स्कंदपुराण आणि देवी भागवत या ग्रंथांतून आलें आहे. पुराणांत देवीविषयक कितीतरी कथा आहेत. या देवी भवानीचें पौराणिक नांव 'तुरजा.' प्राकृतांत

ती तुळजा बनली. देवीला 'तुळजा' हें नांव कसें पडलें याचें वर्णन 'सह्याद्रि' खंडांत 'अनुभूतीची तपस्या' या प्रकरणांत आलें आहे. 'तुळजा' हा मराठी शब्द संस्कृतमधील 'तुरजा' या शब्दापासून झाला असला तरी तो 'त्वरिता' 'या शब्दाचा बोधक आहे. अर्थात्' 'त्वरितादेवी' हीच तुळजादेवी आहे यांत संशय नाहीं. भक्तांचें संकट त्वरित दूर करणारी म्हणून तिला 'त्वरिता' असें म्हणतात.

तुळजापूर हें क्षेत्र कसें निर्माण झालें याबद्दलची पुढील पुराणकथा विशेषत्वानें प्रसिद्ध आहे.

कृतयुगांत कर्दम नांवाचे सुशील, सात्विक तपोनिष्ठ ऋषि होऊन गेले. त्यांना एक रूपसंपन्न नि सुशील पत्नी होती. तिचें नांव अनुभूति. हे ऋषि गृहस्थाश्रमी होते. त्यांचा संसार अतिशय सुखानें, समाधान-कारकपणें चालला होता. या सुखी संसारांत एका मुलाची भर पडून त्या संसाराची शोभा आणखीन वाढली. परंतु या संसाराचें सुखी जीवन फार काळ टिकलें नाहीं. लौकरच कर्दम मुनींनीं इहलोकाची यात्रा संपविली व अनुभूति उघडी पडली. तिनें सती जाण्याचा विचार केला, परंतु अल्पवयी मूल असलेल्या पुत्रवतीनें सहगमन करूं नये असें शास्त्रानें मार्गदर्शन केल्यामुळें तिनें तो निर्णय बदलला व तापसी जीवन जगण्याचें ठरविलें. पुत्रपालनाचें कर्तव्य तिनें चोख रीतीनें बजावलें व पुत्राला गुरुगृहीं सोंपवून ती तपश्चर्येसाठीं मेरू पर्वतावर निघून गेली. तपश्चर्येस तिनें आरंभ केला व ती मंदाकिनी नदीच्या कांठीं आश्रम बांधून राहूं लागली.

या सुंदरीची घोर तपश्चर्या चालू असतांनाच कुकूर नांवाचा दानवांचा राजा तिथें आला. या राक्षसाला वाटेल तें रूप घेण्याचा वर

होता. तो अनुभूतीच्या अप्रतिम सौंदर्यावर लुब्ध झाला. दुष्टवासनेनें त्याला ग्रासलें. आपण वाटेल तें करूं शकतों आणि आपण सर्वश्रेष्ठ आहोंत या अहंगंडानें मग्न असलेल्या कुकूरानें अनुभूतीला अविचारानें स्पर्श केला. तिची समाधि भंग पावली. तिनें दैत्याकडे रागानें पाहिलें. या दुष्टाला शाप द्यावा तर तपाचें पुण्य नाश पावेल, गप्प बसावें तर पातिव्रत्याचा भंग होईल या पेंचानें अनुभूति गोंधळून गेली. तिनें डोळे मिटून आपल्या उपास्यदेवतेचा धांवा केला व तिला या प्रसंगीं त्वरित येण्याचें पाचारण केलें. तेव्हां आदिशक्ति पार्वती भवानीच्या रूपानें तिथें धांवून आली. देवीनें अनुभूतीचें दुःख जाणलें व अष्ट-भूजारूप घेऊन कुकूराशीं युद्ध केलें.

युद्धांत देवीचा आपल्याला पराभव करतां येत नाहीं असें पाहून तो दैत्य निरनिराळीं मायावी रूपें घेऊं लागला. एका प्रसंगीं तर देवीला त्या दैत्याऐवजीं पांच फडा असलेला एक भयंकर नाग दिसूं लागला. देवीनें चार हातांनीं त्याच्या चार फडा दाबून टाकून पांचवी फडा तरवारीनें तोडून टाकणार इतक्यांत तो नाग नाहींसा झाला व आकाशांत लाल-लाल डोळे असलेले व करवतीसारखीं नखें असलेलें भयंकर गिधाड दिसूं लागलें. तें खालीं आल्याबरोबर देवीनें त्याचा एक पंजा तोडून टाकला. इतक्यांत तें गिधाड अदृश्य झालें व त्या ठिकाणीं अजस्र मस्तवाल रेडा दिसूं लागला. त्याचा एक पाय थोडासा अधू झाला होता व त्यांतून रक्त ठिपकत होतें. रेड्याचा रंग अमावास्येप्रमाणें काळा कुळकुळीत होता. त्याचीं शिंगें टोंकदार होतीं. डोळे अग्निस्फुल्लिंगाप्रमाणें धुमसत होते, व पहाणाऱ्याला तें भयानक वाटत होतें. खुरांनीं जमीन उकरीत, नाकानें भयकारी श्वासोच्छ्वास करीत तो मस्त महिष सिंहवाहिनी तुळजा-

देवीच्या अंगावर धांवून आला. देवीनें एक हुंकार देऊन तरवार उपसली व त्याची मान धडापासून वेगळी केली व त्याच्या रक्ताचा मळवट आपल्या भालप्रदेशावर लावला. अनुभूतीचें संकट अशाप्रकारें टळलें, दुष्टांचा नाश झाला. यावेळीं ही आदिशक्ति अनुभूतीसाठीं त्वरित धांवून आली म्हणून तिला 'त्वरिता' असें नांव पडलें. 'त्वरिता' या शब्दावरूनच पुढें 'तुरजा' हा शब्द आला व 'तुरजा' शब्दावरूनच 'तुळजा' हा शब्द रूढ बनला आहे.

अनुभूतीचें संकट देवीनें अशा प्रकारें दूर केल्यावर अनुभूतीनें देवीची प्रार्थना केली, 'हे त्वरितादेवी, माझें संकट तूं जसें त्वरित दूर केलेंस तसेंच अनेक भक्तांचीं संकटें निवारण्यासाठीं तूं याच रूपानें मृत्यु–लोकांत येऊन रहा. देवीनें अनुभूतीची मागणी मान्य केली व तिनें या यमुनाचलाच्या दरींत जें ठाण मांडलें आहे तें अगदीं आजतागायत. सध्यां यमुनाचल पर्वताला बालाघाट असें नांव आहे. या डोंगराच्या एका पठारी कड्यावर समुद्र सपाटीपासून २६३० फूट उंचीवर तुळजापूर हें स्थान आहे. अनुभूतीची ही वर दिलेली कथा स्कंदपुराणाच्या 'सह्याद्रि खंडांत' दिलेली आहे.

तुळजापूरच्या देवीला 'तुकाई' व 'रामवरदायिनी' अशीं पण नांवें आहेत. प्रभु रामचंद्र सीतेच्या शोधार्थ याच मार्गानें लंकेकडे गेल्याचें वर्णन स्कंदपुराणांत आलें आहे. त्याच प्रसंगीं या देवीनें प्रभूंना दर्शन दिलें. यमुनाचल पर्वतावरील ज्या शिळेवर बसून देवीनें रामचंद्रास लंकेचा मार्ग दाखविला ती शिळा 'घाटशिळा' या नांवानें प्रसिद्ध आहे. प्रभू रामचंद्रांना या देवीनें वर दिला म्हणून देवीस रामवरदायिनी हें नांव मिळालें आहे. याच देवीच्या कृपेनें रामचंद्राच्या हातून रावणाचा

वध झाला व त्यांना सीता पुन्हां परत मिळाली. या विषयाचें अत्यंत रसभरीत वर्णन काव्यमय भाषेंत 'सह्याद्रि खंडांत' आहे.

याच देवीनें आपल्या अंशांतून मातंग नामक एका असुरास ठार मारलें म्हणून या देवतेला 'मातंगी' असेंहि म्हणतात.

प्रभू श्री रामचंद्रापूर्वी या देवीनें धर्माचें संगोपन व संवर्धन करणाऱ्या क्षत्रिय राजांना आशीर्वाद देऊन सिंहासनारूढ केल्याचीं अनेक उदाहरणें पुराणांत आहेत. धृतराष्ट्र अशा सुरथ राजानें मेधा ऋषीच्या उपदेशावरून देवीची उपासना केली. आणि देवीकडून "स्वराज्यं प्राप्स्यसे भवान्" हा आशीर्वाद घेतला आणि राज्य प्राप्त करून घेतलें असा उल्लेख दुर्गा सप्तशतींत आहे.

रामायणाप्रमाणेंच महाभारतांतहि देवीचा उल्लेख प्रामुख्यानें आढळतो.

पुराणकालाप्रमाणेंच इतिहासकालांतहि अनेक क्षत्रिय राजांनीं आणि सरदारांनीं देवीला आत्मसमर्पण करून देवीच्या आशीर्वादानें धर्मरक्षणाचें पवित्र कार्य केल्याचें दिसून येतें.

परमार वंशांतील जगदेव राजानें तर आपलें मस्तक एकदांच नव्हे तर चांगलें सात वेळां देवीला अर्पण केलें असा उल्लेख आहे. देवी प्रसन्न होऊन प्रत्येक वेळीं जगदेवाला उठवीत असे आणि त्याच वेळीं तो आपलें मस्तक तिच्या चरणांवर वाहात असे.

तुळजाभवानीच्या मूर्तीचा ऐतिहासिक मागोवा घेत गेल्यास दहाव्या शतकापर्यंत मूर्तीची माहिती मिळूं शकते. शके ११२६ च्या एका ताम्रपटांत 'पाटलाची कुलस्वामिनी तुकाई' असा उल्लेख आहे. नंदी नांवाचा ब्राह्मण तुळजापूराला तपश्चर्या करीत होता, त्याला नृसिंह

सरस्वतीकडे जाण्याची आज्ञा झाली असा गुरुचरित्रांत उल्लेख आहे. याचा अर्थ एवढाच कीं, त्यावेळींहि देवीचें स्थान तिथें होतें. एका यादवकालीन शिलालेखांत तर "परशुराम गोसावी दर्शनासि गेले. दान करावें असें आलें" असा उल्लेख आहे. शके १२२० मधील हा लेख असल्यानें यादवकालींहि हें देवस्थान होतें हें यावरून दिसून येतें.

सोळाव्या शतकांत हें दैवत एकनाथांचें स्फूर्तिस्थान होतें. नाथांच्या कालांतील तपस्वी ग्रंथकार त्र्यंबकराज यांनीं देवी भवानीच्या पायाशीं बसून सोळा दिवस अनुष्ठान केलें होतें.

उत्तरेकडून दक्षिणेकडे आलेल्या भोंसले घराण्याची तर ही देवता कुलस्वामिनी होती. शिवाजीचे आजोबा मालोजीराजे भोंसले यांना या तुळजा भवानीच्या कृपेनें द्रव्यप्राप्ति झाली होती. मालोजींना दैवी कृपेनें फक्त धनच प्राप्त झालें असें नाहीं तर त्यांच्या वंशांत शककर्ता अवतार घेईल असा आशीर्वादहि प्राप्त झाला.

शिवाजी महाराजांच्या वडिलांची तर या देवीवर गाढ श्रद्धा होती.

छत्रपति शिवाजी महाराजांच्या मुळें हें दैवत १७ व्या शतकांत विशेष ख्यातनाम पावलें. शिवाजी हे भवानीचे प्रत्यक्ष पुत्रच होत असें त्याकाळीं उभा महाराष्ट्र मानीत होता. शिवबांची सुद्धां या देवीवर नितान्त श्रद्धा होती व त्याच श्रद्धेच्या सहाय्यानें त्यांनीं मोंगलासारख्या बलाढ्य साम्राज्याला टक्कर देऊन मराठ्यांचें राज्य चुटकीसरसें स्थापन केलें. आपली माता जिजाई व गुरु दादोजी कोंडदेव यांच्या तोंडून आपल्या या कुलस्वामिनीच्या अनेक कर्तृत्व-कथा शिवबांनीं ऐकल्या होत्या. छत्रपतींच्या चरित्रांतील प्रसंगांतून तर भवानीदेवीचे विपुल उल्लेख येतात. अफझलखानानें शिवाजीवर स्वारी करतांना तुळजापूर क्षेत्र लुटलें

व मंदिराला उपद्रव दिला. पुढें शिवाजीला दृष्टान्त झाल्यावर त्यानें याच देवीची दुसरी मूर्ति मुद्दाम घडवून ती आपल्या नित्यदर्शनासाठीं प्रतापगडावर स्थापन केली.

छत्रपति शिवाजींना याच देवीनें बिकट प्रसंगीं तलवार दिली. श्री शिवाजींच्या अंगांत येऊन ही देवी महाराजांना नेहमीं राज्यकार-भारांत मार्गदर्शन करीत असल्याचे उल्लेख आहेत. शिवाजीराजे कोण-त्याहि कार्यप्रसंगीं श्री तुळजा आईचें नामस्मरण करीत असत. नंतर त्यांच्या अंगीं श्रीचा आविर्भाव होत असे व संकटाची जशी तीव्रता असेल त्याप्रमाणें देवीकडून संपूर्ण खुलासा होत असे. अफझलखानाच्या संकटाच्या वेळीं तर देवीनें शिवाजींना तलवार भेट दिली होती.

शिवाजी काळांतलेच प्रसिद्ध संत स्वामी श्रीसमर्थ रामदास यांचा तर देवीकडे कमालीचा ओढा होता. एकनाथांचें भावार्थ ‘रामायण’ व त्र्यंबकराजांचा ‘बालबोध’ या दोन ग्रंथांचा रामदासांच्या वैचारिक घडणींत मोठा वांटा आहे. या दोन्हीं ग्रंथांत देवीचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणें श्रीधर स्वामींचे ‘रामविजय’ या ग्रंथांत तुळजापूरचे उल्लेख असून, त्यांत रामवरदायिनी तुकाईची गोष्ट पण देण्यांत आलेली आहे. ही देवी श्रीसमर्थांच्या घराण्याचीहि कुलदेवता होती. समर्थांच्या वडिलांनीं समर्थांसाठीं म्हणून तुळजापूरच्या भवानीला कांहीं नवस केला होता. त्या नवसाची फेड करावयाचें तसेंच राहून गेलें होतें. पुढें त्या नवसाची फेड समर्थांनी प्रतापगडीं जाऊन केली.

शिवछत्रपतींच्या यशापाठी भवानी देवीचा हात आहे असें मोंगलांनाहि पटलें होतें. तेव्हां शिवाजीचा नायनाट करावयाचा म्हणजे प्रथम या देवीचा नाश केला पाहिजे असें अफझलखानाचें मत होतें. तेव्हां त्यानें

देवीची ही मूर्ति हस्तगत केली व तिचे तुकडे तुकडे केले; पण या कृत्यानें त्याची भीति नष्ट होण्याऐवजीं आणखीन वाढली आणि म्हणूनच कीं काय त्यानें या तुकड्यांना जात्यांत घालून भरडले होते, असा उल्लेख सभासद बखरींत सांपडत असला तरी प्रसिद्ध इतिहासकारांना ती गोष्ट मान्य नाहीं. तुळजापूरच्या देवीचा विध्वंस करण्यासाठीं अफझलखान आला होता, परंतु भक्तांनीं नि पुजाऱ्यांनीं मूर्ति लपविली असें अनेकांचें ठाम मत आहे.

मराठ्यांच्या दरबारांतील अनेक कागदपत्रांतून "हें राज्य श्रीच्या वरदें निर्मिलें" अशी स्पष्ट कबुली तत्कालीन राज्यशासकांनीं दिली आहे.

शिवाजीप्रमाणेंच छत्रपति शाहू महाराज, रामराजा, पेशवे घराण्यांतील राधाबाई, काशीबाई, आनंदीबाई इ० स्त्रिया, शूरसेनानी मुधोजी निंबाळकर, दमाजी गायकवाड, महादजी शिंदे आणि दानशूर महिला अहिल्याबाई होळकर इ० नीं या स्थळाला भेट देऊन आपापल्या कारकिर्दींत हें क्षेत्र वैभवी थाटांत जोपासलें असे स्पष्ट उल्लेख कागदोपत्रीं आढळतात.

नेपाळच्या क्षात्रेय राजांचीहि ही देवता कुलदैवत आहे. राजे सिद्धनृसिंह यांनीं इ. स. १६२० मधें तुळजादेवीची मूर्ति तिथें स्थापन केली. 'तुळजाईका मंदिर' म्हणून तें देऊळ नेपाळांत आज प्रसिद्ध आहे.

तुळजापूर हें क्षेत्र प्रथम बरिदशाहींत, मग आदिलशाहींत, मोंगलांच्या सत्तेंत व शेवटीं हैदराबादच्या निजामच्या राज्यांत होतें. निजामशहानें महादजी नाईकनिंबाळकर यांचे पुत्र रंभाजी यांना संस्थानांतून जी जहागीरी दिली तींत हें क्षेत्र समाविष्ट होतें. या घराण्यांतील जानोजी व रावरंभा यांच्या अंमलांत या क्षेत्राची सर्वतोपरीनें सुधारणा झाली. त्यांच्याच

कारकिर्दीत आजच्या मंदिराच्या बांधणीपैकीं बराच भाग बांधला गेला. १९४८ मध्यें हें क्षेत्र भारतीय संघराज्यांत आणि भाषावार प्रांतरचने-नंतर मुंबई राज्यांत आणि त्यानंतर महाराष्ट्र राज्यांत आलें.

विसाव्या शतकांतहि देवीच्या भक्तीची प्रचीति अनेक भक्तांना आलेली आहे. देवीच्या मंदिरावर सुंदर शिखर बांधणारे बीडचे सावकार ठिगळे प्रसिद्ध आहेत. देवीकृपेनें त्यांना मोहरांनीं भरलेले हंडे सांपडले व त्यांतूनच त्यांनीं दोन भव्य शिखरें उभारलीं. पदोपदीं देवीभक्तांना देवीच्या भक्तीची प्रचीति येते.

तुळजापूरच्या भवानीदेवीचें देऊळ गांवच्या पश्चिमेस बालाघाट डोंगराच्या रम्य दरींत वसलेलें आहे. बस स्थानकापासून मुख्य रस्त्यानें देवीच्या देवळाकडे जावें लागतें. देवळाच्या प्रवेश द्वारापाशीं नारळ–फुलांचीं, कुंकू–अबीराचीं, फोटो–फ्रेम्सचीं दुकानें आहेत. गांवांतून मुख्य मंदिरापर्यंत जाण्यासाठीं सुमारें ९० पायऱ्या उतराव्या लागतात. प्रथम महाद्वार लागतें व त्यावरील शिल्प हेमाडपंती आहे. थोड्या पायऱ्या उरल्यावर पहिल्या टप्प्यावर एक तीर्थ लागतें त्याचें नांव कल्लोळतीर्थ. देवी या स्थळीं रहाण्यास आल्यावर ब्रह्मदेवांनीं स्वतः हें तीर्थ उत्पन्न केलें तेव्हां पृथ्वीवरील सर्व पवित्र उदकें या तीर्थास धांवून आलीं. त्यांचा एकच कल्लोळ येथें झाला म्हणून या तीर्थास 'कल्लोळतीर्थ' असें म्हणतात. या तीर्थापासून थोडें खालीं उतरल्यावर गोमुख तीर्थ लागतें. येथें दगडी गाईच्या मुखांतून थंड पाण्याची सतत धार खालीं पडत असतें. येथून बऱ्याच पायऱ्या खालीं उतरून गेल्यावर भवानीच्या मुख्य देवळाचा प्राकार दिसूं लागतो. देवीच्या देवळाच्या पायऱ्यांवर रुपये ठोकून बसविल्याच्या खुणा आहेत. देऊळ कांहींसें ठेंगणें आहे.

श्री देवी तुळजा भवानीची मूर्ति स्वयंभू आहे. ती काळ्या गंडकी शिळेची घोटीव आणि गुळगुळीत असून, अत्यंत रेखीव व सुंदर आहे. ती प्रभावळीसह सुटी आहे. पक्की बसविलेली नाहीं. मूर्ति अष्टभुजा असून तिनें आपल्या हातांत विविध शस्त्रें धारण केलीं आहेत. उजवीकडील हातांतून तिनें त्रिशूळ, बिचवा, बाण व चक्र आणि डावीकडील हातांतून राक्षसाची शेंडी, पानपात्र, धनुष्य आणि शंख या वस्तू घेतलेल्या आहेत. आपल्या डावीकडील एका हातानें तिनें महिषासुराची शेंडी पकडली असून उजव्या हातानें त्याच्या छातींत त्रिशूळ खुपसला आहे. पुढें आलेल्या या कोरीव मूर्तीच्या पायाखालीं रेड्याचें शीर आहे व त्या रेड्याच्या अंगांतहि त्रिशूळ खुपसल्याचें दिसतें.

देवीच्या उजव्या खांद्याजवळ चंद्र आणि डाव्या खांद्याजवळ सूर्य कोरलेला आहे. भवानीच्या उजव्या बाजूलाच सिंह कोरलेला असून त्याच्या बाजूला पुराण सांगणारी मार्कंडेय ऋषींची मूर्ति आहे. त्याच-प्रमाणें डावीकडे अनुभूतीनें उलटें टांगून घेऊन तपश्चर्या करीत असल्याचें चित्र दिसतें. देवीच्या मस्तकावरील मुकुटांत मध्यभागी शिवलिंग आहे. अशी ही मूर्ति चल असून वर्षांतून तीन वेळां मंचकी शयन करते. जो भक्त या देवीची मनोभावें प्रार्थना करतो त्याच्या शत्रूचा, वैऱ्याचा देवी तत्परतेनें संहार करते असा समज आहे. आश्विन शुद्ध, पौष शुद्ध प्रतिपदा ते अष्टमी व भाद्रपद वद्य अष्टमी ते अमावास्या अशी देवीचीं तीन शयन वर्षें ठरलेलीं आहेत. इतर सर्वकाळीं ती अष्टौप्रहर जागृत असते व भक्तांचीं गाऱ्हाणीं ऐकत असते. निद्रासमयास देवीस दोन बळींची आवश्यकता असते. एक निद्रा घेण्यापूर्वी व दुसरा निद्रा पूर्ण झाल्यावर. निद्रेची वेळ झाली कीं, देवीला सिंहासनावरून उचलून शयनगृहांत

पलंगावर निजविण्यांत येते. देवी निद्रीत अवस्थेंत असतांना पूजा, अर्चा इ. सारे व्यवहार संपूर्णतः बंद असतात. निद्रा संपली कीं, शयनगृहांतून पुन्हां उचलून तिला सिंहासनावर चढवितात.

गाभाऱ्यांत तुळजा भवानीची मूर्ति पश्चिमेला आहे तर मूर्तीच्या समोरच सभामंडप ओलांडून गेल्यावर पूर्वेला भवानी शंकराची वरदमूर्ति आहे. शिवशंकराचें स्वयंभूपिंड, पाठीमागें नंदी व नंदीवर भवानी शंकराचा मुखवटा व त्यावर पंचनागाचा उभारलेला फणा, सतत समोर तेवत असणारा नंदादीप व या सर्व वस्तूंसाठीं छोटासाच गाभारा असें हें मंदिर आहे. देवीची मूर्ति व शिवशंकराची मूर्ति यांच्यामधें एका अंगाला एक खोली आहे, त्या खोलीला देवीचें शयनघर म्हणतात. देवी निद्रा-सुख येथेंच घेते. मंदिराचें पाठीमागचें प्रवेशद्वारहि निसर्गसंपन्न आहे. त्यामधून पायऱ्या उतरून थेट खोल दरींत सहज जातां येते. शिवाजी-राजे याच दरवाजांतून येत असत. मंदिराच्या डाव्या बाजूनें ओवऱ्यांत कोल्हापूरच्या महाराजांनीं देवीला दिलेला हस्तीदंती पलंग आहे. त्याच्या शेजारच्या ओवरींत देवीची छबिन्याची लांकडीं वहानें—सिंह, हंस, मयूर, नंदी वगैरे—ठेवलेलीं आहेत.

मंदिराच्या परिसरांत श्री नृसिंह, खंडेराय, चिंतामणी इ० देवतांच्या मूर्ति असून देवळाच्या दक्षिणेस यमाईदेवी, ईशान्येस मातंगीदेवी आहे. आजुबाजूला भारतीबुवा, गरीबनाथबुवा, अरण्यबुवा यांचे मठ, पापनाशीनी, तीर्थ, राजाची बाग, घाटशीळ इ० प्रेक्षणीय स्थळें आहेत. भारतीबुवांच्या मठांत देवीची मूर्ति आहे. तिथें भारतीबुवा व भगवती एकेकाळीं सारीपाट खेळत असत असें म्हणतात. याशिवाय मंकावती, अमृतकुंड, सूर्यकुंड, नागझरी इ० तीर्थें आसपास आहेत. तुळजापूरच्या

देवीच्या देवळाचा बांधणीशी राजा रावरंभा निंबाळकर यांच्याशी संबंध येतो. देवीचें मंदिर २००० वर्षांपूर्वीचें असावें असा तज्ज्ञांचा अंदाज असून मूळ वास्तूशिल्पांत वरचेवर बदल करण्यांत आलेला आहे. मंदिराचें शिल्प अत्यंत प्राचीन असून तें हेमाडपंती पद्धतीचें आहे. मुख्य सभामंडप, आणि मंदिराचा गाभारा हेमाडपंती स्वरूपाचा असून या गाभाऱ्या-भोंवतीं दगडी आधार देऊन आजचें सुंदर मंदिर सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं बांधलें आहे. मंदिरावर हत्ती, घोडे, मोर, माकडें, यक्ष, किन्नर, गंधर्व, देवदेवता इ० अनेक मूर्ति आहेत. वेलबुट्टी, जाळ्या व नक्षीकाम बहारदार आहे. मंदिरावरचें सुवर्ण शिखर बीडचे प्रसिद्ध सावकार श्री. ठिगळे यांनीं सुमोरें शंभर वर्षांपूर्वीं उभारलें आहे. त्यांनींच गोपूर बांधून त्यावर सुवर्ण-कळस चढविला. त्यावेळीं या बांधकामास ४० हजार रु. खर्च आला.

मंदिराच्या दर्शनीं बाजूला होमकुंड आहे. या होमकुंडावर देवालयाच्या शिखराप्रमाणें शिखर बांधलेलें आहे. भाविक या ठिकाणीं नैवेद्य ठेवतात. नवरात्र उत्सवांत तिथें नवचंडीचें हवन होतें. खंडेनवमीस येथें सबंध बोकडाची आहुति दिली जाते. होमकुंडासभोंवतीं व मुख्य मंदिरासभोंवतीं विस्तीर्ण पटांगण असून त्यांत दगडी फरशी बसविलेली आहे. होम-कुंडावर दर्शनीं बाजूला देवीच्या पादुका ठेवलेल्या आहेत. होमकुंडावर असलेल्या दोन दीपमाळा शिवाजी महाराजांनीं बांधल्या आहेत, असें म्हणतात.

श्री जय तुळजा भवानीची दरदिवशीं चार वेळां षोडशोपचारेंपूजा करण्यांत येते. त्यावेळीं देवीचे भक्तगण उपस्थित असतात व पूजोत्तर दर्शनानें कृतकृत्य होतात. सकाळींच देवीची जी पूजा केली जाते तिला चरणतीर्थ पूजा असें म्हणतात. दुपारीं देवीची महापूजा केली

जाते, सायंकाळीं पण धूपारती-महापूजा केली जाते आणि रात्रीं प्रक्षाळण पूजा होते. देवीला पांच वेळा नैवेद्य दाखविला जातो.

ही भवानीमाता नवसास पावते असा जुना समज आहे. त्यामुळें पंचामृत, ओटी, लोटांगणें, वेणीदान, पाळणा हे देवीचे नवस पूर्ण करण्यासाठीं नेहमींच या तुळजापूरक्षेत्रीं भाविकांची गर्दी असते. या मंदिरांत सर्व धर्मियांना प्रवेश आहे. पूजेचा हक्क आहे. मुसलमान लोकहि देवीचे अनन्य भक्त आहेत. ते तिच्यावर श्रद्धा ठेवतात. तिला नवस करतात व पूजा बांधतात. अशी ही जगदंबेची यात्रा वर्षभर जरी असली तरी देवीची मुख्य यात्रा आश्विन शुद्ध दशमी, आश्विन पौर्णिमा आणि चैत्र पौर्णिमेला भरते.

त्याचप्रमाणें दर मंगळवारीं, प्रत्येक पौर्णिमेला, पौर्णिमेच्या आदल्या दिवशीं व दुसऱ्या दिवशीं, गुढीपाडवा व बलिप्रतिपदा या दिवशीं रात्रीं देवीचा छबिना निघत असतो. या छबिन्यासाठीं घोडा, मोर, सिंह अशीं वेगवेगळीं वहानें तयार करून ठेवलेलीं असतात व त्यावर देवीच्या पादुका ठेवतात. त्या पादुकांवर सुंदर अंबारी असते. या छबिन्याची फेरी फक्त देवळाच्या अंगणांतच होते.

देवीच्या सर्व उत्सवांत नवरात्रौत्सवाला अधिक महत्त्व आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत हा उत्सव चालतो. प्रतिपदेच्या दिवशीं गांवचा कुंभार तीन घागरी आणून गोमुखतीर्थाजवळ ठेवतो. अधिकारी, सेवेकरी मग ते घट वाजत गाजत खालीं आणतात. पहिला घट सभामंडपांत ईशान्येला स्थापला जातो. दुसरा देवासमोरच्या शिवमंदिराच्या मागच्या त्रिशुळाच्या ओवरींत व तिसरा मातंगीच्या मंदिरांत. नंतर सप्तशतीचें पाठ व नवचंडीचें हवन सुरू होतें. खंडेनवमीस पूर्णाहूति

होते. दशमीला देवी शिलंगणाला निघते. त्यावेळीं मूर्तीच्या अंगाभोंवतीं कापडाची धिंडे लपेटतात. त्यावर वस्त्राचा पिळा करून आवळून बांधतात. त्यावेळीं तुफान गर्दी लोटल्यामुळें मूर्तीला इजा पोचूं नये म्हणून अशी खबरदारी घ्यावी लागते. कर्नाटकांत जसा म्हैसूरचा दसरा तसा महाराष्ट्रांत तुळजापूरचा दसरा साजरा केला जातो. प्रत्येक उत्सवाच्या वेळेस देवीला मोत्यांचा हार, पुतळ्यांच्या पंचरत्नी माळा, गळसऱ्या, चंद्रहार, जवमाळा, चिंचपेट्या, वाघनखांचे ताईत, ठुशा, बाजुबंद, केकतकेवडे, गोंडे, राखड्या, बेलवाळ्या, पैंजण, कुड्या, गोठ, पाटल्या, तोडे, तोरड्या इ. अलंकारांनीं सजविलें जातें त्यावेळीं तिचें रूप नयनमनोहर दिसतें.

देवीच्या नित्य सेवेचे वेगवेगळे अधिकारी आहेत त्यांना बजाजीबुवा, चिलोजीबुवा, बाकोजीबुवा, पलंगोजीबुवा अशीं खास नांवें आहेत. मंदिराचीं दारें खिडक्या उघडायच्या—लावायच्या, नैवेद्य दाखवायचा व नंदादीप तेवत ठेवायचा हे बजाजीबुवाचें काम, देवीला नटवायचें, भरवायचें, तिचे अलंकार संभाळायचे हें चिलोजीबुवाचें काम, देवळांत पाणीपुरवठा करणें व दिवाबत्ती करणें हें बाकोजीबुवाचें काम व स्वच्छता नि शेजघराची व्यवस्था जो करतो त्यास पलंगोजीबुवा असें म्हणतात.

तुळाजापूरची अशी ही देवी भवानी, महाराष्ट्राची कुलस्वामीनी, प्रभु रामचंद्राची वरदायिनी, शिवछत्रपतींची स्फूर्तिदायिनी स्वतंत्र भारताला उत्कर्षाप्रत नेवो हीच प्रार्थना तिचे भक्त हरहमेशा करतात.

# कोल्हापूरची श्री अंबाबाई

आमच्या महाराष्ट्रांत कोल्हापूर हें एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र गणलें जातें. “दक्षिणेकडील काशी” असा या शहरासंबंधीचा मोठा गौरवपूर्ण उल्लेख पुराणकथामधून सांपडतो. या दक्षिण काशीची अधिष्ठात्री देवता कर्नाटक व महाराष्ट्राची कुलस्वामिनी करवीरनिवासिनी महालक्ष्मी आई अंबाबाई ही होय. करवीरक्षेत्राला भेट देणारा प्रत्येक भाविक तर या महालक्ष्मीचें दर्शन घेतल्यावांचून मुळींच रहात नाहीं. देवीचें दर्शन डोळे भरून घेणाऱ्या भाविकास आपण कृतकृत्य झाल्याचें मोठेंच समाधान प्राप्त होतें. खुद्द करवीरवासीय तर आपलीच नव्हे, तर अखिल महाराष्ट्राची सर्वतोपरीनें संरक्षण करणारी देवता म्हणून तिची मनोभावें प्रार्थना करतात. दर दिवशीं पांचदां होणाऱ्या विविध आरत्यांनीं तिची आराधना केली जाते आणि त्या प्रसंगीं, “झडकरी पाव जगत्‌जननी” या मंगल ध्रुपद निनादांनी तिला वारंवार ओवाळलें जातें. दर शुक्रवारीं देवीच्या सन्मानाप्रीत्यर्थ छबिना काढला जातो आणि देवळासभोंवार फिरविल्या जाणाऱ्या देवीच्या पालखीवर पावलोपावलीं सुमनें उधळलीं जातात. नवरात्रौत्सव हा तर महालक्ष्मीचा सर्वांत मोठा सण. त्यावेळचा तेथील सोहळा अवश्य पहाण्याजोगा असतो.

श्री करवीर क्षेत्र हें अत्यंत प्राचीन पीठस्थान व क्षेत्र आहे. हिप्पोकूर हें त्याचें अति प्राचीन नांव. इ. स. १०६ ते १३० या कालांत सम्राट गौतमीपुत्र शातकर्णी अगर शातवाहन राजा दक्षिणेंत राज्य करीत असतां



कोल्हापूरची श्री अंबाबाई

या प्राचीन शहराचा इटलीची राजधानी जी रोम त्याच्याशी व्यापार व सांस्कृतिक दृष्ट्या संबंध होता. इजिप्तचा भूगोलज्ञ टॉलेमी यानेंहि हें शहर व्यापारीपेठ असल्याचा उल्लेख केला आहे. पुराणमताप्रमाणें या क्षेत्राला १०८ कल्पें झालेलीं आहेत. पण इतिहाससंशोधक इसवी सनाच्या आरंभापासून हें क्षेत्र प्रसिद्ध असल्याचें सांगतात. अठरा पुराणांपैकीं काशी खंड, पद्म पुराण, देवी भागवत, हरिवंश पुराण, स्कंद पुराण इत्यादि ग्रंथांत याचा उल्लेख सांपडतो व देवी अंबाबाईचें मंदिर व तेथील मूर्ति अत्यंत पुरातन असल्याचा दाखला व सनदा मिळतात. कामाख्या पीठाप्रमाणेंच या पीठाची–क्षेत्राची ख्याति आहे. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत हें कोल्हापूर श्रीयज्ञ शातकर्णी राजाच्या कारकिर्दींत आगीनें अक्षरशः उध्वस्त झालें होतें. त्यामुळें त्याचें महत्त्व सहाजिकच कमी झालें. त्यानंतर इसवी सनाच्या आठव्या शतकांत राष्ट्रकुटाच्या कारकीर्दींत महालक्ष्मीचें देवालय बांधलें गेलें व त्यामुळें त्याचें पुन्हां जें महत्त्व वाढलें तें अगदीं आजतागायत कायम आहे. प्राचीन काळीं कोल्हापूर शहर पंचगंगेच्या कांठावर ब्रह्मपुरी नांवाच्या टेकडीवर वसलेलें होतें.

कोल्हापूर या शहराला कोल्हापूर हें नांव कसें पडलें या संबंधीची कथा व्यासांनीं लिहिलेल्या ‘करवीर महात्म्य’ या ग्रंथांत दिलेली आहे. ती थोडक्यांत अशी—

पुराणकाळीं राक्षसांनीं पृथ्वीनिवासियांना आणि देवादिकांना त्राही भगवान करून सोडलें होतें. पृथ्वी त्यामुळें सहाजिकच कंपित झाली. त्रस्त, कष्ट व पिडा देणाऱ्या सर्व असुरांत ‘कोल्हासुर’ नामक दैत्य ज्येष्ठ नि श्रेष्ठ होता. सर्व असुरांचें नेतृत्व त्याच्याकडेच होतें. शेवटीं

भूमाता शेष याच्या विनंतीवरून भगवान् विष्णूंनी महालक्ष्मीचें रूप घेतलें व छळ करणाऱ्या त्या कोल्हासुराचा शिरच्छेद केला. या कोल्हासुरावर शंकर फार खूष होते. मरतां मरतां तो शंकरास अखेरची प्रार्थना करून म्हणाला, "महालक्ष्मीची मजवर जी कोपमय दृष्टि आहे ती संपूर्णपणें घालवून देऊन मला मुक्ति द्यावी असें आपण कांहीतरी करा." त्यानुसार शंकरानें देवीकडे प्रार्थना केली. देवी प्रसन्न होऊन कोल्हासुरास म्हणाली, "तुझें युद्ध व पश्चात्ताप पाहून मी संतुष्ट झालें आहे. तुला हवा तो वर माग." तेव्हां कोल्हासुरानें लोकहितार्थ वर मागितला कीं, "माझें शरीर गयातीर्थ व्हावें, त्याठिकाणीं सूर्य चंद्र असेतोंपर्यंत रुद्रादि देवांनीं वास करावा. तेथें जे श्राद्ध, तर्पण व पिंडदान करतील त्यांच्या पितरांस मुक्ति मिळावी. गयेप्रमाणेंच माझ्यावरील तीर्थाचें महात्म्य असावें. तेव्हां हें लक्ष्मी, तूं जें हल्लीं रूप धारण केलें आहेस, त्याच रूपानें माझ्याजवळ रहावेस. या क्षेत्रास अनंत नांवें आहेत; परंतु यापुढें 'कोल्हासुर' या नांवानें हें ठिकाण प्रसिद्ध व्हावें आणि माझी कीर्ति कायम रहाण्याकरितां कोहाळा फळ तूं या ठिकाणीं छेदावें!" दैत्याची ही मागणी देवीनें तात्काळ कबूल केली व तिच्या पादस्पर्शानें कोल्हासुर निष्पाप होऊन परंधामास गेला. ज्या ठिकाणीं हा प्रसंग घडला त्या ठिकाणास कोल्हासुर हें नांव पडलें व पुढें कालांतरानें कोल्हासुराचें 'कोल्हापूर' नांव रूढ झालें.

कोल्हापूरास करवीर असेंहि एक फार जुनें नांव असून तें अजुनहि प्रचारांत आहे. मेजर ग्रॅहॅम नामक एक पुराणवस्तू संशोधक नि इतिहासतज्ज्ञ यासंबंधी लिहितो कीं, "पृथ्वीवर जलप्रलय लोटला असतां महालक्ष्मीनें आपल्या कोमल करांनीं हा प्रदेश वरती उचलला व त्याचें

प्रलयापासून रक्षण केलें म्हणून या भागास ‘करवीर’ नांव प्राप्त झालें असावें.”

पुढें विशालाक्षी व भार्गव यांनीं आपली कन्या महालक्ष्मीच्या सेवेसाठीं वाहिली. कोल्हापुरांत मल्याळ तीर्थांत सोन्याचीं कमळें येत असत. या सुवर्ण कमळांचें रक्षण करण्यासाठीं महालक्ष्मीनें तिची नेमणूक केली. पण पाताळांतून राक्षसांनीं येऊन तीं सुवर्णकमळें चोरून नेलीं. तेव्हां अंबाबाईच्या दासीनें तीन वेळां पाण्यांत बुडी मारून त्या दैत्यांचा नाश केला व कमळें परत आणलीं. तेव्हां तिच्यावर महालक्ष्मी प्रसन्न झाली आणि तिनें दासीला त्र्यंबुली असें नांव दिलें. या त्र्यंबुलीचें ऊर्फ टेमलाईचें देवालय कोल्हापूरच्या पूर्वेस दीड मैलावर आहे.

कोल्हासुराच्या पाडावानंतर अनेक वर्षांनीं त्याचा मुलगा कामाक्ष यांस आपल्या पित्याच्या हत्येची वार्ता कळली तेव्हां तो अत्यंत रागावला व राक्षसांचा गुरु शुक्राचार्य यांच्याकडे गेला. शुक्राचार्यानें त्याला एक जादूची कांडी दिली. ही कांडी उजवीकडून डावीकडे फिरविली कीं, देवांच्या अथवा माणसांच्या समूहाचें रूपांतर मेंढ्यांत होत असे. ही कांडी घेऊन कामाक्ष कोल्हापूरास गेला व त्यानें अंबाबाईसह सर्व देवांना मेंढ्यांचें रूप दिलें. त्यावेळीं त्र्यंबुली एका वृद्ध स्त्रीचें रूप घेऊन शेणगोळा करीत होती. तिनें शेणीखालीं दगडांची रास भरून घेतली व कामाक्षास तिनें बुट्टी उचलण्याची विनंती केली. कामाक्षानें ती उचलण्यास मदत केली तेव्हां त्र्यंबुलीनें दगडांची रास त्याच्या अंगावर लोटून देऊन त्याला ठार केलें व त्याच्याजवळची जादूची कांडी घेऊन ती डावीकडून उजवीकडे फिरवून सर्व देवांना पुन्हां पूर्वस्वरूप दिलें.

कोल्हापूरास 'दक्षिणकाशी' या नांवानें संबोधतात याबद्दल दोन कथा आहेत. एकदां सर्व देवांचा दरबार कोल्हापूरास भरणार होता. त्यास हजर रहाण्यासाठीं शंकर व पार्वती कैलासाहून कोल्हापूरास येण्यासाठीं निघाले. पहांटे पूर्वी त्यांना कोल्हापूरास पोंचावयाचें होतें. रात्रीं कोल्हापूरापासून तीन मैलांवरील वडणगे गांवास आल्यावर शंकरास गांजा ओढण्याची लहर आली. शंकर विस्तव आणण्यासाठीं गांवांत गेला व पार्वती गांवाबाहेर राहिली. इतक्यांत कोंबडा आरवला. पहांट झाल्यावर देवांनीं माणसांच्या नजरेस पडावयाचें नसतें म्हणून शंकर वडणगें गांवांत राहिला व बिचारी पार्वती एकटीच गांवाबाहेर राहिली. शंकर त्यावेळीं कोल्हापूरास पोंचला असता तर कोल्हापूर हीच काशी झाली असती. तरी पण या वेळेपासून कोल्हापूर 'दक्षिण काशी' म्हणून ओळखली जाऊं लागली.

या संबंधात दुसरी कथा अशी कीं, काशीचा विश्वेश्वर व कोल्हापूरची अंबाबाई यांच्यांत श्रेष्ठ कोण याबद्दल वाद सुरू झाला, तेव्हां विष्णूनें तराजूच्या एका पारड्यांत कोल्हापूर घातलें व दुसऱ्या पारड्यांत काशीस घातलें. तेव्हां कोल्हापूरचें पारडें जड झालें म्हणून शंकरानें काशी सोडली व तो कोल्हापूरास येऊन राहिला. या वेळेपासून कोल्हापूर ही 'दक्षिण काशी' म्हणून ओळखलें जाऊं लागलें. भगवान विष्णूंनीं एकसारखीच दोन स्थानें काशी व करवीर अशीं निर्माण केलीं. एका ठिकाणीं तो शिवाच्या रूपानें राहिला व दुसऱ्या ठिकाणीं करवीरांत तो शक्तीच्या अथवा महालक्ष्मीच्या रूपानें राहिला, असा उल्लेख 'कोल्हापूर शहराचा इतिहास' या पुस्तकांत विख्यात शिक्षणतज्ज्ञ श्री. जे. पी. नाईक यांनीं करून ठेवला आहे.

कोल्हापूरास महालक्ष्मीचें देवालय निर्माण झाल्यावर या देवीची महती जनतेला कळूं लागली. महाराष्ट्रांतून चोहोंकडे देवीच्या दर्शनास लोक जमूं लागले. लौकरच या शहराचें साध्या गांवांतून तीर्थांत व तदनंतर महातीर्थांत परिवर्तन, रूपांतर झालें. काशीयात्रेची इच्छा जुन्या हिंदूंना खूप असायची, परंतु सर्वच जणांना काशी पर्यटन जमत नसे. शिवाय आगगाड्या इ० सारखीं साधनेंहि उपलब्ध नव्हतीं. तेव्हां काशी सारखेंच एखादें क्षेत्र असावें अशी आवश्यकता महाराष्ट्रांत भासूं लागली. समाजशास्त्राचा एक नियम असा आहे कीं, जनतेला एखादी गोष्ट अति उत्कंठतेनें भासूं लागली कीं, ती प्रज्ञेला पटेल अशाप्रकारें मांडणारे पंडित आपोआपच निर्माण होतात. याच न्यायाला अनुसरून या भागांतील भाविकांनी काशीयात्रेच्या अतृप्त आकांक्षेच्या सामर्थ्यानें कोल्हापूर नगरी हें एक तीर्थ वा महातीर्थ आहे इतकेंच नव्हे तर हें स्थान दक्षिणेकडील प्रत्यक्ष काशी आहे व तिथें गेल्यानें काशी पर्यटनाइतकेंच पुण्य पदरीं पडते अशी कल्पना प्रसृत केली. त्याशिवाय सरस्वती, कासारीं, कुंभी, तुळशी व भोगावती ( सरस्वति गुप्त आहे अशी कल्पना आहे ) या नद्या एकत्र मिळून पंचगंगा जवळूनच वहात होती त्यामुळें या कल्पनेस आणखीन् पुष्टी मिळाली. या नद्यांचा संगम ज्या ठिकाणीं झाला आहे तें ठिकाण कोल्हापुरांत अजुनहि परमपवित्र स्थान समजलें जातें; व त्यास प्रयाग किंवा त्रिवेणी असें म्हणतात. अशा रीतीनें कोल्हापूर 'दक्षिणेकडील काशी' म्हणून ओळखलें जाऊं लागलें. आणि त्याला धार्मिक दृष्ट्या व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्व येऊं लागले तें आजतागायत !

हें करवीर महात्म्य भगवान विष्णूंनी ब्रह्मदेवाला, ब्रह्मदेवानें नारदाला, नारदानें मार्कंडेय व अगस्ती ऋषींना सांगितलें आहे. अल्पकाळ तप

करून पुण्यलाभ कुठें होईल याचा मार्कंडेय ऋषि विचार करीत असतां त्यांना नारदांनी करवीर हें महालक्ष्मीचें आद्यपीठ असल्याचें सांगून तिथें जल रूपानें महादेव, पाषाण रूपानें श्री विष्णु, वृक्ष रूपानें देवता आणि वालुक रूपानें मुनिवृंद रहातात असें सांगितलें. तसेंच काशी येथें श्रीशिव रहातात ते फक्त मुक्ति देतात. पण दक्षिण काशी येथें श्रीशिव व श्रीमहालक्ष्मी हीं रहात असल्यानें भुक्ति व मुक्ति दोन्ही तिथें मिळतात. सर्व तीर्थेंहि येथें येऊन राहिलेलीं आहेत. शिव हे महाकाली रूपानें, विष्णु महालक्ष्मी रूपानें व ब्रह्मदेव महासरस्वति रूपानें येथें नित्य राहातात. त्यामुळें तेहत्तीस कोटी देवहि येथेंच वास्तव्य करतात. येथें दानाचें महात्म्यहि फार मोठें आहे. कारण श्रीदत्त हें नित्य भिक्षेला करविरीं येत असतात.

कोल्हापुरांत अपरिमित क्रांति घडवून आणलेली अशी प्रसन्नवदना श्री महालक्ष्मी, अंबामाता असुरांचा नाश करणारी, भक्तांना अभय देणारी अन् नवसाला पावणारी आहे, अशी सुकीर्ति सर्वत्र दरवळली. हजारोंनीं भाविक दर्शनार्थ लोटूं लागले आणि राजरजवाडे तर तिचें अनन्य उपासक बनले. अशा या महालक्ष्मीचें जुन्यांतलें जुनें देऊळ आजच्या इतकें मुळींच मोठें नव्हतें.

सध्यांचें महालक्ष्मीचें देऊळ शहराच्या मध्यभागीं असून तें जुन्या राजवाड्याच्या वायव्येस सुमारें २०० हातांवर आहे. त्याची पूर्व-पश्चिम लांबी सुमारें २०२ फूट व दक्षिणोत्तर लांबी १५० फूट आहे. प्राचीन देवळाचा मुळचा भाग फक्त दुमजली होता व त्याची उंची अवघी ३० फूट होती. परंतु त्यानंतर त्यावर बांधलेला कळस भूमीपासून अंदाजें ६५ फूट उंच आहे. देवाळाचे घुमट व शिखर संकेश्वराच्या शंकराचार्यांनीं बांधले.

आज दिसत असलेलें हें प्रचंड मंदिर त्रिशुळाकृति किंवा पद्माकृति असून तें पश्चिमाभिमुख आहे. मंदिराकरितां वापरलेला दगड काळ्या भुरकट रंगाचा असून तो कठीण व कांहीसा खडबडीत आहे व त्याची अल्पशी सुद्धां झीज झालेली नाहीं. हे मोठमोठे दगड चुन्याशिवाय एक-मेकांजवळ चांगले बसवून हेमाडपंती धाटणीचें हें देऊळ बांधलेलें आहे. हें अवाढव्य देऊळ एकाच वेळीं बांधण्यांत आलेलें नसून तें सुमारें ३०० वर्षे निरनिराळ्या राजांच्या कारकिर्दीत बांधलें जात होतें, व त्यांत वेळोवेळीं अनेक सुधारणा केल्या गेल्या. विशेष म्हणजे देवळाच्या बांधकामांत लांकडाचा वापर मुळींच केलेला नाहीं. देऊळ पश्चिमाभि-मुख असल्यानें सहाजिकच पश्चिमेस महादरवाजा आहे व त्यावर देवीचा नगारखाना आहे. याशिवाय उत्तर, दक्षिण व पूर्व या दिशांना तीन ल्हान दरवाजे आहेत. उत्तरेकडच्या दरवाजावर एक मोठी घंटा आहे व ती पहांटे चार वाजतां, दोन प्रहरीं बारा व एक वाजतां व रात्रौ आठ व नऊ वाजतां अशी दिवसांतून पांच वेळां वाजविण्यांत येते. देवळास अनेक दगडी खांब असून ते मोजतांना बराच गोंधळ होतो. हे खांब मोजण्याचे प्रयत्न करणाऱ्यास पोटदुखी होते असा एक समज आहे. देवळास आणखीन् जे कांहीं बारकेसारके दरवाजे आहेत त्याशिवाय हवा आंत येण्यास किंवा ती खेळण्यास खिडक्या, झरोके आदि द्वारें नाहींत. देवळाच्या पुढील सभामंडप दाजी पंडिताच्या कार-किर्दींत इ. स. १८३८ ते १८४३ मध्यें बांधला गेला. देवळांत चार शिलालेख असून ते सर्व देवनागरीमध्यें आहेत. या देवळाकरितां बराच खर्च करावा लागला हें निश्चित. दगडाच्या भारंभार सोनें हें देऊळ बांधण्यास लागलें अशी दंतकथा प्रचलित आहे. देवळाच्या सभोंवतीं ल्हानमोठीं तीस देवालयें आहेत. त्यांत राम, केदारलिंग, कुंडलेश्वर,

अगस्ति व लोपामुद्रा, सिद्धेश्वर, विठोबा, शेषशायी, हरिहरेश्वर, गणेश, तुळजा भवानी, महासरस्वती, महाकाली, राधाकृष्ण, खंडोबा, अतिबलेश्वर, गोकर्णेश्वर, विष्णु, लक्ष्मीनारायण, नृसिंह, दशावतार, शिवपंचायतन, मृदुलेश्वर, नवग्रह वगैरेंचा समावेश होतो. बहुतेक देवळें मूळ देवळा-नंतर शेंकडों वर्षांनीं स्थापन केलेलीं आहेत.

अशा या विख्यात व पुरातन देवाल्यांतील श्री अंबामातेची मूर्ति काळ्या पाषाणाची सुमारें पावणेचार फूट उंच व उभी असून ती सुमारें ३ फूट उंच चबुतऱ्यावर उभारलेली आहे. ती चौभुजा आहे. महालक्ष्मी, अंबाबाई, अंबामाता, आई, करवीरनिवासिनी इत्यादि नांवांनीं ओळखली जाते. महालक्ष्मी हें नांव प्राचीन म्हणजे मुसलमान पूर्वकालीन असलें तरी अंबाबाई हें नांव मात्र अर्वाचीन आहे. ही देवीची मूर्ति देवळाच्या पूर्वेस मोठ्या शिखराखालीं बसविलेली असून तिच्या उत्तरेस व दक्षिणेस दुसऱ्या लहान शिखरांत महाकाली व महासरस्वती यांच्या मूर्ति आहेत. सृष्टि निर्माण होण्यापूर्वीं महालक्ष्मी ही एकटीच देवता होती व तिनें आपल्या देहापासून विविध रूपांची निर्मिति करण्याची इच्छा धरली. त्योच तिच्या ठायींच्या तामस गुणांतून महाकाली या तामसी देवतेची निर्मिति झाली. महाकाली म्हणजे अपौरुषेय देवता म्हणजे तिची कुणी निर्मिति केलेली नसलेली देवता होय. ती महालक्ष्मीच्या शरीरापासून आपोआप निर्माण झाली असा पुराणांत उल्लेख आहे.

अंबामातेची मूर्ति चौभुजा आहे. तिच्या वरच्या हातांत ढाल आणि उजव्या हातांत गदा आहे. खालील डाव्या हातांत पानपात्र तर खालील उजव्या हातांत शिवाचें प्रतीक असें जें महाळुंग फळ तें आहे. ब्रह्मा, विष्णु व शिव या त्रयींचें एकत्रीकरण अंबाबाईत झालेलें आहे असें भक्त

मानतात. देवीच्या मस्तकावर मुकुट असून त्यावर शेषशायीनें छाया धरलेली आहे. मागें सिंह उभा आहे.

अशा या अंबामातेच्या मूर्तीची स्थापना इसवी सनापूर्वीं तिसऱ्या शतकांत झाली असावी असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. शके ७९३ च्या अमोघवर्ष राष्ट्रकूट याचा एक ताम्रपट आहे त्यांत वीरनारायणानें लोकांना होणारा उपद्रव शांत करण्याकरितां आपल्या एका हाताचें एक बोट महालक्ष्मीस अर्पण केलें होतें असा उल्लेख आहे. मंदिराच्या शिल्पाच्या दृष्टीनें पहातां तो काळ बदामी चालुक्योत्तर ठरतो. १५ व्या-१६ व्या शतकांत यवनांची धाड महाराष्ट्रावर आली असतांना संरक्षणाच्या निमित्तानें ही मूर्ति कपिलतीर्थ या जवळच्याच सरोवरांत सोडून देण्यांत आली होती. भय कांहींसें कमी होतांच ती मूर्ति परत वरती काढून ती जवळच्याच कपिलेश्वर मंदिरांत पूजिली जात असे. शत्रूचें भय निश्चित दूर झाल्यावर पुन्हां तेथून ती हलवून आज जिथें ती आहे तिथेंच तिची प्रतिष्ठापना करण्यांत आली व त्याकरितां संभाजी राजांनीं इ. स. १७२२ च्या सुमारास पन्हाळ्याहून शिंदोजी हिंदूराव घोरपडे यांस मुद्दाम बोलावून घेतलें होतें असा उल्लेख सांपडतो. थोर शास्त्रवेत्ते, जाणते प्रकांडपंडित व शास्त्री जेव्हां कोल्हापूरास येतात तेव्हां ते प्रथम महालक्ष्मीच्या मंदिरांत न जातां कपिलतीर्थांतील मंदिरांत प्रथम जातात आणि मगच अंबामातेला भेटावयास येतात.

या विख्यात अंबामातेचा खालील डावा हात १९१७ सालीं शाहू महाराजांच्या कारकीर्दींत अभिषेकाचा तांब्या पडून कोपरापासून निखळला होता. वास्तविक खरें कारण देवालयांतील पुजाऱ्यांनीं आपापसांत भांडण केलें होतें व त्या भांडणाचें पर्यवसान एका पुजाऱ्यानें दुसऱ्या पुजाऱ्यावर तांब्या फेंकण्यांत झालें; परंतु दुर्दैवानें तो तांब्या

देवीच्या हातास लागून तिचा तो हात दुखावला होता. तेव्हांपासून तों १९५५ सालापर्यंत तो त्याच अवस्थेंत होता. फक्त त्यास आधार देऊन ठेवला होता. देवीचा हात दुखावला ही गोष्ट तत्कालीन शाहू महाराजांना बरी वाटली नाहीं. योगायोग असा कीं, हात दुखावल्यापासून अवघ्या कांहीं महिन्यांच्या आंतच शाहू महाराजांचे चिरंजीव शिवाजीराव शिकारी करितां गेले असतांना घोड्यावरून पडून अकस्मात् गतप्राण झाले. पुजाऱ्यांनीं नंतर आपापसांत भांडण मिटवून घेतल्यामुळें देवीचें हें खरें प्रकरण तेव्हां दाबून टाकलें गेलें होतें. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पुत्रवियोगामुळें शाहू महाराजांनीं या प्रकरणांत जास्त हस्तक्षेप केला नाहीं.

१९५३ च्या अखेरीस जगन्नाथपुरीचे विद्वत्‌रत्न प्रकांडपंडित शंकराचार्य योगेश्वरानंद हे कोल्हापूरास आले असतांना नित्याप्रमाणें ते देवीच्या दर्शनास गेले. यावेळीं त्यांना या कुलदेवतेच्या उपेक्षेची जाणीव झाली. भारतीय संस्कृतीच्या व त्यांच्या वेषाच्या अनुषंगानें त्यांनीं जाहीर विचार प्रगट केला कीं, देवीनें मला दृष्टान्त दिला व ती म्हणाली, "माझ्या शरीराकडे पहा."

या दृष्टान्ताच्या रोखानें श्री शंकराचार्यांनीं मूर्तीची दुरुस्ती करण्याचा संकल्प केला व ते त्या तयारीस लागले. संपूर्ण मूर्ति खरोखरच खडबडीत झाली होती आणि तिची अर्थातच दुरुस्ती करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. ही गोष्ट पटत असून सुद्धां पुजाऱ्यांनीं आपल्या हक्काविरुद्ध ही गोष्ट घडत आहे म्हणून या कार्यास विरोध केला होता. परंतु श्री शंकराचार्यांचा या प्रकरणीं विजय होऊन महालक्ष्मीस वज्रलेप करण्याचें काम त्यांनी स्वतः अंगावर घेतलें व महत्प्रयासांनीं त्यांनीं तें पूर्ण केलें.

आज या पुराणप्रसिद्ध, परमपवित्र श्री अंबाबाईचे भक्त महाराष्ट्रांतच काय परंतु अखिल भारतांत विखुरलेले आहेत. देवीसंबंधानें वर्षांतून तीन दिवस तर फार मोठे आणि अत्यंत महत्त्वाचे समजण्यांत येतात. चैत्री पौर्णिमेस अंबाबाईची पितळी मूर्ति रथांत बसवून शहरांतून तिची मिरवणूक काढतात. आश्विन शुद्ध पंचमीस देवीला पालखींतून शहराच्या पूर्वेस तीन मैलांवर असलेल्या टेंमलाईच्या भेटीस नेण्यांत येते. आश्विन शुद्ध पौर्णिमेस देवीच्या देवळांचीं शिखरें पाजळतात. त्या शिवाय नवरात्रांतील अष्टमीचे हवनविधि पहाण्याजोगें असतात. दर मंगळवारीं व शुक्रवारीं तिथें श्री सूक्ताचा अभिषेक चालतोच. वेळोवेळीं भक्तगण देवीच्या चरणांवर मस्तक अर्पण करण्यासाठीं म्हणून देवीच्या दर्शनास येतात. फार काय प्रत्यक्ष रविराजहि तिथें दर्शनास येतो. दक्षिणायनांत व उत्तरायणांत परिभ्रमण करण्याच्या प्रसंगीं दिनकराचे तीन तीन दिवस सूर्यकिरण नेमके देवीच्या अंगावर पडतात. त्यावेळीं प्रकृतिदेवीचा दिनमणिसूर्य अंबामातेच्या भेटीस आला असें भक्त समजतात आणि देवीचा महिमा गात गात थुई थुई नाचतात.

आज आमच्या महाराष्ट्रांत अनेक प्रसिद्ध तीर्थक्षेत्रें आहेत, ख्यातनाम देवळें आहेत; परंतु त्या सर्वांतून प्रत्यक्ष गाभाऱ्यांत जाऊन मूर्तीस फूल वहातां येत नाहीं किंवा पूजारती ओवाळतां येत नाहीं. पंढरपूरच्या विठोबास सुद्धां भाविकास प्रत्यक्ष गाभाऱ्यांत जाऊन फूल वाहाण्याची परवनागी नाहीं. फक्त पूजा—अर्चादि कार्यें करण्याची तशी परवानगी धर्मसिंधुकार बाबा पाध्ये यानांच काय ती होती. कारण, प्रत्यक्ष देव त्यांच्याशीं बोलत असत असा बडव्यांचा विश्वास; पण या महालक्ष्मीच्या मंदिरांत आंत गाभाऱ्यांत वाटेल त्या भाविकास जाऊन तेथें स्वहस्तें फूल वहातां येतें हें खरोखरच या मंदिराचें वैशिष्ट्य होय.



कार्ल्यांची श्री एकवीरादेवी

# काल्र्यांची श्री एकवीरादेवी

आमचा महाराष्ट्र ही तीर्थक्षेत्रांची पावनभूमि आहे. येथें अनेक देव-देवतांचीं परमपवित्र मंदिरें आहेत. त्यामधें कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची देवी भवानी, माहूर ऊर्फ मातापूरची रेणुका, सप्तशृंगीची महिषासुरमर्दिनी, औंधची यमाई, राशीनची तुकाई या देवतांचीं मंदिरें तर परमपवित्र समजलीं जातात. यामधेंच काल्र्याच्या श्री एकवीरादेवीचा समावेश करावा लागतो.

खंडाळा आणि लोणावळा हीं थंड हवेचीं ठिकाणें सोडलीं आणि पुण्याच्या दिशेनें आपण जाऊं लागलों कीं लोणावळ्यानंतर लागलीच एक आड स्थानक लागतें. त्याचें नांव आहे मळवली. दिवसाकांठीं एखाद–दुसरी पॅसेंजरगाडी काय ती किंचित् वेळ थांबून निघून गेली कीं, मग सर्वत्र येथें सामसूम दिसते. या मळवलीपासून अवघ्या एका कोसावर एक छोटेसें खेडें आहे त्याचें नांव आहे कार्ले. या गांवा-जवळूनच इंद्रायणी नदी वहाते. तिला पावसाळ्यांत बरेंच पाणी असते. तेव्हां पावसाळ्यांत या ठिकाणीं जायचें झालें तर एस. टी. च्या बसनें जाणें चांगलें. मुंबईहून मुंबई-आग्रा रोडनें सुमारें ८० ते ८२ मैल गेलें कीं, डाव्या हाताला काल्र्याच्या लेण्याकडे जाण्याचा रस्ता फुटतो. हा रस्ता थेट पायथ्यापर्यंत गेला आहे. येथून उत्तरेला बुरुजासारखा डोंग-राचा जो एक विशिष्ट भाग दिसतो तिथेंच काल्र्याचें लेणें आणि देवी श्री एकवीराचें ठाणें आहे. इंद्रायणीच्या खोऱ्यांत असलेल्या उंचच उंच

पहाडांवर अनेक बौद्धकालीन विहार असल्यामुळेंच कीं काय या गांवाला फार फार वर्षांपूर्वीं विहारगांव असें म्हणत असत. इंद्रायणीच्या खोऱ्यांतच हा कार्ल्याच्या डोंगर आहे. पायथ्यापासूनच डोंगरावर चढायला पायऱ्या केलेल्या आहेत. अपंग, वृद्धांना वर नेण्यासाठीं पायथ्याशीं डोल्या पण भाड्यानें विकत मिळतात. डोंगरावर कित्येक ठिकाणीं दाट झाडी आहे तर कित्येक ठिकाणीं झाडी साफ करून उघडी जागा दृष्टीस पडते. कार्ल्याचा डोंगर चढतांना सभोंवतालीं लोहगड आणि विसापूर हे किल्ले, तुंग आणि भोरगिरी हे गड व साखरपठार हीं नयनमनोहर स्थळें दिसतात. वर्षा ऋतूंत तर डोंगरपठारावरून झुळझुळ वहात येणारें पाणी रूप्याच्या प्रवाहासारखें भासमान होतें.

कार्ले हें ठिकाण बऱ्याच वर्षांपूर्वींपासून उभ्या महाराष्ट्रांत महशूर आहे. याचें कारण तिथें असलेलीं कोरीव लेणीं आणि श्री एकवीराचें देवालय हें होय. सह्याद्रि पर्वताच्या ज्या फांट्यावर मंदिर आणि लेणीं आहेत त्या फांट्याची उंची जमिनीपासून सुमारें ४०० फूट आहे. डोंगर चढण्यास सुमारें ४० मिनिटें तरुणांना लागतात. डोंगर चढून वर गेलें कीं, एक फाटक लागतें. तेथें भारत सरकारच्या पुराणवस्तु संशोधन खात्याचे अधिकारी रहातात. देवीच्या दर्शनाबरोबरच येथील कोरीव लेणीं पहायची असतील तर माणसी दोन आणे कर द्यावा लागतो.

फाटक ओलांडलें कीं, दर्शनीच एक दुमजली टुमदार इमारत लागते. तो देवीचा नगारखाना होय. येथें रोज तिन्ही–त्रिकाळीं देवीचा नगारा झडत असतो. या नगारखान्याची नेमणूक पुण्याच्या पेशवे सरकारनें केली होती. या नगारखान्याच्या इमारतींतून आंत गेलें कीं, कार्ल्याच्या लेण्याच्या उजव्या अंगाला एक भव्य सिंहस्तंभ लागतो. या सिंह-

स्तंभाच्या पायथ्याशीं देवीचें वाहन असलेला छोटासा सिंह आहे. सिंह-स्तंभासमोरच म्हणजे लेण्यांच्या द्वाराच्या डाव्या अंगाशी एका दगडी चबुतऱ्यावर श्री एकवीराचें सुप्रसिद्ध देऊळ आहे. ही देवी ठाणें व पुणें जिल्ह्यांतील व कोंकणांतील धीवरांची आणि प्रभु लोकांचीहि कुलदेवता असल्यानें हे सारे लोक या देवीचे अनन्य उपासक आहेत.

देवी मंदिराच्या दाराशीं एका भक्कम कमानीला एकूण नऊ लहान मोठ्या घंटा टांगलेल्या आहेत. त्यापैकीं एका मोठ्या घंटेवर १८५७ असा आंकडा कोरलेला आहे व तो इंग्रजींत आहे. या जंगी घंटेचा आवाज मधुर आहे. ही घंटा १०६ वर्षांपूर्वींची असावी. तसेंच एकवीरा-देवीच्या पुढचा छोटासा सभामंडप सुद्धां सुमारें शंभर वर्षांपूर्वींचा आहे. त्याच्यावरचा शिलालेख असा हें एकवीरा भवानीचें जुनें देऊळ मुंबईचे नागा पोसू वरळीकर आणि हरिप्पा चरणवीर यांनीं बाबुराव कुलकर्णी यांच्या सल्ल्यानें इ. स. १८६६ सालीं जीर्णोद्धार केला.

सभामंडपांत देवीच्या भक्तांनीं देवीचीं असंख्य छायाचित्रें लावलेलीं आहेत. देवीच्या भक्तांनीं नवस फेडण्यासाठीं देवळाच्या उंबरठ्यावर आणि दरवाजांत चांदीचे कितीतरी रुपये ठोकले होते. त्या चांदीचा उपयोग करून देवीच्या मागची बाजू आणि गाभाऱ्याचा दर्शनी भाग चांदीच्या पत्र्यानें मढविलेला आहे. त्यावर नक्षीहि काढण्यांत आलेली आहे.

कार्ल्यांच्या या एकवीरादेवीसंबंधानें फारशी माहिती आज उपलब्ध नसली तरी या देवीचें स्थान प्राचीन असावें असा उल्लेख सांपडतो. फार फार वर्षांपूर्वीं भारतवर्षांत वावरणाऱ्या हरिवर्मा नामक राजास विष्णु-प्रसादानें प्राप्त झालेला पुत्र हा वाजीरूपधर विष्णूपासून वडवारूप धारण केलेल्या लक्ष्मीच्या ठायीं उत्पन्न झाला होता म्हणून त्यास हैहय असें नांव ठेवण्यांत आलें. हा हैहय यदुकुलोत्पन्न हैहय राजापासून अगदीं भिन्न

आहे. या हैहय राजाला एकावली व यशोवली अशा दोन स्त्रिया होत्या आणि त्याची उपास्यदेवता ही एकवीरा होती असा स्पष्ट उल्लेख आहे. यावरूनच या देवीचें येथलें हें स्थान किती जुनें आहे याची चांगलीच कल्पना येते. कांहीं तज्ज्ञांच्या मतें ही देवी येथील विहारांच्या म्हणजे लेण्यांच्याहि पूर्वीची असावी. कदाचित् तिच्या या भागांतील प्रसिद्धीमुळेंच येथें बौद्धांनीं लेणें कोरलें असावें असें वाटतें, असा स्पष्ट उल्लेख 'पूना गॅझेटियर' मधें आणि कै. श्री. व्यं. केतकर यांच्या ज्ञानकोशांत मिळतो.

ख्यातनाम इतिहाससंशोधक आणि 'सह्याद्री' हा संग्राह्य संदर्भ-ग्रंथ लिहिलेले विद्वान लेखक कै. स. आ. जोगळेकर लिहितात, "कार्ले चैत्यासमोर डाव्या अंगाला सुमारें पंचेचाळीस फूट उंचीचा एकसंधी सिंहस्तंभ आहे. त्याची बैठक वर्तुळाकार असून तो अंगीं सोळा कोनी आहे. अग्रभागीं वाटोळा कंगोरेदार कळस असून त्यावरील बैठकीवर पाठीला पाठ लावून उकिडवे बसलेले चार सिंह आहेत. महारथी अग्नि-मित्रज्जनक यानें हा स्तंभ खोदविला असा त्यावर लेख आहे. याच्यासमोर म्हणजे चैत्याच्या उजव्या अंगालाहि असाच आणखीन एक स्तंभ असावा असें आजुबाजूच्या खुणांवरून वाटतें. हा स्तंभ आज संपूर्णतया नष्ट झालेला असून त्या जागीं श्रीएकवीरादेवीचें देऊळ बांधलेलें दिसतें आहे."

या देवीला एकवीरा हें नांव कसें काय पडलें यासंबंधीच्या दोन कल्पना आहेत. कांही संशोधकांच्या मतें 'अक्का अव्वेयार' म्हणजे 'पूजनीय माता' या द्रविडी नांवावरून 'एकवीरा' हें नांव झालें असावें. दुसरें म्हणजे असें कीं, सर्व क्षत्रियांचा पराभव करणारा परशुराम हा एकच एक वीर जिच्या पोटीं जन्माला आला ती एकवीरा, म्हणजे परशुराम माता रेणुका असें म्हणतात. अशी एकवीरा या नांवाची कथा आहे, व्युत्पत्ति लावली जाते.

गाभाऱ्यांतली एकवीरादेवीची मूर्ति पाषाणाची असून ती डोंगराच्या दगडांत कोरलेली आहे. सध्यांतर ती बरीच झिजलेली दिसते. ही देवी खडकांतलें स्वयंभूस्थान आहे. देवीच्या अंगावर शेंदुराचीं अनेक पुटें चढलेलीं आहेत. देवीचे डोळे खोल असून त्यांत मिन्याचे डोळे बसविलेले आहेत. देवीचें नाक आणि तोंड खोल आहे. यामुळें देवीचें मूळ रूप कांहीसें भयानक दिसतें. पण मूर्तीला चोळी आणि पातळ नेसविल्यानंतर आणि देवीच्या मुखावर चांदीचा मुखवटा बसविल्यावर मात्र देवीचें रूप सौम्य, हंसरें आणि मोठें प्रेमळ दिसतें. देवीच्या गळ्यांत मंगलसूत्र, हार इत्यादि अलंकार असतात व या अलंकारांमुळें ती मोठी खुलून दिसते. देवीच्यासमोर मोठा चौरंग असून त्यावर पूजा—साहित्य असते. समोरच दोन मोठ्या समया तेवत असतात व त्या अखंड जळत असतात. देवीच्या डाव्या हाताला असलेल्या कोनाड्यांत जोगेश्वरीची शेंदूरचर्चित अशी एक मूर्ति आहे. भाविक देवीची ओटी भरतात. ही देवी नवसाला खात्रीनें पावते असा समज या देवीच्या भक्तांचा असल्यानें कार्यपूर्तीनंतर भाविक कृतज्ञता म्हणून मोठ्या आदरानें नि भक्तिभावानें तिच्यावर दागदागिने घालतात किंवा मुखवटे चढवितात. त्यांनीं देवीला नजर केलेल्या कितीतरी वस्तू देवळांत आहेत. देवीला कोंबडा किंवा बकरीं बळी देण्याची प्रथा आहे, परंतु तो बळी डोंगराच्या पायथ्याशीं दिला जातो. वरती मंदिरापाशीं नव्हे. इतकेंच काय पण मंदिराच्या आसपास मांस, मासे भक्षण करण्याची सक्त मनाई आहे. देवीला प्रदक्षिणा करण्यास मात्र येथें जागा नाहीं. कारण मूर्ति डोंगरांतच खोदलेली आहे. यात्रेच्या दिवसांत चांगलीं हजार बाराशें बकरीं व कोंबडीं देवीला नजर केलीं जातात, भेट म्हणून दिलीं जातात, बळी देतात.

श्री एकवीरादेवीची जत्रा वर्षांतून दोन वेळां भरते. एकदां चैत्रांत आणि दुसरी आश्विनांत. चैत्रांतली यात्रा मोठी असते; व ती चैत्र शुद्ध अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंत चालते. आश्विनांत नवरात्र यात्रा भरते. यात्रेच्या वेळीं तळकोंकणातून कोळी, प्रभु आणि सोनार लोक मोठ्या प्रमाणावर यात्रेस येतात. कोळी लोक यात्रेला येतांना देवीच्या पालख्या आणतात. त्यांत एकवीरादेवीचें चांदीचें ताट व मुखवटे असतात. कार्ल्याच्या लेण्याच्या नैऋत्येला कांहीं अंतरावर एक छोटासा तलाव आहे. तिथें एक क्षेत्रपालाचें देऊळ आहे. त्या भागाला देवघर असें म्हणतात. हें देवीचें माहेर होय. चैत्र शुद्ध अष्टमीस ही देवी माहेराहून सासरीं म्हणजे कार्ल्यास परत येण्यास निघते. येथें प्रथम यात्रेकरू जमतात व मग गडावर येतात. यावेळीं कित्येकांच्या अंगांत देवीचें वारें शिरते. जर वारें शिरलेली व्यक्ति नवीन असेल तर तिला 'नवें झाड' आणि जर जुनी असेल तर तिला 'जुनें झाड' असें संबोधण्यांत येतें. जुन्या झाडापेक्षां नवीन झाडास फार मान दिला जातो. तेव्हां अनेक भाविक त्या मिरवणुकींत सामील होतात. आणि त्यास शांत करण्याकरितां सर्वतोपरीनें यत्न करतात. दिवसांतून चार वेळां देवीची षोडशोपचारें पूजा केली जाते आणि तिला अनन्यभावें ओवाळलें जातें. देवीची पूजा करणारे ब्राह्मण खाली विहीरगांवाहून येतात. त्यांच्याकडे ही पूजापाठाची व्यवस्था फार पूर्वीपासून आहे. देवीपुढें धूपारती करणें व देवीच्यापुढील उत्पन्न घेणें या कामीं नेमणूक गुरवाची केलेली आहे व तो तिथें गडावरच रहातो.

या मंदिराच्या आसपासच्या लेण्यांबद्दल पांडवांच्या कथा प्रसृत असल्या तरी येथें सांपडलेल्या एका शिलालेखावरून असें सिद्ध होतें कीं, येथील शिल्पकलेस उसवदत्तनामक शकाधिपतीनें आरंभ केला. इ. स. पूर्व १२०

वर्षीं तो या इलाख्याचा सर्वाधिपति असून त्याचा मंत्री वत्स गोत्र नामक एक ब्राह्मण होता. मंदिरालगतच असलेल्या विशालचैत्य-भवनाची निर्मिति नहपन्न नामक शासकानें केली. या नहपन्नाचा काल इ. स. पूर्व ४० वर्षें असावा असें समजलें जातें. तेंव्हां आज या शिल्पकलेस २००० वर्षें झालीं असलीं तरी तीं सुस्थितींत आहेत हें विशेष होय; आणि सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे या एकवीरादेवीचें वसतिस्थान तिथें या वेळींच नव्हे तर यापूर्वींहि होतें. यावरून तिचें निवासस्थान किती जुनें असावें याची कल्पना येते. या देवीची महाराष्ट्रांत अशीं पुष्कळ ठिकाणें आहेत. छत्रपति शिवाजी महाराजांच्या पदरीं असलेले व त्यांचें 'शिवभारत' हें संस्कृत श्लोकबद्ध चरित्र लिहिणारे कवींद्र परमानंद यांचीहि कुलदेवता एकवीरा ही होती असा उल्लेख शिवभारतांत आलेला आहे. संत एकनाथांची हीच देवी कुलदेवता होती. नाथांनीं आपल्या एकनाथी भागवतांत याच कुलदेवतेला ग्रंथारंभीं वंदन केलेलें आहे. माहूर ऊर्फ मातापूरचे रेणुकाभक्त विष्णुदास यांच्या कवितेंत एकवीरा असे देवीचे उल्लेख आलेले आहेत.

कांहीं वर्षांपूर्वी या एकवीरादेवीच्या मुगुटादि अलंकारांची चोरी झालेली होती.

अगदीं अलिकडे एस. टी. च्या बसेस् मुंबई सेंट्रल डेपोपासून थेट कार्ल्यापर्यंत जाण्यासाठीं अधूनमधून सुटत असतात. माणसी भाडें जाऊन येऊन १० रु. पर्यंत पडतें. सध्यां महाराष्ट्र राज्य सरकारनें सुटींत येणाऱ्या प्रवाशांसाठीं येथें जवळच हॉली डे कॅम्पस् काढून रहाण्याची सोय केलेली आहे.



पुण्यनगरीची श्री चतुःशृंगी

# पुण्यनगरीची श्री चतुःशृंगी

पुण्यनगरी ऊर्फ पुणें हें महाराष्ट्रांतील प्राचीन संस्कृतीचें अवशेष असलेलें, विद्यादेवतेचें माहेरघर असलेलें एक शहर आहे. मराठेशाहींत तर हें शहर राजकारणाचें एक प्रसिद्ध केंद्र समजलें जाई. पेशवेकालांत तर हें शहर विविध कारणांनीं वाजलें गाजलें आहे. मुंबईच्या खालोखाल गजबजलेल्या या नगरींत मारुतीचीं आणि गणपतीचीं देवळें आणि मंदिरें जागोजागीं व गल्लोगल्लीं आढळतात. या शहराच्या वायव्येस तीन मैलांवर गणेशखिंड नांवाची एक खिंड आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत ब्रिटिश राजवटींत येथें गोरे अधिकारी येऊन रहात असत. सध्यां उन्हाळ्यांत राज्यपालांचें वास्तव्य या ठिकाणीं बांधलेल्या खास बंगल्यांतून असतें.

अशा या पुण्यनगरींतील मुख्य रस्ता जो लक्ष्मी रोड त्यावरून सदाशिव पेठेंतून लकडी पूल किंवा नव्या पूलावर आल्यावर तो ओलांडून मुठा नदी, डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन कॉलेज हीं सारीं ठिकाणें पार केल्यावर चतुःशृंगी मैदान लागतें. या मैदानांतील पश्चिमेकडच्या डोंगरांत पूर्वेकडील उतरणीवर मध्यभागीं एका देवीचें प्रसिद्ध देऊळ आहे. चतुःशृंगीचें देऊळ या नांवानें तें आज कित्येक वर्षांपासून ओळखलें जात आहे आणि या देवळाबरोबरच तो डोंगरहि चतुःशृंगीचा डोंगर म्हणून ज्ञात आहे.

हें चतुःशृंगीचें देऊळ या डोंगरावर फारसें उंच नाहीं. एकूण ऐंशी पायऱ्या देवळांत जाण्यासाठीं काय त्या चढाव्या लागतात. येथें डोंगरांतील एक खडकाळ कडा फोडून श्री देवी चतुःशृंगी अवतीर्ण झालेली आहे, असें दिसतें.

या देवीची जन्मकहाणी मोठी रंजक आहे.

चतुःशृंगी देवीची मूर्ति येथें स्वयंभू असून ती खडकांतून अवतीर्ण झालेली आहे. अवतीर्ण होण्यापूर्वीं ती एका भक्ताच्या स्वप्नांत गेली व त्या भक्तानेंच तो कडा फोडून देवीचें मुख्य देऊळ कोरलेलें आहे. या देवळाच्या निर्मितीनंतर कांहीं वर्षांनीं देवळापुढील सभामंडप व पायऱ्या भक्तांनीं बांधलेल्या आहेत. ज्या टेकडीवर देवी अवतीर्ण झाली ती टेकडी माथ्यावर चौसपाट आहे. चोहोंबाजूचे कोपरे अगदीं समान आहेत. आणि या भौगोलिक परिस्थितीवरूनच या टेकडीवरील देवतेस चतुःशृंगी देवी असें खुणेचें नांव पडलें आहे. चतुः म्हणजे चार व शृंग म्हणजे टोंक असा अर्थ होतो.

श्री देवी चतुःशृंगी सिंहावर आरूढ झालेली असून तिनें महिषासुराला मारलें आहे असें देवीचें सुंदर रूप दिसतें. परंतु देवीला वस्त्रालंकारांनीं आणि विविध फुलांमाळांनी सजविल्यावर, नटविल्यावर तिचा फक्त गोल चेहराच काय तों दर्शन घेणाऱ्याला दिसतो.

सुमारें २५० वर्षांपूर्वीची गोष्ट. पुण्यांत दुर्लभशेट पितांबरदास नामक एक गुजराती व्यापारी रहात होते. या शेटजीनींच इ. स. १७८६ मधें शिवराई नांवाचें नाणें पाडलें. त्यांचीं हें नाणें पाडण्याची एक टांकसाळच होती. त्यांचा एक निश्चयपूर्वक नियम असे कीं, ते

चैत्री पौर्णिमेला नाशिक जिल्ह्यांतील वणी जवळील सप्तशृंगी देवीच्या दर्शनास जात असत. सतत साठ वर्षें नियमानें अगदीं न चुकतां ते देवीच्या दर्शनास गेले. परंतु पुढें वय झाल्यानें पालखींतून सुद्धां त्यांना देवदर्शनास इतक्या दूरवर जाणें अशक्य झालें. पुणें ते नाशिक एवढा प्रवास त्यांना झेपेना. देवीदर्शनाच्या आपल्या वारींत खंड पडला म्हणून त्यांना अतिशय दुःख झालें. मनांतून त्यांना खूप खूप वाईट वाटलें. तेव्हां देवीला दया आली व तिनें त्यांना स्वप्नांत दर्शन दिलें आणि सांगितलें, "वार्धक्यामुळें तुला एवढ्या दूर माझ्या दर्शनास येववत नाहीं याबद्दल तूं वाईट वाटून घेऊं नकोस. मी तुझ्या जवळच भांबुर्डा गांवच्या डोंगरांत अवतीर्ण होत आहे. तेव्हां तुला नाशिकपर्यंत जावयाचे श्रम घेण्याचें कांहींएक कारण नाहीं. मीच तुझ्या भक्तीवर संतुष्ट होऊन पुण्याजवळच्या डोंगरावर आलें. तिथें दर मंगळवारीं माझें वास्तव्य असेल. तिथें येऊन तूं माझें दर्शन घे." हा असा दृष्टान्त झाल्यावर दुर्लभ-शेटजींनीं डोंगरावर देवीचा शोध केला आणि तिथें देवीचें देऊळ बांधलें. तेंच आजचें चतुःशृंगीचें देऊळ होय.

नंतर कांही वर्षांनीं पुण्यांतील नरपतगीर गोसावी यांनीं त्यांचे गुरु निधन पावल्यावर त्यांच्या दोन शिष्यांत गादीबद्दल तंटा सुरू झाला. तेव्हां नरपतगीर यांनीं श्री देवी चतुःशृंगीस नवस केला कीं, गुरूची गादी आतां मला मिळावी आणि जर तसें झालें तर मी पायऱ्या व विहीर तुझ्या मंदिराखालीं बांधेन. देवीस नवस केल्याप्रमाणें नरपत-गीरास देवी पावली व त्यास गादी मिळाली. नंतर त्यांनींच देवीच्या मंदिरासमोरचा सध्यांचा सभामंडप, खालून वरती डोंगरावर मंदिरापर्यंत जाण्यासाठीं पायऱ्या व खालीं विहीर इतकीं कामें केलीं.

पुढें दुर्लभशेटजींचें निधन झाल्यावर त्यांच्या मुलानें भरमसाट इतकी उधळपट्टी केली कीं, देवीचें देऊळ व तिची सतत चाळीस वर्षें पूजा करणाऱ्या ब्राह्मणास खरेदी दिले. आणि अशाप्रकारें या देवस्थानाची मालकी दुसऱ्या एका घराण्याकडे आली. त्या घराण्याचें नांव आहे अनगळ घराणें. गेल्या चार पिढ्या ही देवीची मालकी या घराण्याकडेच आहे.

देवी श्री चतु:शृंगीची दर दिवशीं षोडशोपचारें पूजा अर्जा केली जाते. दररोज सकाळीं आठ नऊच्या सुमारास महापूजा यथाविधि केली जाते. पंचामृत आणि अभ्यंग स्नान झाल्यावर देवीवर वस्त्रें चढविलीं जातात. सौभाग्य अलंकाराचें प्रतीक कुंकू लावलें जातें आणि मग नैवेद्य ठेवून अत्यादरपूर्वक आरती केली जाते. दर मंगळवारीं देवीची पालखी काढली जाते. या दिवशीं देवीचे भक्तगण दर्शनास येऊन देवीवर पंचामृत ओतून अभिषेक करतात. आरती वगैरे सोपस्कार झाल्यावर सुवासिनी देवीची खण नारळ फळांनीं ओटी भरतात व देवीचें तीर्थ अंगारा नि प्रसाद घेतात. देवीची अनन्यभावें ओटी भरणें लाभदायक, शुभदायक व मंगलदायक आहे असें हिंदु महिलांचें मत आहे. पार्शी, मुसलमान, शीख इ० धर्मातील महिला पण नवसासाठीं देवीची ओटीं भरतात. दर मंगळवारीं मंदिरांत चौघडा वाजत असतो.

नवरात्रांत देवीचा फार मोठा उत्सव होतो. भाविकांची खेंचाखेंच देवीच्या दर्शनासाठीं होत असते. नवरात्रांत पहिल्याच दिवशीं देवीस पंचामृत स्नान, अभिषेक धूपारती वगैरे झाल्यावर महावस्त्र नेसविलें जातें व देवळांत तिच्या डाव्या बाजूस घटस्थापना करतात. प्रतिपदेनंतर मात्र देवीला जें स्नान नसतें तें अगदीं विजयादशमीपर्यंत. कारण त्या दिवसांत ती महिषासुराशी लढण्यांत गुंतलेली असते. नंतर आश्विन नवमी

[library stamp]

चें दशमीस देवीपुढें होम, हवन इत्यादि धार्मिक विधि केले जातात. दसऱ्याच्या दिवशीं होमाचा विधि झाल्यावर अभिषेक केला जातो व ब्राह्मण सुवासिनींना भोजन घातलें जातें. संध्याकाळीं शिलंगणाच्यावेळीं देवीचा छबिना पालखींत उत्सवमूर्ति बसवून निघतो. त्यावेळीं बँड, सनई इत्यादि वाजंत्र्या वाजविल्या जातात. चंद्रज्योति, भुईनळे इत्यादि दारूकाम सोडून मोठी आतषबाजी केली जाते. देवीचे भक्त तर यावेळीं पेटलेलें पोत घेऊन देवीच्या पालखीपुढें नाचतात. रात्रीं नऊ वाजतां पालखी व छबिना योग्य ती सीमा ओलांडून परत देवळांत येतो. पालखी-बरोबर छत्रें आणि चामरें हीं राजवैभवाची साक्ष देणारीं साधनें पण असतात.

नवरात्राप्रमाणेंच देवीचा दुसरा उत्सव पौष शुद्ध पौर्णिमेस येतो. त्यावेळीं अभिषेक आणि लघुरुद्र, अकरा ब्राह्मणांकडून एकादशण्या इत्यादि करून ब्राह्मण आणि सुवासिनींना भोजन घातलें जातें. ही देवी म्हणजे नवरात्रांतलें पुण्याचें फार मोठें आकर्षण आहे व असंख्य पुणेकर या दिवसांत देवीचें दर्शन घेणें पुण्यप्रद समतात. या दोन्ही उत्सवांतला देवीचा सोहळा खरोखरीच पहाण्याजोगा असतो.

श्री चतुःशृंगीदेवी पुण्यांत एका बाजूला डोंगरावर एका भक्तासाठीं अवतीर्ण झाली आणि म्हणूनच कीं काय राजेरजवाडे, सरदार, अमात्य या ठिकाणीं फारसे येत नसत. यामुळेंच कीं काय देवीचे अलंकार खूपच कमी आहेत. देवीला येणाऱ्या भेटींत साड्यांचाच भरणा जास्त असतो. देवस्थानाचें वार्षिक उत्पन्न अंदाजें पंधराशें-सोळाशें रुपयांचें आहे. खर्चहि जवळ जवळ तेवढाच आहे आणि त्यामुळें देवस्थानावर समितीची देखरेख ठेवणें क्रमप्राप्त ठरतें.

चतुःशृंगीदेवीचें देवस्थान जागृत आहे असें समजलें जातें. या जागृतपणाचा अनुभव भाविकांना वेळोवेळीं येतो. येथल्या पुजाऱ्यांना तर नित्य अनुभव येत असतो. नवरात्रांत देवीच्या पायऱ्यांवर शेंकडों भिक्षेकरी, आंधळे, पांगळे, लंगडे, थोटे, अनाथ, अपंग दाटीवाटीनें वस्ती करून रहातात. धो धो पडणाऱ्या पावसांतहि ते तिथेंच वस्ती करून रहातात, आडोशाला रहातात. परंतु त्यांपैकीं कुणा–कुणालाहि म्हणून सर्प, विंचू, कानेटी इत्यादि प्राण्यांपासून मुळीं सुद्धां उपसर्ग पोंचत नाहीं. एरवीं डोंगरावर व देवळाच्या आसपास साप हिंडता फिरतांना दिसतात, परंतु त्यांचा त्रास असा कुणालाच होत नाहीं.

यात्रेच्या वेळीं पुणें शहरांतीलच नव्हे, तर आसपासच्या खेड्यांतूनहि भाविक देवीच्या दर्शनास येतात व पांच–सहा लाखांवर यात्रा जाते. यात्रेला हिंदूच नव्हे तर अन्य धर्मीय लोक पण येत असतात. ही देवी नवसाला खात्रीनें पावते अशी भाविकांची दृढ श्रद्धा असल्यामुळें भाविक पंचामृत स्नानाचा अभिषेक किंवा अकरा एकादशींचा अभिषेक, लघुरुद्र, ओटी भरणें, लिंब नेसणें, पानांची प्रभावळ, फुलांचे हार, गोंधळ, बकरें किंवा कोंबडें देवीस सोडणें इत्यादि विविध प्रकारचे नवस करतात.

अशी आहे ही पुण्यनगरीची देवता श्री चतुःशृंगी आणि तिची आहे अशी कथा.

बोला श्री देवी चतुःशृंगी माता की जय !

# वणीची श्री सप्तशृंगी

आमच्या महाराष्ट्रांत देवीची कितीतरी परमपवित्र स्थानें आहेत. त्यांना शक्ति–पीठें असें म्हणतात. त्यापैकीं कांहीं स्थानें जागृत असल्याचा निर्वाळा भाविक पदोपदीं देत असतात. या शक्ति–पीठांत साडेतीन पीठें मुख्य मानतात. एक तुळजापूर, दुसरें माहूर, तिसरें कोल्हापूर आणि अर्धे चौथें सप्तशृंगी.

आज महाराष्ट्रांतील प्रमुख देवस्थानांत वणीच्या सप्तशृंगनिवासिनी महिषासुरमर्दिनीचा उदो उदो केला जातो. इतकेंच नव्हे तर कोल्हापूर, तुळजापूर व माहूर ऊर्फ मातापूर येथल्या तीन देवता म्हणजे या सप्तश्रृंगनिवासिनीच्या प्रतिमाच समजल्या जातात अशी श्रद्धा आहे.

वणी हें गांव नाशिक जिल्ह्यांत आहे आणि सप्तशृंगीचा डोंगरहि याच जिल्ह्यांत मोडतो. नाशिकहून कळवण रस्त्यानें नांदुरी हें गांव सुमारें तीस मैलांवर लागतें व हेंच गांव या सप्तशृंग डोंगराच्या पायथ्याशीं वसलेलें आहे. या डोंगराला सात शिखरें किंवा टोकें असल्यामुळें त्याला सप्तशृंग असें म्हणतात. हा डोंगर वणीचा डोंगर म्हणूनहि ज्ञात आहे. नाशिकहून वणी येथें जाण्यासाठीं एस. टी. च्या बसेस मिळतात. समुद्र सपाटीपासून ४६५९ फूट उंचीवर असलेल्या चांदोर पहाडावर ही देवी सप्तशृंगी निवास करून आहे. दिंडोरीपासून हें ठिकाण अवघें १५ मैलांवर आहे. सह्याद्रि पर्वत हा दक्षिणोत्तर पसरेला आहे. त्याचा उत्तरेकडील शिरोबिंदू म्हणजेच मांगेतुंगे पहाड होय. येथपासून



वणीची श्री सप्तशृंगी

दक्षिणेस सुमारें ६० मैलांवर पूर्व पश्चिम गेलेली सप्तशृंग पर्वताची लांबच लांब ( चांगली दहाहून अधिक मैलांची ) अशी ओळ मिळालेली आहे. याचा जो मिलनबिंदू तोच केमचा डोंगर होय. हा डोंगर गिरणा ( गिरजा ) नदीचें उगमस्थान होय. गिरिजा पुराणांत हा उल्लेख करण्यांत आलेला आहे.

वणीच्या या सप्तशृंगी देवीसंबंधीची जी कथा आहे ती थोडक्यांत अशी:

एकेकाळीं पृथ्वीतलावर दैत्यांचेंच जणूं साम्राज्य पसरलेलें होतें. असुरांच्या छळणुकीनें या पृथ्वीवरचे देवलोक अगदीं त्रस्त होऊन गेले, अक्षरशः गांजले. या राक्षसांचें पारिपत्य करण्यासाठीं ब्रह्मा, विष्णु व रुद्र यांनीं एक महान् शक्ति निर्माण केली. या शक्तीनें चार ठिकाणीं आपलें रूप प्रकट केलें. त्यापैकींच एक ठिकाण म्हणजे हा सप्तशृंग पर्वत होय. अन्य ठिकाणें म्हणजे तुळजापूर, कोल्हापूर व माहूर हीं होत.

दिंडोरी, कळवण आणि आसमंतांतील भागांत महिषासुर नांवाच्या दैत्यानें आणि त्याच्या दोघां भावांनीं मिळून देववृत्तीच्या लोकांना दे माय धरणी ठाय करून सोडलें होतें. देवीनें दोघां दैत्यांना ठार केल्यावर महिषासुराचा वध करणें तिला त्रासदायक वाटूं लागलें. कारण तो रेड्याच्या शरिरांत प्रवेश करून हा बलाढ्य राक्षस रहात होता. देवीनें दोघां दैत्यांना ठार केल्यावर हा तिसरा राक्षस रेड्याच्या शरिरांत रहातो हे तिनें हेरलें व त्या रेड्याचें शीर उडवून लावलें. त्याबरोबर महिषासुर रेड्याच्या शरिरांतून एवढ्या शीघ्र गतीनें निघाला कीं, त्या उड्डाणामुळें डोंगराला खिंडार पडलें. देवीच्या रोखानें चाल करून आपलें सैन्य घेऊन तो आला. देवीनें आपलीं विविध आयुधें महिषासुवर फेंकलीं. तिनें वाजविलेल्या रणघंटांच्या भयंकर आवाजानें कितीतरी असुर

मूर्च्छित पडले. तिच्या गदेच्या घावानें सैन्यांतले कित्येक राक्षस घायाळ झाले. तिच्या मुसळाच्या मारानें अनेक रक्त ओकूं लागले, अनेकांच्या माना तुटल्या, डोकीं फुटलीं. आपल्या सैन्याची अशी वाताहात झाल्यावर महिषासुर देवीच्या सिंहावर धांवून आला. तो रेड्यावर आरूढ झाला होता. देवीची व त्याची भयंकर लढाई झाली. देवीनें महिषासुरावर पाय देऊन दाबून धरलें. त्याचीं दोन्हीं शिंगें धरून ठेवलीं आणि आपल्या हातांतील तरवारीनें त्याचा शिरच्छेद केला आणि त्याबरोबरच मोठ्या कष्टानें त्या महिषासुराचा पण वध केला.

अशा प्रकारें महिषासुराचा वध केल्या दिवसापासून तों अगदीं आजतागायत देवीनें सप्तशृंगावर निवास केला आहे. डोंगराच्या पायथ्या-पासून पठारावर जाण्यास चांगल्या तरण्याताठ्या माणसास सुमारें पावणे-दोन तास सहज लागतात. डोंगरावर चढतांना पहिला चढ चढत असतांना राक्षसानें पाडलेलें खिंडार दिसतें. उंचच उंच पर्वतावर तें अजस्र खिंडार एखाद्या बोगद्याप्रमाणें वाटतें.

वणीच्या सप्तशृंगनिवासिनी देवीचें दर्शन घेण्यासाठीं डोंगर चढून वर जावें लागतें. हा डोंगर चढणें मोठें कष्टाचें आहे. परंतु देवीचें दर्शन घेण्यासाठीं चालतांना जेवढे कष्ट अधिक तेवढे पुण्य जास्त पदरीं पडते अशी भाविकांत श्रद्धा आहे. डोंगरावर जाण्यासाठीं बरेच मार्ग आहेत. पूर्वेकडून पायऱ्यांचा मार्ग आहे. परंतु त्या पायऱ्या उंच असल्यानें चढतांना फार दम लागतो. दक्षिणेकडून डोंगरांतून २५० पायऱ्या खोदून मार्ग केलेला आहे व तो पूर्वेच्या रस्त्यापेक्षां विशेष सोयीचा आहे. या पायऱ्या इ० स० १७६८ त नाशिकचे कान्हेरे, रुद्राजी व कृष्णाजी या तीन भावंडांनीं बांधल्या. या तिघां भावांचें आडनांव

रायाराव असें होतें. या पायऱ्यांचें बांधकाम इ. स. १७१८ ते इ. स. १८६९ पर्यंत चालू होतें. इ. स. १७६८ पासून पायऱ्यांचा वापर करण्यास सुरुवात झाली. पायऱ्यांच्या पायथ्याशीं वरील तिघां भावांनीं एक धर्मशाळा, त्याच्याजवळ एक गणपतीचें देऊळ व रामतीर्थ नांवाचें एक कुंड यांची बांधणी केली. पायऱ्या चढून पठारापर्यंत जातां येते. वाटेंत अधेमधें एक संस्कृत व पांच मराठी असे शिलालेख आहेत व त्यांत बांधकामासंबंधाची माहिती दिलेली आहे.

३५० पायऱ्यांचा पहिला टप्पा चढून वरती गेल्यावर ४७२ पायऱ्यांचा दुसरा टप्पा चढून वर जावें लागतें. या पायऱ्या तळेगांव–दाभाडे येथले पेशवाईतील एक प्रसिद्ध सरदार खंडेराव दाभाडे यांच्या पत्नी उमाबाई दाभाडे हिनें इ. स. १७१० मध्यें बांधल्या.

सप्तशृंगीचा पहिला चढ चढून गेल्यावर मात्र रस्ता सोपा आहे; व आवतीभोंवतींचा निसर्गहि नितांत रम्य आहे. चढण चढतांना पायाखालीं पाहून चाललें कीं, छातीवर पडणारें चढावाचें दडपण बऱ्याच अंशीं नाहींसें होतें. निसर्गाचें वातावरण तर पुढें पुढें आणखीन् रम्य होत जातें. एका बाजूला खोल दरी व दुसऱ्या बाजूला उंचच उंच डोंगरमाथा. अशा रस्त्यानें जातांना हौशी प्रवाशाला मोठा आनंद वाटतो. डोंगरमाथ्यावर आल्यावर विस्तृत पठारें दिसतात व त्यावर शंकराच्या पिंडीसारखे पुन्हां उंचच उंच डोंगर दिसतात. येथूनच समोर असलेलें सह्याद्रीचें सर्वांत उंच शिखर कळसूबाई जें ५४२७ फूट उंच आहे तें दिसतें व रांगामागें रांगा पाहून सह्याद्रीच्या विस्ताराची चांगलीच कल्पना येते.

सप्तशृंगीचा डोंगर ४६५९ फूट उंच असून त्यावर सर्व बाजूंनीं जणूं काटकोनांत कापावा असा ९०० फूट उंचीचा उंच डोंगर आहे.

सप्तशृंगीचा डोंगर चांदोर म्हणजे डोंगराचा एक अर्धा मैल लांबीचा भाग आहे. त्याच्या तीन बाजूनें सरळ कडे असून, चौथ्या बाजूनें त्याची थोडीशी पडझड झालेली दिसते. या वरच्या डोंगरावर मात्र एकहि झाड नाहीं याचें आश्चर्य वाटतें. खुरटें गवत अधूनमधून मात्र दिसतें तेवढेंच काय तें. डोंगराच्या बाजूला उंचच उंच शिखरें आहेत. पण तीं सात मात्र नाहींत. चार स्पष्ट दिसतात व त्यावरून हा डोंगर चतुःशृंगी म्हणूनहि ओळखला जातो. या डोंगराबद्दल एक मजेशीर आख्यायिका प्रसिद्ध आहे.

सीतेच्या मुक्ततेसाठीं प्रभु रामचंद्रानें लंकेचा राजा जो रावण याच्या बरोबर लढाई केली. त्यावेळीं इंद्रजिताच्या दिव्यशक्तीनें रामचंद्राचा बंधु लक्ष्मण घायाळ झाला. लक्ष्मणाला जीवंत पुन्हां कसा करतां येईल याकडे साऱ्यांचेंच लक्ष होतें. त्याला जीवंत करण्यास सहाय्य करणारी वनस्पति मेरू पर्वतावर होती व ती आणण्याची कामगिरी प्रभूचे एकनिष्ठ सेवक हनुमानजी याच्यावर पडली. भूभूःकार करीत हनुमान पर्वतावर गेला खरा; परंतु नेमकी वनस्पति कोणती तें ओळखतां न आल्यानें त्यानें पर्वत शिखरच उपटलें व तें लंकेकडे चालविलें. पण वाटेंत त्यांतला एक शिलाखंड पडला तोच हा सप्तशृंगीचा डोंगर होय.

या सप्तशृंगीच्या पठारावर फारशीं लोकवस्ती नाहीं. पंचवीस तीस घरें असतील नसतील तेवढीच काय तीं. पठारावर भरपूर पाण्यानें भरलेलीं आणि काळ्या दगडांनीं बांधलेलीं अशी एकापेक्षां एक सरस अशीं आठ कुंडें आहेत. त्यापैकीं पांच छोटीं आहेत व तीन मोठीं आहेत. सरस्वती, लक्ष्मी, तांबूल, अंबालंय आणि शितला हीं पांच कुंडें आहेत तर कालि-कुंड, सूर्यकुंड व दत्तात्रेय हीं तीन कुंडें मोठीं आहेत. या आठ कुंडां-

बरोबरच शिवालय नांवाचें आणखीन् एक कुंड तिथें आहे. तें चांगलें मोठें असून त्याची खोली चार फूट आणि क्षेत्रफळ चाळीस चौरस वार आहे. तें दगडानें बांधलेलें असून यात्रेकरू येथेंच स्नान करतात. या कुंडांत उतरण्यास पायऱ्या आहेत. कुंडांतील पाणी गोड व स्वच्छ आहे. या कुंडाजवळच सिद्धेश्वर महादेवाचें हेमाडपंती पद्धतीचें मंदिर आहे.

दररोज देवीला सूर्यकुंडांतील पाण्यानें स्नान घातलें जातें. शिवालय तीर्थाच्या पलिकडे खोल सरळ कडा असून त्याची खोली सुमारें १२०० फूट आहे. पूर्वीं येथून नरबळी दिले जात असत. सध्यां फक्त बोकडाचा बळी देवीला दिला जातो. देवीच्या मंदिरांत जाईतोंपर्यंत पायऱ्या आहेत, परंतु डोंगर शिखरावर मात्र जाण्यास नाहींत. डोंगर शिखरावर जाण्यास सोयीचा रस्ता पण नाहीं. डोंगरमाथ्यावर एक पांढरा खांब मात्र आहे व त्यावर चैत्री पौर्णिमेला देवीचा ध्वज लावला जातो. डोंगरमाथ्यावर जाण्यासाठीं सरळ कडा वर चढून जाणें म्हणजे अक्षरशः एक प्रकारचा प्राणाशीं खेळ खेळणें होय. पण हें बिकट काम डोंगराच्या पायथ्याजवळील बुटीगांव नामक गांवच्या पाटलाचीं मुलें वंशपरंपरेनें करीत आलेलीं आहेत. हा माणूस चैत्री पौर्णिमेस रात्रीं वरती चढतो व पहांटे देवीचा ध्वज फडकावतो. तो कसा काय वर चढतो हें एक गूढ आहे. या रहस्याचा छडा लावण्याचा कुणी प्रयत्न केला तर त्याची दृष्टि साफ जाते अशी समजूत आहे. मि. डब्ल्यू रॅम्से या एका पाश्चात्य संशोधकानें दुर्बिणींतून या माणसास चढतांना पाहिलें तेव्हां त्याला असें दिसलें कीं,, तो उभ्या खोदीव पायऱ्यांच्या रस्त्यानें वर वर चढतो. हा मार्ग अतिशय बिकट आहे. देवीच्या कृपेमुळेंच त्याला हें काम करतां येते अशी भावना आहे.

चढावाच्या दुसऱ्या टप्प्याच्या ४७२ पायऱ्या चढून गेल्यावर दोन शिखरांच्या मध्यें गुहेसारख्या भागांत आंत गेल्यावर देवीचें मंदिर लागतें. देऊळ लहानसेंच आहे व तें डोंगराच्या भिंतींतच कोरलेलें आहे. देवळाच्या समोरच काळ्या दगडाची फरसबंदी असून, तिथें शेंदूरचर्चित त्रिशूळ उभा आहे. पायऱ्या चढून देवळांत प्रवेश करतांच महिषासुर-मर्दिनी सप्तशृंगीची भव्य, उग्र मूर्ति दिसते. ती नैसर्गिक डोंगरी दगडांत कोरलेली असून तिची उंची आठ फूट आहे. तिच्या सर्वांगाला शेंदूर फांसलेला आहे. आणि मस्तकावर जडाव काम केलेला उंच मुकुट आहे. प्रत्येक बाजूला नऊ नऊ असे एकंदर अठरा हात तिला आहेत व प्रत्येक हातांत कांहीं ना कांहींतरी आयुध आहे. रुद्राक्षांची माळ, कुऱ्हाड, गदा, बाण, वज्र, कमल, धनुष्य, जलयंत्र, दंड, शक्ति, तरवार, ढाल, शंख, घंटा, मद्यपात्र, शूल, पाश आणि चक्र अशीं अठरा आयुधें तिनें हातांत घेतलेलीं आहेत. देवीची पूजा शिडी लावून करावी लागते. मूर्तीला रोज थंड पाण्यानें स्नान घातलें जातें. फक्त दर मंगळवारीं व शुक्रवारीं तिला गरम पाण्यानें स्नान घातलें जातें. देवीला अभिषेकाचा विधि झाल्यावर तिला नखशिखान्त शेंदूर फांसण्यांत येतो, पापण्या व भुंवया रंगानें कोरण्यांत येतात नि कपाळावर ठसठशीत कुंकू लावण्यांत येते. नंतर कोरलेल्या देवीच्या अंगांत चोळी व कटीला वस्त्र व डोक्यावर मुकुट चढविण्यांत येतो.

नाकांत चांदीची नथ व गळ्यांत गळसरी हे तिचे रोजचे अलंकार होत. उत्सवाच्या प्रसंगीं मात्र अनेक अलंकार तिच्यावर चढवितात. वस्त्र आणि अलंकार यांनीं अशा प्रकारें सजविलेली देवी मंदस्मित करीत आहे असेंच पहाणाऱ्या भक्ताला वाटते. देवीला रोज खीर आणि पुरीचा

नैवेद्य दाखविला जातो. देवीच्या सभोंवतीं समया तेवत असतात. वरती घंटा आणि झुंबरें टांगलेलीं आहेत. घंटा आणि झांजांच्या निनादांत देवीची आरती नेहमी तीनदां होत असते.

सप्तशृंगीचें महात्म्य फार जुनें आहे. तिचा महिमा ज्यांत वर्णिलेला आहे त्याला 'सप्तशृंगी पाठावली' असें म्हणतात. सध्यांचें देवीचें मंदिर श्री. विंचूरकरांनीं बांधलें व दुसऱ्या बाजीरावानें देवीच्या उत्पन्नासाठीं चंडकपूर नांवाचें गांव इनाम दिलें. ज्या सौभग्यवतींना अपत्यप्राप्ति नाहीं त्या या देवीजवळ नवस करतात व त्यांना मनोवांच्छित अपत्यप्राप्ति होते. आजारी माणसें रोगमुक्त होण्यासाठीं देवीच्या दर्शनास येतात. देवी जागृत असून नवसाला ती पावते अशी भाविकांची गाढ श्रद्धा आहे.

देवीची यात्रा चैत्र शुद्ध पौर्णिमेपासून आठवडाभर व नवरात्रांत—आश्विनांत—दहा दिवस भरते. महाराष्ट्रांतील अनेक कुटुंबांची ही देवी कुलदेवता आहे. विशेषतः वारली, कोळी व खानदेशांतील शेतकरी या देवीचे मोठे भक्त असून त्यांचाच मेळावा यात्रेच्या वेळीं दिसतो. नवस फेडण्यासाठीं सुद्धां या प्रसंगीं लांबून भाविक येतात व देवीदर्शनानें कृतकृत्य होतात. चैत्री पौर्णिमेची देवीची यात्रा अर्ध्या लाखावर जाते.

या सप्तशृंगनिवासिनीच्या पठारावर पूर्वेच्या बाजूला कांहीं अंतरावर समुद्र सपाटीपासून ४२८४ फूट उंचीचा मारकिडा ऊर्फ मार्कंडेय नांवाचा डोंगर आहे. येथें मार्कंडेय मुनी पवित्र अंतःकरणानें महालक्ष्मी सप्तशृंगीची मोठ्या भक्तिभावानें प्रार्थना करीत असतात अशी समजूत आहे. मारकिडा डोंगराचें व सप्तशृंगीचें पठार एकाच पातळींत दिसत असलें तरी मारकिडा कमी उंचीचा आहे. मार्कंडेयानीं येथें तपश्चर्या केली व भीमासुराला देवीनें मारावें यासाठीं येथें सप्तशृंगीचा पाठ

म्हटला अशी पुराणकथा आहे. आजहि मुनीमहाशय तो पाठ म्हणत असतात व तो देवी ऐकते असें मानलें जातें. देवीनें एक हात मानेशीं धरला असून, ती कांहीतरी ऐकत उभें रहावें अशा थाटांत आहे.

देवीचें महाम्य वर्णन करणारा जो ग्रंथ आहे त्याचें नांव 'सप्तशती' या ग्रंथांत देवीचा पराक्रम वर्णिलेला असून मार्कंडेय ऋषीचें अस्तित्वहि सांगितलेलें आहे. ही देवी काली, महाकाली, भद्रकाली, कपालिनी, चामुंडा, दुर्गा, चंडिका इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध आहे. 'सप्तशती' तील तिच्या संबंधीची कथा थोडक्यांत अशी :

सुरथ नांवाचा राजा प्राचीन काळीं होऊन गेला. तो मोठा नीतीनें वागणारा सदाचरणी राजा होता. या राजावर एकदां जबरदस्त संकट ओढवलें. त्याच्यावर परचक्र आलें आणि अगदीं याचवेळीं त्याचे प्रधान शत्रूला सामील झाले. राजाचा अर्थात्च पराभव झाला आणि त्याला परगंदा व्हावें लागलें. परंतु अशाहि परिस्थितींत त्याला आपल्या प्रधानांच्याबद्दल आदर आणि आपुलकी वाटत होती. दारुण परिस्थितींत तो हिंडत फिरत असतांना त्याला समाधी नांवाचा एक वैश्य भेटला. तो चांगला श्रीमंत होता, परंतु पैशाच्या अति लोभामुळें बायका–मुलांनीं त्याला घराबाहेर हांकलून दिलें होतें. परंतु असें असूनहि समाधीला आपल्या बायको–मुलांबद्दल मोठें प्रेम वाटे. अशा प्रकारें समाधीला आणि सुरथ राजाला तें समदुःखी होऊन हिंडत असतांना मार्कंडेय मुनी भेटले. त्या उभयतांनीं आपली व्यथा, दुःख मुनीमहाशयांना कथन केलें. मुनींनी त्यांना या पर्वतावरील सप्तशृंगीदेवीची उपासना करण्याचा उपदेश केला. ती त्यांनीं अनन्यभावें केली व ते संकटांतून अल्पकाळांतच मुक्त झालें. अशी कथा आहे.

सुप्रसिद्ध शहाजीकालीन कवी जयराम पिंड्ये हे सप्तशृंगीच्या समोरील मार्कंडेय डोंगरासमोरच्या गांवचे रहाणारे होत. त्यांनीं ‘राधा-माधव विलास चंपू’ नांवाचा काव्यग्रंथ लिहिला.

सुप्रसिद्ध संत श्री एकनाथ यांच्या काळांत होऊन गेलेल्या बालबोध कर्ते त्र्यंबकराज यांच्या ग्रंथांत श्री सप्तशृंगीचा उल्लेख आहे. त्र्यंबकराज हे देवीचें अनुष्ठान करण्यासाठीं तुळजापूर येथील भवानी मंदिरांत जाऊन बसले. उपासनेच्या सोळाव्या रात्रीं देवीनें त्र्यंबकराजांना दृष्टान्त दिला. पांच वर्षांच्या मुलीचें रूप घेऊन ती आली व त्यांना म्हणाली, तूं “आतां सप्तशृंगीस जाऊन उपासना करावीस हें चांगलें. तेव्हां त्र्यंबकराज सप्तशृंगीस आले व उपासना करूं लागले.” तिसऱ्याच दिवशीं सप्तशृंगी त्यांना प्रसन्न झाली व वर माग म्हणाली. त्र्यंबकराजांनीं तिच्यापाशीं ब्रह्मज्ञान मागितलें. सप्तशृंगीनें त्र्यंबकराजांच्या मस्तकाला स्पर्श करून शुभ आशीर्वाद दिला. तेवढ्यांत भगवान शिवशंकर तिथें एका वृद्धाच्या रूपानें आले. त्यांनीं त्र्यंबकराजांना पांच वचनें सांगितलीं. त्यांचाच विस्तार पुढें त्र्यंबकराजांनीं आपल्या बालबोध या ग्रंथांत केलेला आहे. हा ग्रंथ शके १५०० च्या आसपास लिहिण्यांत आला. त्र्यंबकराजांनीं सप्तशृंगीच्या कृपेची ही हकीगत आपल्या बालबोध ग्रंथांत विस्तारानें कथन केली आहे.

महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर यांच्या महानुभाव वाङ्मयांतूनहि सप्तशृंगीबद्दलचे उल्लेख आढळतात. कवि मुकुंद व अव्वल इंग्रजी जमान्यांतील कवि संत श्री निरंजन रघुनाथ यांनींहि देवीचीं स्तुतिपर गीतें रचलेलीं आहेत व तिला त्यांतून आळविलें आहे. महानुभाव वाङ्मयांत सप्तशृंगी हा द्रोणागिरीचा एक भाग आहे, असें उल्लेखिलेलें आहे.

इ. सं. १७२० ते १७४० या काळांत देवीची सेवा करण्यासाठीं गौडस्वामी नामक एक बंगाली येथें येऊन राहिले होते. त्यावेळीं कितीतरी


सरदार त्यांचे शिष्य होते. त्यांचा छत्रसिंग नांवाचा एक पट्टशिष्य होता. डांगमधल्या मेहवासी टोळ्या येथें येणाऱ्या यात्रेकरूंना लुटत असत. त्यांचें पारिपत्य करण्याकरितां म्हणून पेशव्यांनीं छत्रसिंगाच्या वाडवडिलांकडे ही कामगिरी सोंपविली होती. वेतन म्हणून त्यांना बावीस गांवचें उत्पन्न दिलें होतें. पणं कां कुणास ठाऊक छत्रसिंग बिथरला व तोच टोळीकरांचा पुढारी बनला. १७८५ मध्यें त्यानें अनेक यात्रेकरूंना लुबाडलें व देवीची दौलत सुद्धां लांबविली. हिंमतराव नाईक नांवाचे सरदार त्याचें पारिपत्य करण्यासाठीं गेले असतां शिवालय तीर्थाजवळ ते जखमी झाले. शेवटीं देवीच्या रक्षकांनीं छत्रसिंगाबरोबर तह केला व ४६ मंगळवार, १२ पौर्णिमा, नवरात्राचे नऊ दिवस व चैत्र एकादशी ते पौर्णिमा हे पांच दिवस असे मिळून ७२ दिवस देवीच्या पुढ्यांत जें उत्पन्न येईल त्यांतलें निम्में छत्रसिंगास देण्याचें ठरविलें. पुढें छत्रसिंगाचा मुलगा देवीसिंह हा निपुत्रिक मरण पावला आणि तो हिस्सा आपोआप थांबला. याहि पूर्वीं शके १५३२ म्हणजे इ. स. १६१० मध्यें देवीच्या उत्पन्नाबद्दल त्यावेळचे पुजारी गोपाळभट व भोपे गुरव यांच्यामध्यें जोरदार भांडण झाले होतें असा दाखला सांपडतो.

सप्तशृंगीच्या टेकडीचें किंवा डोंगराचें महत्त्व फार प्राचीन काळापासून आहे. इ. स. ८८० मध्यें राष्ट्रकूट वंशांतील राजा तिसरा गोविंद याच्या कारकिर्दींतील ही टेकडी राजधानीचें ठिकाण असावें किंवा महत्त्वाचें ठाणें असावें याला आधार सांपडतो. पेशवाईनंतर या ठिकाणीं लष्करी तळ असे. अशी ही सप्तशृंगीदेवी मूळची जैनांची कीं हिंदूंची ( ब्राम्हणांची ) याबद्दल संशोधन चालू आहे.

# माहूरची श्री रेणुकामाता

प्राचीन काळीं ध्यानस्थ बसावयाचें झालें तर जनसंमर्दापासून दूर व नैसर्गिक शोभेनें मंडित झालेलीं स्थळें निवडण्याची प्रथा होती. दूरदूरच्या डोंगरदऱ्यांतून आणि कड्या–कपारींतून अशीं अनेक तपोवनें आजहि पहावयास सांपडतात. सह्याद्रि पर्वताच्या माथ्यावर वसलेलें श्रीक्षेत्र माहूर ऊर्फ मातापूर हें यापैकींच एक प्राचीन ठिकाण आहे. या क्षेत्राचा उल्लेख भागवत पुराण, मार्कंडेय पुराण, गुरुचरित्र व दत्त महात्म्य इत्यादि धर्मग्रंथांतून करण्यांत आलेला आहे. या क्षेत्रांतील सर्व देवस्थानें, तपोवनें उंच उंच डोंगरावर व त्याच्या माथ्यावरील पठारावर वसलेलीं आहेत. येथील सर्व डोंगर विविध प्रकारच्या वनस्पतींनीं, लता–वेलींनीं आणि फळा–फुलांनीं बहरलेले असतात.

माहूर या क्षेत्रानजिकच्या डोंगरावर चार उंच टेकड्या आहेत. त्यापैकीं एका टेकडीवर श्री अत्री महामुनी व त्यांची पत्नी अनुसूया यांचे आश्रम असून दुसऱ्या टेकडीवर श्रीदत्त महाराजांचा आश्रम आहे. तिसऱ्या टेकडीवर श्री जमदग्नी ऋषीचा आश्रम व परमपवित्र श्री रेणुकादेवीचें देवालय आहे. याच ठिंकाणीं श्री जमदग्नी पुत्र, परशुराम याचें देवालय व विश्रामस्थान आहे. या टेकडीवर अनेक पवित्र तीर्थें असून त्या सर्वांचें वर्णन 'मातापूर कथासार' या ग्रंथांतून देण्यांत आलेलें आहे. चौथ्या टेकडीवर श्री महाकालीचें देवालय असून किल्ला पण आहे त्याला 'माहूर गड' असें म्हणतात.



माहूरची श्री रेणुकामाता

आज माहूर महाराष्ट्र राज्यांत सामील करण्यांत आलेलें असून, मराठवाडा व विदर्भ यांच्या सीमेवर हें क्षेत्र वसलेलें आहे. अदिलाबाद जिल्ह्यांतील किनवट तालुक्यांत डोंगरी भागांत हें क्षेत्र वसलेलें असून, समुद्र सपाटीपासून तें अडीच हजार फूट उंचीवर आहे. तेथील वस्ती सुमारें तीन हजारांच्या आसपास भरेल. किनवट, सहस्त्रकुंड, अदिलाबाद, यवतमाळ, काफेश्वर, पुसद या स्थानांवरून माहूरकडे जातां येते. आज माहूरचें वर्णन करावयाचें झाल्यास तें एक सह्याद्रि पर्वताच्या पायथ्याशीं वसलेलें जुनें खेडें आहे, असें म्हणतां येईल. तिथें शहरांतील कोणत्याहि सुखसोयी नाहींत. फक्त मुलांच्यां शाळा, पोस्ट कचेरी व यात्रेकरूंच्या गरजा भागविण्यासाठीं उघडलेलीं कांहीं दुकानें दिसतात. गांव अगदीं मागासलेला असून, ऐतिहासिक कालांतील वैभवाचीं कांहीं सुद्धां स्मृति-चिन्हें तिथें दिसून येत नाहींत. सर्व प्रदेश रूक्ष व डोंगराळ आहे. गांवांत ब्राह्मणांची वस्ती अधिक असून, त्यांचा उदरानिर्वाह क्षेत्राच्या कमाईवरच चालतो, असें म्हटल्यास चुकीचें ठरणार नाहीं. या देव-स्थानाकडे जाण्यास वहानांचा फारसा उपयोग होत नाहीं. कारण डोंगरां-तील रस्ते खडकाळ आहे व त्यावरून वहानें नेणें गैरसोयीचें व त्रास-दायक होतें. तथापि सरकारी अधिकाऱ्यांच्या जीपगाड्या डोंगर चढून जातात. एकाकाळीं माहूरचें लष्करी महत्त्व बरेंच होतें, पण तें आतां नष्ट झालें असलें तरी त्याचें धार्मिक महत्त्व मात्र कायम आहे.

माहूर या क्षेत्राचीं नांवें प्रत्येक युगांत निरनिराळीं होतीं. कृत युगांत त्यास आमली ग्राम, त्रेता युगांत सिद्धपूर, द्वापार युगांत देवनगर आणि कलि युगांत मातापूर ऊर्फ माहूर असें या क्षेत्राला म्हणतात. मातापूर या शब्दापासून मराठींत माहूर हा शब्द रूढ झाला आहे. काशी-

क्षेत्राहून जास्त महात्म्य ह्या क्षेत्राचें सांगितलेलें असल्यामुळें माहूरला 'जवा आगळी काशी' असें म्हणतात. काशीक्षेत्रांचें जसे काळभैरव तसे ह्या क्षेत्रांत झंपटनाथ हें शहर-कोतवाल आहेत. झंपटनाथाचें दर्शन केल्याशिवाय ह्या क्षेत्राची यात्रा सफल होत नाहीं, असा समज आहे.

महाराष्ट्रांत आदि अंबेची, शक्तिदेवीची उपासना या ना त्या नांवानें सर्वत्र चालू आहे. या आदिशक्तीची औट किंवा साडेतीन पिठें सर्वत्र मान्यता पावलेलीं आहेत. पहिलें पीठ-तुळजा भवानी, दुसरें पीठ-योगेश्वरी, अंबेजोगाई, तिसरें पीठ–हें रेणुकेचें मातापूर ऊर्फ माहूर व चौथें अर्धें पीठ–महालक्ष्मीचें कोल्हापूर. तेव्हां देवीच्या साडेतीन पीठांत माहूर प्रसिद्ध आहे. अठरा पुराणांपैकीं स्कंद पुराण हें फार विस्तृत पुराण आहे. त्यापैकीं केदार खण्ड, काशी खण्ड, रेवा खण्ड इत्यादि बरेच खण्ड आहेत. त्यापैकीं सह्याद्रि खंडांत रेणुका महात्म्य आणि कालिका खंडांत आमली ग्राम ऊर्फ माहूर महात्म्य असे दोन भाग आहेत.

भगवान विष्णूनीं ब्रह्मदेवाला सृष्टि निर्माण करण्याची आज्ञा केली तेव्हां ब्रह्मदेवाला ती सृष्टि कशी उत्पन्न करावी तें समजेचना. तेव्हां सर्व सृष्टीचा नमुना म्हणून एक नकाशा त्यानें काढला. हा नकाशा म्हणजेच माहूर क्षेत्र, जें सृष्टीच्या अगोदर भगवान श्री विष्णूनीं उत्पन्न केलें आणि आपल्या सुदर्शन चक्राचा ह्या क्षेत्राला आधार दिला. ह्या क्षेत्रांतील रचना पाहून ब्रह्मदेवानें सर्व सृष्टि निर्माण केली. हें क्षेत्र सात कोस लांब व सात कोस रूंद आहे. ह्या क्षेत्राला चार दरवाजे आहेत. ते असे– (१) पूर्वेकडे हाटकेश्वर, (२) दक्षिणेकडे विमलेश्वर, (३) पश्चिमेकडे दर्दुरेश्वर व (४) उत्तरेकडे सिद्धेश्वर.

या माहूर क्षेत्राच्या तीन बाजूला पैनगंगा नदीचा वेढा आहे. वऱ्हाडांत लोणार क्षेत्र आहे. तिथें श्री विष्णूनीं लवणासुराला मारलें त्यावेळीं ब्रह्मदेवांनीं मोठ्या भक्तिभावानें भगवंताची पूजा–अर्चा केली. ब्रह्मदेवानीं आपल्या कमंडलूंतील पाण्यानें भगवंताचे पाय धुतले तेव्हां भगवंताचें जें चरणतीर्थ पृथ्वीवर वाहूं लागलें तीच ही पैनगंगा नदी. अशी ही परमपवित्र पैनगंगा ह्या क्षेत्राला जणूं कांहीं प्रदक्षिणाच घालीत आहे.

माहूरला जी परमपवित्र देवी आहे तिचें नांव आहे श्री रेणुका. कोंकणची रचना करणाऱ्या श्री परशुरामाची ही माता. तिला कामली व कुंकणा अशींहि नांवें होतीं असा उल्लेख सांपडतो. इक्ष्वाकू वंशांतील रेणू राजानें कन्या कामेष्टी यज्ञ केला असतांना त्याला ही कन्या प्राप्त झाली म्हणून तिला रेणुका हें नांव मिळालें. कर्नाटकांत या रेणुकेची उपासना यल्लामा या नांवानें प्रचलित आहे. 'यल्ल' म्हणचे सर्व व 'अम्मा' म्हणजे माता. अर्थात् 'यल्लमा' म्हणजे सर्वांची माता जगन्माता आणि म्हणूनच या स्थळास 'मातापूर' असें नांव देण्यांत आलें. या रेणुकेचा वारुळाशी संबंध जोडलेला आढळतो. रेणुका ही वारुळांतून जन्म पावली आणि वारुळांतच अखेरीस अदृश्य झाली अशी एक कथा कर्नाटकांत प्रचलित आहे.

रेणुकेनें स्वयंवरांत जमदग्नि मुनींना वरलें. विवाहानंतर तिला रुमण्वान, सुषेण, वसु, विश्वावसु, व परशुराम असे पांच पुत्र झाले. राजकन्या, ऋषिपत्नी आणि परशुरामासारख्या वीर पुरुषाची माता म्हणून तिची पौराणिक ग्रंथांतून ख्याति आहे. या रेणुकेचे पति जमदग्नि. अतिशय कोपिष्ट म्हणून प्रसिद्ध होते आणि या कोपिष्टाबरोबर दिवस कंठणें बिचाऱ्या रेणुकेला अतिशय कठीण जात होते. एकदां कांहीं कारणामुळें

जमदग्नि आपल्या पत्नीवर रागवले. इतकें कीं त्यांनीं रागाच्या भरांत आपल्या मुलांना माता रेणुकेचा शिरच्छेद करण्यास सांगितलें. परंतु कोणताच मुलगा पुढें येईना. शेवटीं परशुराम या गोष्टीस तयार झाला व त्यानें आपल्या पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानून रेणुकेचा तात्काळ शिरच्छेद केला. त्यामुळें जमदग्नि ऋषी संतुष्ट झाले व त्यांनीं परशुरामास 'वर माग' म्हणून सांगितलें. परशुरामानें आपली माता परत मिळावी म्हणून वर मागितला. जमदग्नीनें तो पूर्ण केला व रेणुकेस जीवंत केलें. तीच ही माहूरची रेणुकामाता होय.

पुढें एकदां परशुराम कैलास पर्वतावर गेला असतांना कृतवीर्य राजाचा पुत्र कार्तवीर्य सहस्रार्जुन शिकार करीत जमदग्नीच्या आश्रमांत आला. त्याच्याबरोबर प्रधान, रथ, घोडे, हत्ती आणि सैन्य अशी सारी संपत्ति होती. आपल्या आश्रमांत राजा आलेला पाहून जमदग्नीस आनंद झाला व त्यानें त्या सर्व मंडळींचा योग्य तो आदरसत्कार केला. अत्यंत अल्पावकाशांत सर्व मंडळींची अशी व्यवस्था झालेली बघून कार्तवीर्य राजाला अत्यंत आश्चर्य वाटलें. त्यानें शोध केल्यावर त्याला कळून आलें कीं, ऋषीच्या आश्रमांत कामधेनु आहे. तेव्हां ती कामधेनु राजानें नेण्याचा विचार चालविला; व तो बळजबरीनें धेनु नेऊं लागला. पण ती धेनु बिचारी गेली नाहीं. राजाला अत्यंत राग आला व त्यानें पुढचामागचा कांहींएक विचार न करतां तरवारीनें जमदग्नीस मारण्यास सुरुवात केली. तें पाहतांच रेणुका आडवी आली. राजानें तिच्यावर तलवारीचे एकवीस घाव घातले आणि ऋषींना ठार मारून तो गाय घेऊन चालता झाला. परंतु गायीनें आपल्या शरीरांतून खूप सैन्य निर्माण केलें. त्या सैन्यानें राजाच्या सैन्याचा पराभव केला व राजाच्या हातून ती निसटून स्वर्गाला निघून गेली.

आपल्या पतीदेवाची अशी ही वाट लागलेली पाहून रेणुका रडूं लागली व तिनें आपला मुलगा परशुराम याचा धांवा केला. तो तिथें आला व राजाला मारण्याची व पृथ्वी एकवीस वेळां निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा केली. एकवीस वेळां रेणुकेवर घाव घातले गेले म्हणून त्यानें एकवीस वेळां पृथ्वीवरून क्षत्रियांना घालवून दिले.

परशुराम आल्यावर रेणुका त्यास म्हणाली, "मी आतां मृत पतीबरोबर सती जाते. आम्हांला अग्नि देऊन तूं आपली प्रतिज्ञा पूर्ण कर. पण जिथें आम्हाला अग्नि देणार ती भूमि कोरी पाहिजे. म्हणजे आजपर्यंत त्या भूमीचा कुणी उपभोग घेतलेला नसला पाहिजे. तूं एक कावड घे. एका बाजूला ऋषींना ठेव आणि दुसऱ्या बाजूला मला ठेव. मग ती खांद्यावर घेऊन तीर्थाटनें करीत जा; आणि ज्या ठिकाणीं आकाशवाणी होईल तिथें ती कावड ठेव व ती भूमि कोरी आहे असें समज. त्या ठिकाणीं श्री दत्तात्रेय मंत्र सांगण्याचें काम करण्यासाठीं भेटतील. त्यांच्या सांगण्याप्रमाणें पुढें तूं सारे ते संस्कार कर!"

रेणुकेच्या सांगण्याप्रमाणें परशुराम कावड घेऊन तीर्थक्षेत्रें हिंडत फिरत होता. तो या सह्याद्रि पर्वतावर श्री दत्तात्रेयांच्या आश्रमापाशीं आल्यावर आकाशवाणी झाली कीं, "परशुरामा, कावड खालीं ठेव" त्याप्रमाणें परशुरामानें कावड खालीं ठेवली. त्याला श्री दत्तात्रेयांचें दर्शन झालें. नंतर परशुरामानें बाण मारून सर्व तीर्थें त्या ठिकाणीं आणलीं तेंच ठिकाण आज सर्व–तीर्थ म्हणून प्रसिद्ध आहे. परशुरामानें तिथें स्नान करून दत्तात्रेयांच्या सांगण्याप्रमाणें त्यानें मातापितरांना अग्नि दिला. रेणुका ज्या ठिकाणीं सती गेली त्या ठिकाणाला मूळदरी असें म्हणतात.

रेणुका सती जाऊं लागली तेव्हां परशुरामास अतिशय वाईट वाटलें. त्याचा तो दुःखी कष्टी चेहरा पाहून रेणुका त्याला म्हणाली, "परशुरामा, तूं कष्टी होऊं नकोस. माझा व ऋषींचा नाश या पृथ्वीतलावर कुणीच करूं शकणार नाहीं. तूं एक महिनाभर थांब आणि याच ठिकाणीं आम्हाला हांक मार म्हणजे आम्ही दोघंहि तुला पूर्वींप्रमाणेंच दर्शन देऊं."

परशुरामानें दत्तात्रेयांच्या सांगण्याप्रमाणें मातापित्यांचे दिवस-वार केले. तेरा दिवस झाल्यावर मग त्याला कांहीं राहावेना आणि त्यानें आपल्या मातापित्यांना हांका मारण्यास सुरुवात केली. तेव्हां रेणुका व जमदग्नि पुन्हां प्रकट झाले. परंतु रेणुकेनें सांगितल्याप्रमाणें परशुरामानें महिनाभर वाट पाहिली नाहीं. तेव्हां रेणुका पूर्ण स्वरूपांत बाहेर आली नाहीं तर ती गळ्यापर्यंतच निघाली. परशुरामाच्या अधीरपणामुळें रेणुकेची ही अशी अवस्था झाली. त्याच्या कळवळून मारलेल्या हांकेसरशी तिचा शिरोभाग तेवढा रेणूंतून म्हणजे भूमींतून, धुळीकणांतून प्रगट झाला आणि 'काय रे बाळा' असा प्रतिसाद त्याच्या हांकेला मिळाला. परशुरामानें रेणुकेची त्या तशा स्थितीतच मूळ पीठावर आणि जमदग्नीची खोरींत स्थापना केली. राजाचा नाश केला आणि एकवीस वेळां पृथ्वीवरून क्षत्रियांचा निःपात केला. परशुरामानें माहूरला येऊन राजाच्या रक्तानें रेणुकेला स्नान घातलें. नंतर रेणुकेच्या आज्ञेवरून गणपतीच्या स्वरूपांत तो तिथेंच राहिला. रेणुका मंदिराच्या जवळच दक्षिण दिशेला पन्नासएक पायऱ्या उतरून गेल्यावर परशुरामाचें एक स्वतंत्र मंदिरहि तिथें दृष्टीस पडतें.

माहूरच्या श्री रेणुकेचें मंदिर माहूरच्या किल्ल्याजवळ आहे. खुद्द गांवापासून तें सुमारें चार मैलांवर असेल. या मंदिराकडे जाण्यासाठीं पायऱ्या बांधलेल्या आहेत. हजार–दीड हजार पायऱ्या चढून गेल्यावर

रेणुकेचें देवालय लागतें. हें देवस्थान डोंगरांत मैल-दीड मैल उंचीवर आहे. प्रथम रेणुकेच्या पादुका चढतांना लागतात. आणखीन् कांहीं पायऱ्या चढून गेलें कीं, रेणुका मंदिर लागतें. मंदिरांत प्रवेश करण्या-पूर्वीं एक पिंपळाचें झाड लागतें. या झाडाखालीं जमदग्नि ऋषीची स्मृति म्हणून एक शिवलिंग आहे. या लिंगाला वंदन करूनच मग रेणुकेच्या मंदिरांत शिरावें लागतें असा येथला शिरस्ता आहे. मूळ देवालय एका मोठ्या खोली एवढें आहे. देवळाचे प्राकार व शिखर हीं मागावून बांधलीं असावींत. देवळाचें शिखर अगदीं थेट तुळजापूरच्या भवानीमातेच्या देवळाच्या शिखराप्रमाणेंच आहे. देवळाच्या खोलींत देवीचा एक प्रचंड मुखवटा असून तो सदैव शेंदूरचर्चित असा असतो. या मूर्तीवर चांदीचा टोप बसविलेला आहे. देवीच्या मुखाची उग्रता आणि भव्यता सहजासहजी दर्शन घेतांना सुद्धां लक्षांत येते.

श्री रेणुकेचें मंदिर अनादि कालापासून येथें असावें असें सांगण्यांत येतें. या देवालयाचा विस्तार साडेतीनशें वर्षांपूर्वीं शालिवाहन राजानें इ. स. १६२४ च्या सुमारास केला. मंदिराचे वास्तु शिल्प प्राचीन पद्धतीचेच आहे. देवळांतील संगमरवरी काम अलिकडचें आहे. संत विष्णुदासांचे एक परमभक्त श्री गणपतराव मडके यांनीं मंदिरांत उत्तम लादी बसविलेली आहे. त्यामुळें मंदिरांत चांगलीच सोय झालेली आहे. देवळाचा दरवाजा चांदीचा आहे. देवालय उंच टेकडीवर असल्यामुळें तेथून खालील देखावा किंवा सभोंवतालचें दृश्य, विस्तीर्ण प्रदेशांतील वनश्रीची शोभा अवर्णनीय वाटते. जशी कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरचीं भवानीदेवी तशीच माहूरची रेणुकामाता होय. संत कवींनीं रेणुकामाईचा महिमा थोरवी वर्णितांना आदिशक्ति भवानी म्हणूनच तिची स्तुति केली आहे.

श्री रेणुका मंदिराच्या आसपास अनेक पवित्रतीर्थें, स्थळें आहेत. ज्या ठिकाणीं रेणुकेचा निवास आहे त्या स्थानास ‘मातृतीर्थ’ असें म्हणतात. या मातृतीर्थास सध्यां मोवाळें किंवा ‘मावळा’ असें म्हणतात. महानुभावांनीं आपल्या ग्रंथांतून त्याचा ‘मेरुवाळा’ असा उल्लेख केलेला आहे. या तीर्थाला घाट आहे व येथील पाणी गंगोदकाप्रमाणें पवित्र समजलें जातें. या तीर्थाच्या तीन बाजूस उंचच उंच भिंत असून चौथ्या बाजूस आंत जाण्यासाठीं जागा आहे. घाटाला पायऱ्या पण आहेत. या तीर्थाच्या लगतच रेणुकेची दहनभूमि आहे. परशुरामानें मातेचें जिथें दहन केलें तें ठिकाण ‘मूळझरी’ किंवा ‘मोलझरी’ किंवा ‘मूलगिरी’ या नांवानें ओळखलें जातें. याच्याजवळच कमलतीर्थ व अमृतकुंड हीं तीर्थें आहेत. विशेषतः अमृत कुंडाजवळ श्री दत्तात्रेय व परशुराम यांची भेट झाली होती व श्रींनीं त्यांचें सांत्वन केलें होतें. या तीर्थाच्या जवळच परशुरामानें एक बाण मारून एक तीर्थ निर्माण केलें आहे. तिथें सर्व तीर्थांचें पावित्र्य गोळा झालें म्हणून त्या तीर्थास ‘सर्वतीर्थ’ असें म्हणतात. येथल्या ‘शिखर’ या स्थानीं श्री दत्तमहाराज आपले पिताजी अत्री ऋषी व माता अनुसूयादेवी यांच्यासहित परमेश्वर चिंतनांत कालक्रमणा करीत असत, अशी आख्यायिका आहे. रेणुकेच्या मंदिराच्या जवळच श्री तुळजा भवानी व श्री महालक्ष्मी यांचीं दोन छोटीशीं देवळें आहेत. महाराष्ट्रांतील शक्तीच्या तीनहि रूपांचें दर्शन एकाच ठिकाणीं व्हावें म्हणून भक्तांनीं ही अशी व्यवस्था मुद्दाम केलेली आहे. जवळच दक्षिणेच्या बाजूस परशुरामाचें मदिर असून, तेथील परशुरामाची मूर्ति ओबडधोबड आहे. माहूर क्षेत्रांत एकंदर नऊ कोटितीर्थें आहेत व तीं सारीं रेणुका महात्म्यांत व कालिका खंडांत दिलेलीं आहेत.

आज एक शक्तिपीठ म्हणून माहूरचा व श्री रेणुकेचा उदो उदो केला जातो. देवीची नित्य पूजा, आरती, नैवेद्य हे विधि मोठ्या सन्मानानें होत असतात. नवरात्रांत देवीचा मोठा उत्सव होतो. तेव्हां यात्रिक नवसाला बोललेले सोन्या-चांदीचे दागिने, जरीचीं वस्त्रें, लुगडीं, खण इत्यादि देवीला अर्पण करतात. देवीची सारी व्यवस्था पंचायतीकडे केलेली आहे. देवीला अर्पण केलेल्या दागदागिन्यांचा दरवर्षी लिलांव होत असतो. या देवस्थानास नागपूरकर भोंसल्याकडून वऱ्हाडमध्यें एक जहागिरी मिळाली असून, तिचें उत्पन्न सुमारें दहा हजार रुपयांचें आहे. देवस्थानाचा सारा खर्च यात्रिकांकडून आलेल्या देणग्यांतून चालविला जातो. हें उत्पन्न वार्षिक पांच हजार रुपयांचें असतें. येथें देवीचा प्रसाद म्हणून कुटलेला विडा देण्याची पद्धति आहे. विदर्भांत या देवीचे अनेक भक्त आहेत. या क्षेत्राला जाण्यासाठीं सहस्रकुंड, किनवट, अदिलाबाद, यवतमाळ, पुसद, काफेश्वर येथून मार्ग आहेत. परतु अदिलाबाद व किनवट हे मार्ग सोयीस्कर आहेत. औरंगाबादहून जाणाऱ्या मध्य रेल्वेच्या फांट्यावर नांदेडच्या पुढें मुदखेड नांवाचें स्टेशन लागतें. या स्टेशनापासून एक रेल्वेमार्ग अदिलाबादपर्यंत जातो. या रेल्वेमार्गावरील सहस्रकुंड, किनवट किंवा अदिलाबाद यापैकीं कोणत्याहि एका स्टेशनावर उतरून माहूरास जातां येतें. वऱ्हाडच्या बाजूस तिथें जाण्यासाठीं मात्र यवतमाळला उतरावें लागतें. तेथून मोटारीनें आर्णी येथें यावें व तेथून सात कोसांवर माहूर आहे. येण्यास बैलगाड्या भाड्यानें मिळतात. तसेंच अकोल्याहून पुसदवरून वानोड्यास मोटारीनें यावें. तेथून तीन मैलांवर माहूर आहे. वानोड्यास बैलगाड्या भाड्यानें मिळतात. मनमाडहून हैद्राबादेस जाणाऱ्या रेल्वेमार्गावर पूर्णा जंक्शनपासून अदिलाबादपर्यंत एक गाडी आहे. त्या मार्गावर असलेल्या हिमायतनगर किंवा वाढोण स्टेशनापासून

माहूर तीस मैल आहे. येण्यास बैलगाड्या मिळतात. पावसाळ्यांत माहूरला येणें मात्र मोठें कष्टाचें असतें. आतांपर्यंत या क्षेत्राची खूपच उपेक्षा झालेली आहे. महाराष्ट्र राज्यांत हें क्षेत्र आतां येत असल्यामुळें त्याचा विकास व्हावा, सुखसोयी व्हाव्यात, रस्ते ठीकठाक व्हावेत अशी अपेक्षा आहे.


चैत्र शुद्ध प्रतिपदा, चैत्री पौर्णिमा, आषाढी पौर्णिमा, आश्विन मासांतील नवरात्र, कार्तिकी पौर्णिमा, दत्त जयंति, पौष वद्य एकादशी, चंद्र–सूर्य ग्रहणें या पर्वकाळीं येथें मोठी यात्रा भरते. इतर वेळीं नेहमींच थोडी फार यात्रा येथें होत असतें.

श्री रेणुकेच्या निवासस्थानावर हल्लीं भट व भोपे यांची सत्ता आहे. ह्या संस्थानला वऱ्हाडांत दोन गांवें इनाम तर आहेतच; निजामाकडून वर्षांकांठीं सुमारें साडेपांचशें रु. मिळत असतात. देवीची पूजा संस्थानातर्फे व जहागिरीतर्फे होत असते. यात्रेकरूंना देवीची अभिषेकपूजा करावयाची असल्यास तीन रुपये संस्थानाला द्यावे लागतात. वस्त्र यात्रेकरूंना आणावें लागतें. जर नसेल तर आणखीन तीन रुपये देऊन वस्त्र मिळवावें लागतें.

माहूर क्षेत्रांत पाहण्यासारखीं आणखीन कांहीं ठिकाणें आहेत. त्यापैकीं पांडवलेणें हें माहूरच्या उत्तरेकडे पहाड खोदून केलेलें आहे. हें जैनांनीं किंवा बौद्धांनीं केलेलें म्हणजे सुमारें दीड हजार वर्षांपूर्वीचें असावें असा अंदाज आहे. रेणुकेच्या मागें खालच्या बाजूस मोवाळे तळें आहे त्याला मातृतीर्थ असें म्हणतात. येथें परशुरामानें यज्ञ केला होता. मोवाळ्याजवळच श्री संत विष्णुकवी यांचा मठ व धर्मशाळा आणि गांवांत राजे उदाराम यांचा वाडा हीं ठिकाणें पाहाण्यासारखीं आहेत.

सहाशें वर्षांपूर्वीं माहूर यादयांच्या राज्यांत मोडत असें. देवगिरीच्या यादवांचा मुसलमानांनीं पराभव करून गुलबर्गा येथें बहामनी राज्याची स्थापना केली. बहामनी राज्यांत माहूर हा एक सुभा होता. पुढें बहामनी राज्याचे पांच तुकडे झाल्यावर निजामच्या राज्यांत माहूरचा समावेश होऊं लागला. त्यावेळीं अदिलाबाद जिल्ह्याच्या किनवट तालुक्यांत माहूर क्षेत्र होतें. भारत स्वतंत्र झाल्यावर मोंगलाई नष्ट झाली व त्यानंतर किनवट तालुका नांदेड जिल्ह्यांत आला. सध्यां स्वतंत्र महाराष्ट्रांतील नांदेड जिल्ह्याच्या किनवट तालुक्यांत माहूर क्षेत्र आहे.

माहूरच्या श्री रेणुकेचें दर्शन घेतलें असतां सर्व पातकांचा नाश होतो असें पुराणांत वर्णिलेलें आहे.



मुंबापुरीची श्री महालक्ष्मी

# मुंबापुरीची श्री महालक्ष्मी

मुंबई हें आजच्या नव्या महाराष्ट्राच्या राजधानींचें शहर आहे. या शहराच्या चोहोंबाजूंनीं समुद्र वेढलेला असल्यामुळें या शहराला बेट असें म्हटल्यास चुकीचें ठरणार नाहीं.

या मुंबई बेटाच्या पश्चिम किनाऱ्यावर चर्चगेटपासून सुमारें पांच मैलावर हिंदूंचें एक परमपवित्र देवस्थान आहे. हें देवस्थान अरेबियन समुद्राला लागूनच असलेल्या एका टेकडीवर वसलेलें असून, त्या टेकडीवरून सभोंवतालची निसर्गशोभा मोठी नयनरम्य वाटते. लांबच लांब दूरवर पसरलेला तो अथांग सागर, त्यावर सदान्‌कदा उसळत असणाऱ्या त्याच्या त्या उर्मी, सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या सुमारास वाहणारा तो शितल आल्हादकारक पवन या साऱ्या गोष्टींमुळें कोणत्याहि ऋतूंत नि कोणत्याहि वेळीं तिथें गेलेल्या रसिकाला तेथून हलूंच नये असें वाटतें. दुःखी–कष्टी झालेल्या जीवांना तिथें गेल्यानें क्षणभर तरी का होईना आपल्या साऱ्या दुःखांचा विसर पडतो आणि रोग्यांना तेथलें हवापाणी आणि वातावरण प्रसन्नदायक वाटतें; म्हणून हवा पालटण्यासाठीं ते तिथें येतात. अशा या टेकडीवर एकुलत्या एका देवतेची सत्ता आहे. तिचें नांव आहे देवी महालक्ष्मी. मुंबापुरींतील सारे सारे भक्त नि भाविक जिचा वारंवार उदो उदो करून महिमा गातात तीच ही देवता.

या महालक्ष्मी देवतेची स्थापना या टेकडीवर निश्चित केव्हां नि कोणत्या सालीं झाली याची माहिती उपलब्ध नसली तरी इ. स. १७६१ ते इ. स. १७७१ च्या दरम्यान केव्हांतरी तिची पुनर्प्रतिष्ठापना तिथें झाली असली पाहिजे, असें अनेक विद्वानांचें मत आहे.

आज ज्या ठिकाणीं मंदिर आहे त्याच ठिकाणीं फार फार वर्षांपूर्वी या देवतेचें मंदिर होतें. परंतु शिलाहार राजाच्या काळांत या मंदिरावर जेव्हां म्लेंच्छांचें (मुसलमान किंवा फिरंगी) आक्रमण झालें तेव्हां भाविक भक्तांनीं त्या देवालयांतील तिन्ही मूर्ति मध्यरात्रीं हलविल्या व त्या आक्रमकांच्या हातीं पडूं नयेत म्हणून त्या जवळच्याच समुद्रांत नेऊन बुडविल्या. त्यानंतर बराच काळ त्या क्षीरसागरांत होत्या.

पुढें इ. स. १७५० च्या सुमारास इंग्रज सरकारकडून वरळीचा बांध बांधण्यास सुरुवात झाली त्यावेळीं मात्र या मूर्ति सांपडल्या. त्या कशा काय सांपडल्या ही एक मोठी नवलाचीच गोष्ट आहे.

इ. स. १७६० सालची गोष्ट असावी. त्यावेळीं हॉर्नबी नांवाच्या गोऱ्या राज्यपालाची मुंबई शहरावर सत्ता होती. या हॉर्नबीसाहेबानें असें ठरविलें कीं, वरळी गांव आणि त्याच्या आसपासचीं ठिकाणें हीं सारी मुंबईशीं जोडून पक्की गाडीवाट करावी व त्यासाठीं वरळीच्या समुद्राला किनाऱ्याकिनाऱ्यानें पक्का बांध बांधला पाहिजे, असें त्याला दिसून आलें. आपली ही कल्पना मूर्त स्वरूपांत किंवा प्रत्यक्षांत आणण्यासाठीं त्यानें बांध घालण्याचें काम कांहीं ठेकेदाराकरवीं सुरू केलें. परंतु पाण्याचा अतिशय जोर म्हणा किंवा आणखीन कांहीं दुसरें म्हणा, केलेलें बांधकाम कोसळून पडत असे. कांहीं केल्यानें बांधकाम म्हणून टिकेना. या कामीं अर्थातच

बरेचसे श्रम आणि पैसा खर्च झाला होता. अखेरीस हॉर्नबीनें कंटाळून जाऊन ही बांधकामाची योजना तशीच सोडून देण्याचें ठरविलें. तेव्हां याच सुमारास सरकारी ठेकेदारांच्या यादींत नांव असलेले रामजी शिवजी नांवाचे एक सुशिक्षित प्रभू ठेकेदार गव्हर्नरकडे जाऊन म्हणाले, "महाराज, काल रात्रीं माझ्या स्वप्नांत देवी महालक्ष्मी आली होती. तिची आणि तिच्या दोन बहिणींच्या मूर्ति कोसळून पडणाऱ्या बांधकामाच्या जवळच्याच पाण्यांत आहेत, त्या काढून त्यांचें देऊळ बांधलें तर आपला हा बांध पूर्ण होईल असें देवीनें मला दिलेल्या दृष्टांतांत कथन केलें आहे. तर त्याप्रमाणें त्या मूर्ति शोधून काढून मी त्यांचें देऊळ बांधूं काय?" त्यावर गव्हर्नरनें रामजी शिवजी प्रभूस ह्या कामीं संपूर्ण संमति दिली.

सरकारकडून संपूर्णपणें परवानगी मिळतांच रामजी प्रभूंनीं एका शुभ मुहूर्तावर समुद्रांत जाळें टाकलें; आणि मोठ्या आश्चर्याची गोष्ट त्या जाळ्यांत पाषाणाच्या तीन मूर्ति लागल्या. रामजींनीं जाळ्यांतल्या त्या पाषाणमूर्ति ओढून घेतल्या. त्यांचें तें जाळें साध्या बारीक सुतळीचें होतें. त्या मूर्ति पाषाणी होत्या, परंतु असें असून सुद्धां खोल तळास बसलेल्या त्या पाषाणमूर्ति जाळ्यांत आपोआप आल्या आणि त्यांच्या वजनानें त्या जाळ्याची कोणत्याच प्रकारें नुकसानी झाली नाहीं. ज्या ठिकाणीं या मूर्ति रामजींच्या हातीं लागल्या त्याच ठिकाणीं रामजींनीं त्यांची स्थापना केली. आणि मग वरळीचें बांधकाम सुरू केलें. यानंतर मात्र बांधाचें काम पूर्ण करण्यांत कांहीं सुद्धां व्यत्यय आला नाहीं. ठराविक मुदतींत त्यांनीं तें पुरें केलें आणि या बांधाचें नांव हॉर्नबी व्हेलार्ड असें ठेवण्यांत आलें तें आजतागायत कायम आहे.

रामजी प्रभूंनीं बांधकाम करतांना केलेल्या श्रमांत जो कांहीं पैसा मिळविला त्या पैशांचें त्यांनीं या देवीचें सुंदरसें देऊळ बांधलें तेंच आजचें हें महालक्ष्मीचें मंदिर होय. या कामीं सरकारकडून त्यांनीं मंदिराची जागा बक्षिस मिळविली. या देवळाच्या कामीं ८०,००० रुपये त्यावेळीं खर्च झाले असावेत असा अंदाज आहे. देवळाच्या बांधणीनंतर एका सोनारानें व कोळ्यानें नजिकच एक धर्मशाळा बांधली ती अजूनहि अस्तित्वांत आहे.

मुंबई शहरासंबंधीच्या जुन्या कादगपत्रांतून असा उल्लेख आढळतो कीं, ही महालक्ष्मी आणि तिच्या दोन बहिणी महाकाली व महासरस्वती यांच्या मूर्ति बऱ्याच वर्षांपूर्वीपासून याच टेकडीवर होत्या. मुसलमानांच्या अमदानींत त्या मूर्तींची खूपच नासधूस झाली. अखेरीस आणखीन् त्यांची नासधूस नि विटंबना होऊं नये म्हणून त्यांना जलसमाधि देण्यांत आली. मुंबई बेट पोर्तुगीजांकडून इंग्रजांकडे येईतोंपर्यंत त्या समाधि अवस्थेंतच होत्या. पुढें या वरळीच्या बांधकामाच्या वेळीं त्यांनीं असा स्वप्नांत दृष्टान्त देऊन आपली पाण्यांतून सुटका करून घेऊन योग्य त्या स्थळीं त्या पुन्हां येऊन राहिल्या आहेत. अशा प्रकारें भक्तांच्या रक्षणासाठीं त्या क्षीरसागरांतून अवतीर्ण झाल्या आहेत, असें म्हणावयास हवें. मुंबईतील अनेक जमातींची ही देवता कुलदैवत आहे.

कांहीं पिढीजात पुजारी असें म्हणतात कीं, या देवळाची स्थापना कृष्णाजी भैरोजी ऊर्फ कृष्णा मोरया नांवाच्या आपल्या पूर्वजांनीं इ. स. १७५९ च्या सुमारास केली.

हें महालक्ष्मीचें मंदिर टेकडीवर असून मंदिरांत चढून जाण्यासाठीं ३२ पायऱ्या लागतात. त्या ओलांडून पुढें गेलें कीं, देवालयाचा विशाल

सभामंडप लागतो. ह्या सभामंडपात हंड्या नि झुंबरें लटकलेलीं आहेत. हा सभामंडप भनसाळीशेट मुरारजी पुरुषोत्तम यांनीं बांधला. या सभामंडपासून सरळ आंत गेलें कीं, गर्भागार लागतें व या गर्भागाराच्या मध्यभागीं एक लहानशी सुमारें दीड हात उंचीची पेढी असून तिच्यावर सुंदर मखरांत रुपेरी चौरंगावर अधिष्ठापित होऊन मुंबापुरींतील साऱ्या साऱ्यांना दर्शन देत असलेल्या या पूर्वाभिमुख धनदेवता महालक्ष्मीचें दर्शन होतें आणि मन सुप्रसन्न होऊन जातें. या देवी महालक्ष्मीच्या उजव्या बाजूस श्री महाकाली आणि डाव्या बाजूस श्री महासरस्वती अशा तिच्या दोन बहिणी आहेत. श्री महालक्ष्मी व्याघ्रावर आरूढ झाली असून, श्री महाकाली महिषासुरावर बसली आहे आणि श्री महासरस्वती ही मयूराधिष्ठित आहे. देवींचीं हीं आसनें स्पष्ट दिसत नाहींत; पण साधारण दगडाचा आकार दिसावा तसा दिसतो. देवीच्या मूर्तींचें कामहि जेमतेमच आहे.

श्री महालक्ष्मी, श्री महाकाली व श्री महासरस्वती ह्या पाषाणमूर्तींना नेहमींच मुखवटे व शृंगार घातलेला असतो. त्यामुळें वर उल्लेखिलेल्या मूळ मूर्तींचें स्वरूपदर्शन क्वचित्‌च होतें. श्री महालक्ष्मी चतुर्भुजा असून, तिची उंची सरासरी सव्वादोन हात आहे तर श्री महाकाली व श्री महासरस्वती या अनुक्रमें अडीच व दोन फूट उंचीच्या आहेत. या तिन्ही मूर्ति स्वयंभू आहेत असें सांगतात.

या मूर्तींवर सोन्याचे मुखवटे चढविलेले असतात. विविध प्रकारच्या अलंकारांनीं त्यांना सजविलें, नटविलें, सुशोभित केलें जातें. डोक्यावर छानदार मुकुट असतात. नाकांत नथ, हातांत कांकणें, गळ्यांत मोत्यांचे हार असा शृंगार असतो आणि उंची साड्या त्यांना नेसविल्या जातात.

देवीचा संपूर्ण देव्हारा लांकडी असून त्यावर चांदीचा पत्रा ठोकला असून, तो सुबकतेनें कोरलेला आहे. देव्हाऱ्यासभोंवताच्या लांकडी मखरास ॲल्युमिनियमचा चकचकीत रुपेरी रंग दिलेला आहे. देवीच्या या खोलीस उत्तरेकडे एक व दक्षिणेकडे एक असे दोन दरवाजे आहेत. पाठीमागें मात्र दरवाजा नाहीं असें देऊळ पूर्वाभिमुख आहे.

सभामंडपांत गर्भागाराच्या द्वारापासून कांहीं अंतरावर चांदीच्या पत्र्यानें मढविलेला एक पाषाणाचा वाघ आहे. या शिवाय सभामंडपांत गर्भागाराच्या दाराच्या उजव्या बाजूस व डाव्या हाताला कोनाड्यांत दत्त व गणेश या देवता अधिष्ठित आहेत. देवळाच्या सभामंडपाच्या उजव्या बाजूस ध्वजस्तंभ असून, उत्सवकाळांत शुभ्र किंवा भगवा ध्वज तिथें फडकत असतो. तर सभामंडपाच्या डाव्या बाजूस एका कोपऱ्यांत दीपमाळ असून, उत्सवकाळांत दीपमाळेचीं शिखरें पाजळण्यांत येतात. देवळाचें शिखर सुमारें ८० ते ९० फूट उंच आहे.

या महालक्ष्मी मंदिराच्या आवारांतच मयत धाकजी दादाजी या नामांकित प्रभू गृहस्थानें बांधलेलें मोठें देऊळ आहे. पाऊणलाख रुपये खर्च करून त्यानें हें धाकलेश्वराचें देऊळ बांधलें. या देवळांत श्री विनायकादित्य, श्री हरीनारायण, धाकलेश्वर, रेमेश्वरी, मयूरेश्वर अशा पांच स्वतंत्र मूर्ति आहेत. देवळाच्या आवारांतच धाकजी दादाजी यांची समाधि पण आहे.

या महालक्ष्मी मंदिराच्या अलीकडेच सुमारें पन्नास हातावर पण थोडेसें खालच्या बाजूस एक फरसबंदी असून तिथें एक फरसबंदी तलावही आहे. हा तलाव इ. स. १८२४ सालीं तुळसीदास गोपाळदास यांनीं ४०,००० रुपये खर्च करून बांधला. त्याची आकृति जहाजा-

सारखी आहे. हा तलाव पस्तीस फूट खडक फोडून तयार केला असून भायखळा दगडांनीं बांधलेला आहे. त्यावर दिलेला शिलालेख असा आहे—

एतावत् जन्मसाफल्यं देहिनामिह देहिषु ।
प्राणैरर्थैर्धि यावाचा श्रेय एवाचरेत सदा ॥

या तलावाच्या पश्चिमेस शंकर व रणछोडजी यांचीं मंदिरें आहेत. जवळच्या कांहीं धर्मशाळांतून लोक हवेसाठीं येऊन राहतात. महालक्ष्मी देवळाजवळच अगदीं अलीकडे एक धर्मशाळा बांधली गेली असून, त्यावर साधुबेला आश्रम अशी पाटी लटकत आहे.

या महालक्ष्मीचें देऊळ जेव्हां बांधलें गेलें तेव्हां कोळी व दक्षिणी लोक देवीच्या दर्शनास अधिक येत असत. परंतु गेल्या सुमारें ३०–३५ वर्षांपासून गुजराती भाविकांचीहि देवीच्या दर्शनास मनस्वी गर्दी लोटत असते. गुजराती लोक श्रीमंत असल्यानें त्यांनीं अनेक देणग्या व मौल्यवान चीजा देवीस व देवालयास दिलेल्या असल्यानें देवळाच्या उत्पन्नांत पडणारी भर वाढली आहे.

दरदिवशीं देवी महालक्ष्मीची चार वेळां षोडशोपचारें पूजा केली जाते आणि चार वेळां तिला अनन्यभावें ओवाळलें जातें. देवालय सकाळीं ५ वाजतां उघाडण्यांत येतें. नंतर पूजा करण्यांत येऊन पहिली आरती सकाळीं ७–३० च्या सुमारास होते. दुसरी धूपारती सूर्यास्ताच्या वेळीं होते. तिसरी दीपारती संध्याकाळीं ७–३० वाजतां व रात्रौ १०–३० वाजतां शयनारती केली जाते. या चारहि आरत्यांच्या वेळेला गुजराती श्लोक म्हटला जातो.

जय जय आद्या शक्ति मां
अखंड ब्रह्मांड नि पाया पडवे पंडित मां
जयो जयो मां जय जगदंबे ॥

या त्या गुजराती मंगल श्लोकाच्या सुरुवातीच्या पंक्ति होत.

प्रतिवर्षी चैत्र पौर्णिमेला येथें मोठा उत्सव होतो. पण सर्वांत मोठा व प्रेक्षणीय असा उत्सव आश्विन महिन्यांत नवरात्राचा होत असतो. या उत्सवांसाठीं देऊळ रंगवून सुशोभित करतात आणि आश्विन शुद्ध प्रतिपदा ते दशमीपर्यंत देवालयांत व देवालयासभोंवतीं मोठी आरासहि केली जाते. तसेंच हवनहि होत असते. या नवरात्रांतील उत्सवप्रसंगीं मोठी यात्रा भरून देवीच्या दर्शनार्थ हजारों भक्तभाविकांची एकच तुफान गर्दी होत असते. विशेषतः आश्विन शुद्ध अष्टमीच्या दिवशीं नवविवाहित वधूंची होणारी गर्दी तर पहाण्याजोगी असते. महाराष्ट्रीय चित्तपावन ब्राह्मण समाजांत नव–विवाहित वधूनें लग्न झाल्यापासून पहिली पांच वर्षे सौभाग्यादि ऐश्वर्यप्राप्तीसाठीं आश्विन शुद्ध अष्टमीच्या दिवशीं श्री महालक्ष्मीचें व्रत करण्याचा प्रघात आहे. तो आज शेंकडों वर्षे चालू आहे. हें व्रत काम्यव्रत असल्यानें ज्याचें त्यानेंच करावयाचें असतें. या व्रतांत प्रदोषकाळीं श्री महालक्ष्मीची पिष्टमय म्हणजे तांदळाच्या पीठाच्या मूर्तीची पूजा करून रात्रौ पूजोत्तर देवीच्या मूर्तीपुढें धूप जाळून देवता जागृति करणें आणि घागरी फुंकून नृत्य करणें हा व्रतोत्सवाचा महत्त्वाचा भाग समजला जातो. दारिद्र्य, विनाश व संपत्ति लाभ हा या व्रताचा हेतु आहे. तेव्हां हें व्रत करून साक्षात् महालक्ष्मीच्या दर्शनार्थ नववधूंची गर्दी जमणें अगदीं साहजिक आहे.

१९५० सालीं या महालक्ष्मी मंदिरावर दरोडा पडला होता. चार दरोडेखोरांनीं पहांटेस शिरून, पुजाऱ्यांवर गोळीबार करून सुमारें चार-पांच हजारांचा ऐवज लांबविला. हे चार दरोडेखोर पंजाबी नि मुसलमान होते. या चोरांना पकडून त्यांना योग्य ती शिक्षा देण्यांत आली होती.

या महालक्ष्मीच्या देवळाचें वार्षिक उत्पन्न अंदाजें दोन लाख रुपये आहे. या प्राप्त उत्पन्नाच्या ६० टक्के रक्कम मुंबईतील कांहीं शिक्षण संस्थांना, रुग्णालयांना नि लोकोपयोगी कार्य करणाऱ्या संस्थांना दिली जाते. येथील पुजाऱ्यांना कांहीं विषेश हक्क नि अधिकार देण्यांत आलेले असले तरी देवळाच्या व्यवस्थेच्या बाबतींत मात्र त्यांना कोणताच हस्तक्षेप करतां येत नाहीं. या देवळाच्या विश्वस्तांत मुंबईचे प्रख्यात डॉक्टर श्री. कृष्णाजी श्रीपत म्हसकर, सुप्रसिद्ध माजी न्यायधीश श्री. जयदेवलाल मोहनलाल बॅरोट, श्री. वसंतराव कल्याण वैद्य व. प्रो. विनायक गणपतराव राव, शेठ श्री. धरमदास हरगोविंदास यांच्यासारखी थोर नि खरोखरच जातीनें लक्ष घालणारी मंडळी असून, व्यवस्थापक म्हणून श्री. घनःशाम आत्माराम सातवळेकर हे काम पहात असतात. गेलीं ४० वर्षें ते या पदावर आहेत. या देवळाकडे बी, ओ, ओ २ व ४ च्या या कोणत्याहि रूटनें जातां येतें.



सिंदूरवर्णी देवी वज्रेश्वरी

# सिंदूरवर्णी देवी वज्रेश्वरी

मुंबईपासून सुमारें पन्नास मैलांवर वज्रेश्वरी नांवाचें एक पावन तीर्थस्थान आहे. महाराष्ट्र राज्यांतल्या ठाणें जिल्ह्यांत मुंबई–आग्रा रस्त्यावरील भिवंडीपासून वायव्येस सुमारें सोळा मैलांवर भिवंडी–वसई रस्त्यावर तें वसलेलें असून, पश्चिम रेल्वेच्या वसई स्थानकापासून तें अवघें वीस मैलांवर आहे. या वज्रेश्वरी गांवचें मूळचें नांव वडवली असें जरी असलें तरी बऱ्याच वर्षांपासून हें देवस्थान देवीच्याच नांवानें म्हणजे वज्रेश्वरी या नांवानें सुपरिचित आहे.

या वज्रेश्वरी गांवच्या पूर्वेस अकलोली, दक्षिणेस उसगांव, पश्चिमेस गणेशपुरी आणि उत्तरेस तानसा नदी व तिच्या पलिकडे वाडें तालुका अशा सीमा असून या सीमांच्यामध्यें वज्रेश्वरी आहे. वज्रेश्वरी देवीचें देवस्थान तानसा नदीच्या किनारीं मुमाल्टा नामक एका टेकडीवर आहे. हें देवालय जमिनीपासून सुमारें २०० फूटांवर आहे. देवळाचा आकार लांबून एखाद्या किल्ल्यासारखा दिसतो.

वज्रेश्वरीदेवीच्या उत्पत्तीसंबंधानें एक मनोरंजक कथा आहे. द्वापार युगाच्या शेवटीं उग्रासुर नामक एक मोठा शूर योद्धा नि तेजस्वी शस्त्रविशारद होऊन गेला. त्याला एक पुत्र होता. त्याचें नांव सिंहमार. हा सिंहमार मोठा उदार होता तर त्याचा धाकटा भाऊ हा मोठा स्वार्थी होता. त्याचें नांव कलीकाल. तो युद्धकलेंत प्रवीण असून,

संग्रामांत सिंहासारखा तेजस्वी होता. या कलीकालाला सारी पृथ्वी जिंकण्याची इच्छा झाली आणि त्यामुळें त्यानें पृथ्वीतलावरील देव, ऋषी या साऱ्या साऱ्यांना भयंकर त्रास देण्यास सुरुवात केली. सारे देव दाही दिशांना पळूं लागले. इंद्रहि भयभीत होऊन उत्तरेकडे पळूं लागला. सारी पृथ्वी पर्वतासह कंपित झाली; तेव्हां रक्षणासाठीं म्हणून देवांनीं नि ऋषींनीं आराध्य देवतेची अनन्यभावें प्रार्थना करून यज्ञ केला. त्यामुळें ती प्रसन्न होऊन जगद्धात्री विश्वमाता त्रैलोक्यपालिनी प्रत्यक्ष प्रगट झाली. तिनें इंद्रास कलीकालावर वज्राची वृष्टि करण्यास सांगितलें. इंद्राचीं सर्व शस्त्रें त्या कलीकालानें मिळविलीं. अवघें एकच वज्र इंद्राच्या हातांत उरलें. पुन्हां देवीचें नामस्मरण करून इंद्रानें तें कलीकालावर फेंकलें. कलीकालानें यावेळीं तें न गिळतां आपल्या शस्त्रानें त्याचे दोन तुकडे केले. त्यावेळीं त्या वज्रापासून ही देवी उत्पन्न झाली व तिला ‘वज्रेश्वरी’ हें सार्थ नांव प्राप्त झालें. देवीनें नंतर कलीकालाचा संहार केला नि देव, ऋषी इत्यादि साऱ्यांचें संरक्षण केलें.

पहिले बाजीराव पेशवे हे या वज्रेश्वरीदेवीचे मोठे भक्त. त्यांनींच वज्रेश्वरीचें सध्यांचें हें देऊळ बांधलें. त्यांच्या बखरींत या देवीस ‘वज्रयोगिनी’ असें संबोधलेलें आहे. कांहीं इतिहासतज्ज्ञांच्या मतें हें देऊळ चिमणाजी आप्पानें बांधलेलें असावें असा अंदाज आहे. या संबंधी असें सांगतात कीं, चिमणाजी आप्पा हा फिरंग्यांचा बींमोड करण्यासाठीं पुण्याहून निघाला असतां तो या ठिकाणीं वस्तीस राहिला. वसईचा किल्ला कसा सर करतां येईल हा एकच ध्यास त्याला लागून राहिला असतां चटकन् त्याला डुलकी आली नि त्याला दृष्टान्त झाला कीं, “ज्या दिशेकडून तुला कबुतरांचा थवा मार्गक्रमण करतांना दिसेल त्या दिशेनें तूं वसईच्या

किल्ल्यावर मारा कर" या दृष्टांताप्रमाणें चिमाजीनें कबुतरें पुढें खरोखरीच पाहिलीं. तीं ज्या दिशेनें समोर येतांना दिसलीं त्या दिशेनें चिमाजीनें किल्ल्यावर तोफांचा मारा केला आणि अखेरीस किल्ला सर केला. आपणांस दृष्टांत देणाऱ्या या वज्रेश्वरीबद्दलची श्रद्धा म्हणून त्यानें स्वतःच्या देखरेखीखालीं हल्लींचें देऊळ बांधून काढलें.

देवी वज्रेश्वरीचें देऊळ हें पूर्वाभिमुख असून देवळांत चढून जाण्यास ५२ दगडी पायऱ्या आहेत. अग्रभागीं मोठा थोरला कमानी दरवाजा असून चोहोंबाजूस बळकट कोट बांधला आहे. तो पहातांच प्रथम-दर्शनीं हा मोठा किल्ला असावा असें वाटतें. हें देऊळ अंदाजें १८० वर्षांचें जुनें असून तें अद्याप मजबूत आहे. देवळांत दोन गाभारे आहेत. प्रथम मजला दगडी माठीव असून दुसरा मजला म्हणजे शिखर. हें सर्व चुनेगच्चीनें केलेलें आहे. देवीच्या मूर्ति जिथें आहेत तेथील जागा मेघ-डंबरी घाटाची असून तो गाभारा १०० लोक सहज उभे राहतील इतका विशाल आहे. हा पश्चिमेकडचा गाभारा होय. पूर्वेकडील गाभाऱ्यांत २०० लोक सहज मावतील इतका मोठा आहे. देवालयांतील दोन गाभाऱ्यांच्या पूर्वेस देव्हाऱ्यासलागून एक उत्तम प्रकारचा सभामंडप असून, तो श्रीमंत कै. खंडेराव महाराज गायकवाड बडोदें सरकार यांनीं सन १९२० सालीं तो बांधला. त्याचप्रमाणें पूर्वेकडचा कमानी दरवाजा व वर नगारखाना हाहि याच सरकारस्वारीनें बांधला. कमानी दरवाजांत आल्यावर सभोंवतालची गर्द राई, उत्तरेस तानसा नदी, ईशान्येस रामेश्वर महादेवाचें देऊळ; पूर्वेस माहुलीचा किल्ला इत्यादि रम्य वनशोभा दिसते. कमानी दरवाजाच्या पूर्वेकडे अंदाजें ६० हात खोली आहे. या जागीं कै. गोपाळ वासुदेव ऊर्फ नाना चांदवडकर यांनीं बावन पायऱ्या

दगडी चिरेबंदीच्या बांधल्या. नाना चांदवडकर हे नाशिकचे प्रसिद्ध सावकार होत. या पायऱ्यांच्या पूर्व बाजूस उत्कृष्ट दीपमाळाहि त्यांनींच बांधली. ही विस्तीर्ण असून तिच्यावर जाण्यास आंतून फिरता जिना आहे. हें काम चांदवडकरांनी शके १७७० त केलें. त्यांनी ३० लक्ष रुपये धर्मदाय केले. कमानी दरवाजाच्या समोरच एक मोठी घंटा टांगलेली असून त्यावर नेवासें १८८४ असें लिहिलेलें आहे.

देवी वज्रेश्वरीची मूर्ति ज्या पश्चिमेकडील दुसऱ्या गाभाऱ्यांत आहे तेथली जागा मेघडंबरी असून मधोमध वज्रेश्वरीची अतिरमणीय, सिंदूर-वर्णी, सालंकार, सुवस्त्रमंडित, हातीं गदा व खड्ग घेऊन उभी असलेली मूर्ति बघून मन सुप्रसन्न होतें. दुराचारी व नास्तिकांचा नाश करण्यासाठीं देवीनें हातीं खड्ग घेतलेलें आहे. जे धार्मिक, सच्छील असतील त्यांना सौख्य देण्यासाठीं आणि त्यांच्या शत्रूचा नायनाट करण्यासाठीं देवीनें हातीं गदा घेतली असावी. ही वज्रेश्वरीची मूर्ति २॥ फूट उंचीची आहे.

वज्रेश्वरीच्या उजव्या बाजूस रेणुकेची मूर्ति असून, ती पण वज्रेश्वरी एवढीच आणि वज्रेश्वरीसारखीच दिसते. या शिवाय उजव्या बाजूस व्याघ्र, सप्तशृंग देवीची मूर्ति व महालक्ष्मी या पण आहेत. वज्रेश्वरीच्या डाव्या बाजूस कालिकेची मूर्ति असून ती पण वज्रेश्वरीसारखीच दिसते. शिवाय भार्गवरामाची मूर्तिहि डाव्या बाजूस आहे. या सर्व मूर्ति जिथें आहेत तें स्थान उत्तम शृंगारलेलें आहे. देवीच्या पुढें मर्यादेस्तव दक्षिणोत्तर आडवा स्तंभ लावला असून तो पितळी पत्र्यानें मढविलेला आहे व त्यावर नवसाचे अनेक रुपये ठोकलेले दिसतात.

देवालयाच्या दुसऱ्या मोठ्या गाभाऱ्यांत दक्षिण बाजूस श्री वक्रतुण्ड गजानन, कालभैरव, वेताळ हे असून, उत्तर बाजूस सरस्वती, महादेव

व पार्वती यांच्या मूर्ति आहेत. गाभाऱ्यांत प्रतिशब्द येतो. देवालयाच्या दक्षिणेस प्राकाराच्या आंत श्री महादेवाचें छोटें देवालय असून, एक सव्यशुंडा दंडमंडित गणरायाची मूर्ति विराजमान झालेली दृष्टीस पडते. प्राकाराच्या पूर्व बाजूस म्हणजे कमानी दरवाजाच्या दक्षिणोत्तर भागीं दोन भव्य बुरुज आहेत. या बुरुजांची भव्यता, प्राकारांचा मजबूतपणा आणि कमानी दरवाजांची शोभा व शिल्पकला हें सर्व पाहिल्यावर एवढे जंगी दगड अशा अवघड जागीं कसे काय नेले असतील याचें आश्चर्य वाटतें. देवळाच्या सभोंवतालीं झाडेंच झाडें असून जणूं काय त्यांच्या डहाळ्या हीं देवीवर धरलेलीं छत्रेंच होत, असें मानावयास हरकत नाहीं. देवळासभोंवतालच्या या बागेस 'आराम बाग' असें म्हणतात.

वज्रेश्वरीदेवीची दिवसांतून चारदां आरती केली जाते आणि त्या प्रसंगीं

प्रेमें करितों आरती जय जय माते वज्रेश्वरी हो ।
स्मरतां भक्ते तुजला धांवुनी येशील सत्वरी हो ॥

या मंगलचरणांनीं तिला अनन्यभावें आळविलें जातें. शारदीय, नवरात्र व वासंतिक नवरात्र या प्रत्येक नवरात्रांत देवीची यात्रा भरत असली तरी मोठी जत्रा प्रत्येक वर्षी चैत्र अमावस्येस भरते आणि तेव्हां हजारों भाविक देवीच्या दर्शनाचा लाभ घेण्यासाठीं मोठ्या आतुरतेनें धडपडत असतात. पूर्वीं येथें बगाड ( गळ ) टोंचून घेणें हा कडक नवस केलेला दिसे, पण हा नवस आतां येथें कायद्यानें बंद केलेला आहे. ही देवी केलेल्या नवसाला खात्रीनें पावते असा अनेक भाविकांचा समज असल्यानें जत्रेच्या वेळीं हजारों रुपयांची येथें उलाढाल होते. जत्रेच्या दिवशीं देवीची पालखी काढून ती मिरवण्यांत येते.

देवीच्या देवळाच्या सभोंतालच्या टापूंत अनेक गरम पाण्याचीं कुंडें असून त्या प्रत्येकास सूर्य कुंड, चंद्र कुंड, वायु कुंड, अग्नि कुंड, ब्रह्म कुंड, काश्यप कुंड, सुभाष कुंड अशीं नांवें आहेत. अशीं एकंदर १८ कुंडें आहेत. त्यापैकीं सर्वांत गरम गरम पाण्यानें संपृक्त जें कुंड आहे त्याचें नांव 'अग्नि कुंड.' त्यामधील पाणी अक्षरशः उकळत असलेलें दिसतें. त्याचें उष्णतामान पृष्ठभागावर १४२ अंश व खालीं तळाला १५० अंश आहे. इतर महत्त्वाच्या कुंडांपैकीं सुभाष कुंडांचें उष्णतामान ९६ अंश व सूर्य कुंडांचें उष्णतामान १२६ अंश आहे. या कुंडांत स्नान केल्यानें चर्मरोग नष्ट होतात. या कुंडांतील पाण्यांत गंधकाचें प्रमाण बऱ्याच अंशानें असल्याचें सिद्ध झालें आहे. या गंधकमिश्रित औषधि पाण्याचा उपयोग करून घेण्यासाठीं गणेशपुरी येथें एक सुंदर 'हायड्रो टेरापिक क्लिनिक' डॉ. कोठावाला यांनीं चालविलें आहे. कुंडांतील गंधक-मिश्रित औषधि पाण्याचा अशा तऱ्हेनें उपयोग भारतांतील अन्य कोणत्याहि ठिकाणीं केला जात नाहीं. वज्रेश्वरीची ही उन्हाळी पृथ्वीच्या पोटांत पंधरा मैल खालीं जी अग्नीची प्रचंड भट्टी पेटलेली आहे अथवा तिथें जो पृथ्वीच्या पोटांतील द्रव्यांचा रस तयार झालेला आहे व वायु निर्माण झाला आहे त्या सर्वांचा उद्रेक होय, असें शास्त्रज्ञ सांगतात. एरवीं हीं अशीं उन्हाळीं ज्वालामुखीच्या प्रदेशांतून निर्माण होतात. जपानमधील सर्व उन्हाळी अशा प्रकारचीं आहेत.

वज्रेश्वरीच्या या कुंडांतील पाण्याची चव इंग्लंडमधील लीबाथ गांवच्या पाण्यासारखी लागते. तर ॲन्थनी एलोजिमित्तम हा पाश्चात्य शास्त्रज्ञ ह्या उन्हाळ्यांची तुलना झेकोस्लोव्हाकियामधील कार्लस बाद येथील जगप्रसिद्ध उन्हाळ्यांशी करतो. भारतांत तिबेट भारताच्या सरहद्दीवर हिमाल्यांत,

पंजाब, सिंध, गुजरात व महाराष्ट्र यामधील इतर ठिकाणीं उन्हाळीं आहेत; परंतु वज्रेश्वरीची उन्हाळीं पहिल्या प्रतीचीं आहेत, ही गोष्ट महाराष्ट्र सरकारलाहि आतां पटलेली आहे. ह्या कुंडांतील पाणी किरणोत्सर्गी असल्याचें संशोधनाअंतीं दिसून आलें आहे.

वज्रेश्वरीच्या देवळाजवळच असलेला नित्यानंद स्वामींचा आश्रम हें वज्रेश्वरीचें आणखीन् एक आकर्षण आहे. १९६१ सालीं हे स्वामी ब्रम्हीभूत झाले. स्वामीजी आतां नसले तरी त्यांच्या आश्रमांत प्रवेश केल्यानें कुणाच्याहि मनाला प्रसन्नता नि समाधान वाटतें.

अशा ह्या वज्रेश्वरीच्या पावनतीर्थास भाविकांनीं अवश्य भेट द्यावी नि रसिकांनीं निसर्गशोभा लुटण्यासाठीं तरी तेथें जावें असें सांगावेसें वाटतें.



कवळयाची श्री शांतादुर्गा

# कवळ्याची श्री शांतादुर्गा

गोवा हें महाराष्ट्राचें नंदनवन किंवा दक्षिणेचें काश्मीर म्हणून ओळखलें जातें. आज गोवा स्वतंत्र झाला आहे. परवान्यावांचून आज कुणाहि भारतीयाला गोव्यांत मुक्तपणें संचार करतां येतो. भाविकाला देवदर्शन घेतां येतें. खरोखरच गोमंतक म्हणजे एक रम्यभूमि आहे. गोमंतकाचें सृष्टिसौंदर्य पुरातन कालापासून प्रसिद्ध असून, भारतदर्शन करण्यास निघणाऱ्या प्रवाशाला या भूमीविषयीं नेहमींच आकर्षण वाटत असतें. सॉमरमेट मॉम हा जेव्हां भारतांत आला तेव्हां तो मुद्दाम गोव्याला गेला होता. कै. पं. जवाहरलाल नेहरूंना विचारलें असतां ते म्हणाले होते, "गोवा म्हणजे मोठी गंमत आहे!" अशा या भूमींत देवादिकांचीं अनेक प्रेक्षणीय आणि जागृत अशीं देवस्थानें आहेत. माशेल, मंगेशी, म्हाळसा, वेलिंग, नागेश, महालक्ष्मी, रामनाथ, शांतादुर्गा, कामाक्षी व सप्तकोटीश्वर हीं विख्यात मंदिरें ओळखलीं जातात. आर्थिक परिस्थिति व मानसन्मान या दृष्टीनें गोव्यांतील सर्व देवस्थानांत श्री मंगेश देवस्थानचा क्रमांक पहिला असून, दुसरा क्रमांक श्री शांतादुर्गा संस्थानचा व तिसरा श्री रामनाथ देवस्थानाचा आहे, असें मानण्यांत येतें. गोमंतकांत गेलेला प्रत्येक भारतीय भाविक निदान या तीन देवस्थानांचें दर्शन घेतल्याशिवाय रहात नाहीं.

श्री शांतादुर्गादेवीची .जन्मकथा मोठी रंजक आहे. स्कंद पुराणांतील अंबिका खंडांत ती देण्यांत आलेली आहे. ती थोडक्यांत अशी—

एकदां शंकर आणि विष्णु एकमेकांवर भयंकर रागावले. मनस्वी चिडले. इतके कीं, त्यांनीं आपापलीं शस्त्रें रागाच्या भरांत एकमेकांवर सोडलीं. भगवान विष्णूनीं शंकरावर सुदर्शनचक्र सोडलें तर श्री शंकरांनीं पाशुपत नांवाचें अस्त्र सोडलें. दोन्ही अस्त्रें मोठीं भयंकर होतीं. उभयतांच्या चाललेल्या युद्धांत कुणी कुणाला हार म्हणून जाईना. त्यांच्या या भांडणामुळें पृथ्वीवर प्रलयकाळ होईल कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. सुदर्शन-पाशुपताच्या भयंकर धुमश्चक्रींत आगीचा डोंब भूतलावर उसळला आणि जग पेटूं लागलें. आपण निर्माण केलेलें जग दोन महान् योद्ध्यांच्या हट्टापायीं आतां जळून खाक होणार असें दिसतांच बिचारा ब्रह्मदेव घाबरला आणि त्यानें आदिमाया शक्तिदेवता जगदंबेची आराधना केली. तेव्हां ती प्रसन्न झाली आणि ब्रह्मदेवासमोर उभी राहिली. ब्रह्मदेवानें लागलीच विष्णु–शंकराच्याकडे बोट दाखविलें व ते म्हणाले, "देवते, पहा हे दोघे कसे हमरीतुमरीवर येऊन भांडताहेत. त्यांना आतां आवर!" आदिमाया लगेच त्या भांडखोरांच्या मधोमध येऊन उभी राहिली आणि एका हातानें तिनें विष्णूला आणि दुसऱ्या हातानें शंकरास पकडलें. त्या दोघांची तिनें चांगलीच कानउघाडणी केली. जगन्मातेचा हस्तस्पर्श होतांच दोन्ही देव भानावर आले. त्यांना समज आली, आपली चूक कळून आली व त्यांनीं आपापलीं शस्त्रें परत घेतलीं. आपण दोघे श्रेष्ठ देव असून भांडत आहोंत आणि तें इतक्या क्रूरपणानें! याबद्दल त्यांना लाज वाटली व ते जगदंबेला म्हणाले, "हे दुर्गे, भयंकर संतापानें आम्हांला ग्रासलें आणि त्यामुळेंच आमच्यांत अशीं भांडणें झालीं. तूं अगदीं वेळेवर आलीस, नाहींतर या भांडणाचे परिणाम आणि हत्यारफेंकीचे घातआघात किती भयंकर झाले असते याची कल्पनाच करवत नाहीं. संतप्त झालेल्या आम्हांला तूं शांत केलेस

म्हणून आजपासून लोक तुला 'शांतादुर्गा' असें म्हणूं लागतील. तेव्हां-पासून आदिमाया शक्तिदेवता 'शांतादुर्गा' या नांवानें ओळखली जाऊं लागली. विष्णु आणि शंकर शांत झाल्यामुळें साऱ्या जगानें सुटकेचा निःश्वास टाकला.

श्री शांतादुर्गा गोमंतकांतील कौशिक गोत्रीय गौड सारस्वत ब्राह्मणांचें कुलदैवत आहे. त्याचप्रमाणें सारस्वतांपैकीं कौंडिण्य, भारद्वाज, वत्स गोत्रांचीं घराणीं, साताऱ्याकडील कांहीं देशस्थ ब्राह्मण आणि गोव्यांतील व कर्नाटकांतील कांहीं ब्राह्मणेतर शांतादुर्गेला आपली कुलदेवता समजतात.

श्री शांतादुर्गाचें मूळ स्थान सासष्ट प्रांतांतील कर्दलीपूर ऊर्फ केळोशी हें गांव होतें. केळोशी येथें देवीचें छोटेसेंच प्राचीन पद्धतीचें, पण रम्य असें देऊळ होतें. परंतु कालांतरानें तें मोडकळीस आलें त्यामुळें अनु शेणवी नामक एका धनाढ्य व्यापारीभक्तानें या देवळाचा जीर्णोद्धार केला. हा अनु शेणवी मोठा धर्माभिमानी होता. त्यानें तत्कालीन गोमंत-कांत बाटवून ख्रिश्चन झालेल्या लोकांना त्यांचें शुद्धिकरण करून हिंदु धर्मांत आणलें होतें. तत्कालीन राजवटीला ही गोष्ट पसंत पडली नाहीं आणि म्हणूनच कीं काय पोर्तुगीज सरकारनें त्याला शिक्षा दिली असा उल्लेख सांपडतो.

इ. स. १५४१ पासून गोव्यांत सर्वत्र अंदाधुंदी चालू होती. पोर्तुगीज पाद्री जुलमानें हिंदूंना ख्रिश्चन करीत होते. त्यांनीं जर न ऐकलें तर ते त्यांच्यावर अत्याचार करीत, त्यांचा अन्वनित छळ करीत असत. या पोर्तुगीजांनींच हिंदु देव-देवतांवर—त्यांच्या मूर्तीवर—मंदिरांवर धाड घालण्यास, त्यांचा विध्वंस करण्यास कमी केलें नाहीं. अशाप्रकारें बाटवा-

बाटवीचे, मोडतोडीचे, जाळपोळीचे नि हिंदूंच्या छळाचे प्रकार गोव्यांत चालू होते.

इ. स. १५६४ सालीं जेव्हां सासष्टी भागावर धाड आली तेव्हां मात्र तेथल्या हिंदूंचें धाबें दणाणलें आणि आपल्याला जें कांहीं नेण्यासारखें होतें तेवढें नेऊन ते जीवानिशीं वाट मिळेल तिकडे पळूं लागले. इतर देवळांवर जशी ख्रिस्त्यांनीं धाड घातली तशी या शांतादुर्गेच्या मंदिरावरहि त्यांची धाड आली आणि इ. स. १५६६ सालीं तें जाळण्यांत आलें. परंतु मोठ्या भाग्याची गोष्ट कीं तेथील महाजन मंडळींनीं श्रीशांतादुर्गेची मूर्ति अगोदरच पळवून ती सौंधेकरच्या अंत्रुज (फोंडा) प्रांतांत नेली. गोमंतकाचा हा केंद्र भाग फोंडा महाल त्यावेळीं राजे सौंधेकर यांच्या ताब्यांत होता. सौंधेकर हे कर्नाटकांतील शिरली सौंध्याचे लिंगायत राजे या सौंधेकरांच्या राज्यांत केळशीनिवासी महाजन मंडळींनीं फोंड्यापासून मैल सव्वामैल अंतरावर असलेल्या कैवल्यपूर गांवांत देवी आणली आणि त्या गांवच्या महारवाड्यांत देवीच्या मंदिरासाठीं जागा निवडली. तिथें रहाणाऱ्या महारांनीं मोठ्या आनंदानें आपली वस्ती हलवून देवीच्या मंदिरासाठीं जागा करवून दिली आणि मग देवीचें देऊळ तिथें उभारण्यांत आलें. देवीच्या मूर्तीची स्थापना करण्यापूर्वी महारवाड्यांतील महारांनीं एक अट घातली कीं, "वर्षांतून एकदां आम्हांला हक्कानें मंदिरांत जाऊन देवीचें दर्शन घेतां आलें पाहिजे." ही त्यांची मोठी प्रेमाची आणि भक्तीच्या भावनेची अट केळशीकर महाजनांनीं तावडतोब मान्य केली व त्या जागेवर श्री शांतादुर्गेचें एक छोटेसें मंदिर बांधून त्यांत इ. स. १५६७ मध्यें मूर्तीची स्थापना केली गेली. तेव्हांपासून तोंआजपर्यंत वर्षांतून

एकदां माघ शुद्ध षष्ठीच्या दिवशीं सायंकाळीं अस्पृश्य लोक श्री शांता-दुर्गेच्या मंदिरांत प्रवेश करून आपलीं पंचवाद्यें वाजवितात व देवीचें दर्शन घेतात. त्यावेळीं त्यांना तांदूळ, नारळ, विड्यावर कांहीं पैसे व देवीचें एक लुगडें देऊन त्यांचा मान–सन्मान केला जातो. माघ मासांतील जत्रेची समाप्ति याच हरिजन–प्रवेशानें होत असते. दक्षिण भारतांतील कांहीं मंदिरांतूतहि वर्षांतून एकदां हरिजनांना प्रवेश देण्याची प्रथा आढळते. अनार्यांची मनें राखण्यासाठीं आर्यांनीं ज्या कांही युक्त्या योजल्या त्यापैकींच ही एक होय, असें इतिहासतज्ज्ञ या बाबतींत सांगतात.

केळशीकर महाजनांनीं कैवल्यपूर ऊर्फ कवळें येथें इ. स. १५६४ ते १५६७ च्या दरम्यान शांतादुर्गेचें अगदीं लहानसेंच देऊळ बांधलें आणि रोज देवीची पूजा, अर्चा, नैवेद्य, आरती इत्यादि उपचार चालू केले. केळशीहून आलेले कांहीं लोक देवीच्या देवळासभोंवतालीं राहूं लागले तर कांहीं उदरनिर्वाहासाठीं म्हणून भारतभर पांगले गेले.

या पांगल्या गेलेल्या मंडळींतच नारोराम शेणवी रेगे या नांवाचे एक भाविक गृहस्थ होते. ते देवीची पूजा, अर्चा नित्य नियमानें करीत असत. आपल्या परिस्थितींत बदल व्हावा, आपणांला बरे दिवस यावेत अशीच इच्छा त्यांच्या या पूजेमागें होती. परंतु आपली इच्छा फळाला येत नाहीं म्हणून कंटाळून जाऊन त्यांनीं आत्महत्या करण्याचें ठरविलें व ती करण्याच्या आदल्या दिवशीं ते देवीच्या देवळांत कीर्तनास येऊन बसले. त्यांतच त्यांना डुलकी आली. तींत देवीनें त्यांना दृष्टांत दिला आणि आत्महत्येपासून निवृत्त होण्याची आज्ञा केली. ‘या पुढें तुला चांगले दिवस येतील. तूं जिथें जाशील तिथें तुझा विजय होत जाईल. तूं फक्त

देशाटन कर असें बजावून सांगितलें.' लागलीच नारोजींना जाग आली. त्यांनीं आत्महत्येचा विचार सोडून दिला आणि देवीच्या सांगण्याप्रमाणें देशाटन करण्याचें ठरविलें. महाराष्ट्रांत त्यावेळीं हिंदुपतपादशाहीच्या दोन गाद्या होत्या. एक कोल्हापूर व दुसरी सातारा. साताऱ्याच्या गादीवर त्यावेळीं श्री छत्रपती शाहू महाराज होते. त्यांच्या आश्रयास नारोजी येऊन राहिले. शाहू छत्रपतींचा त्यांनीं विश्वास संपादन केला आणि आपल्या अंगच्या गुणांनीं आणि वर्तनानीं प्रधानमंडळांत त्यांचा समावेश होऊन ते पुढें मंत्री पण बनले. देवीनीं त्यांना दिलेला आशीर्वाद हा असा खरा ठरला. याच नारोराम शेणवी रेगे यांनीं इ. स. १७०८ ते १७३८ दरम्यान हल्लींचें श्री शांतादुर्गेचें भव्य देऊळ बांधलें आहे. इ. स. १७२९ त श्रीमंत बाजीराव पेशवे यांचेकडून कवळें गांव देवीस इनाम देवविला आणि पुन्हां या देवीची पूजा, अर्चा मूळच्या इतमामानें होऊं लागली. या शिवाय अनेकांनीं शक्यतेनुसार देणग्या दिल्या. सध्यां या देवळाचें वार्षिक उत्पन्न २० ते २२ हजार रुपये असून १५ ते १६ हजार रु. खर्चहि होत असतो. इ. स. १८९८ मधें या देवळावर पठाणांचा दरोडा पडला होता आणि देवीचे अलंकार, रोकड मिळून लाखाचा माल लांबविला गेला. या दरोडेखोरांना पकडण्यासाठीं पोर्तुगीज सरकारचे शिपाई बँड वाजवत वाजवत गोवा सरहद्दीपर्यंत गेले होते; परंतु त्यांत त्यांना मुळींच यश आलें नाहीं.

आज मुंबईहून गोव्याला आगबोट, रेल्वे व विमान या मार्गांनीं जातां येतां येतें. मुंबईहून निघालेली आगबोट रत्नागिरी, मालवण, वेंगुर्ले हीं बंदरें घेऊन गोव्याला जाते. या प्रवासाला सुमारें २० तास लागतात. आगगाडीनें पुण्याहून सदर्न मराठा रेल्वेनें मिरज-बेळगांववरून पुढें लोंढा

जंक्शनवर उतरून दुसऱ्या गाडीनें गोव्यांतल्या मुरगांव बंदरापर्यंत जातां येतें. या प्रवसालाहि २० ते २२ तास लागतात. मुंबई ते त्रावणकोर विमान वहातुकीचें विमान गोव्याला कांहीं वेळ थांबतें. या विमानांतून मुंबईहून गोव्यास १ तास ८० मिनिटांत जातां येतें. अलिकडे गोवा स्वतंत्र झाल्यापासून मुंबई ते गोवा एस. टी. सर्व्हिस पण चालू झाली आहे. गोव्यांतील फोंडे महालांत फोंड्यापासून मैल सव्वामैल अंतरावर श्री शांता-दुर्गा देवस्थान, आहे. फोंड्याहून तिथें जाण्याकरितां मोटारी बसेस, यांची सोय आहे. फोंड्याचें कपिलेश्वराचें मंदिर सोडलें कीं, दोन खांब लागतात. तेथून डाव्या बाजूला वळलें कीं, शांतादुर्गेचें मंदिर दिसतें. समोरचा रस्ता रामनाथीला जातो; आणि देवळासमोरचा रस्ता नागेशीला जातो. जवळच्या परिसरांत नागेश, महालक्ष्मी, रामनाथ व शांतादुर्गा हीं चार मंदिरें जवळ जवळ आहेत. त्यामुळें धडधाकट माणसाला दोन चार तासांत पायीं पायीं सुद्धां हीं मंदिरें अगदीं सहज पाहतां येतात.

श्री शांतादुर्गेचें मंदिर छोट्याशा उंचवट्यावर आहे त्यामुळें कांहींशीं चढण चढावी लागते. ती चढण चढून आलें कीं, देवळाचें आवार लागतें. दाराशीं तळाव, प्रवेशद्वारावर नगारखाना, प्रशस्त आवार, मंदिरासमोरील खांब ऊर्फ दीपस्तंभ, मंदिराच्या सभागृहांत हंड्या, झुंबरें इत्यादि सर्व त्या गोष्टी, वस्तू, जिनसा गोमंतकांतील इतर मंदिरांत दिसतात त्याप्रमाणेंच आहेत. मात्र मंदिरावरील घुमट जरा निराळ्या पद्धतीचा आहे. आधुनिक पाश्चात्य स्थापत्यानें तो प्रभावळींत झालेला असल्यामुळें प्रवाशांचें लक्ष तो अधिक आकर्षून घेतो.

केळोशीहून आलेली आणि आज कैवल्यपूर ऊर्फ कवळें येथें कायमची अधिष्ठापित झालेली श्री शांतादुर्गेची मूर्ति मोठी मनोहारी आहे.

तिचें आधुनिक काळांतलें नांव शांतादुर्गा असें जरी असलें तरी तिचें मूळ नांव सांतेरी. केळोशीला तिचें हेंच नांव रूढ होतें. 'माय' असेंहि तिला संबोधतात. केळोशीला जिथें तिचें देऊळ होतें ती जागा पोर्तुगीजांनी उध्वस्त करून टाकली. परंतु गोमंतकीय आद्यकवि सारस्वत ब्राह्मण कृष्णदास शामा यानें 'कृष्ण चरित्र गाथा' या आपल्या मराठी ग्रंथाचा आरंभ इ. स १५२६ त या देवळांत बसून केला होता. ही देवता केळोशीहून कवळ्याला आली खरी, परंतु कवळ्याला येण्यापूर्वीं तिचें वास्तव्य बंगालला होतें. कोंकणचा पाया रचणाऱ्या श्री परशुरामानें बंगालहून जे ब्राह्मण गोमंतकांत आणले त्या दशगोत्रांतील ब्राह्मणांपैकीं कौशिक गोत्री ब्राह्मणांची ही देवता. या कौशिक गोत्री ब्राह्मणांस केळशी हें गांव अग्रहार मिळालें तेव्हां त्यांनीं तिथें आपली वरणी केली व आपल्याबरोबर नेलेल्या देवदेवतांची पण तिथें स्थापना केली. त्यापैकींच श्री शांतादुर्गा ही होय.

फोंड्याहून कपिलेश्वराचें मंदिर मागें टाकून गेल्यावर श्री शांतादुर्गेचें मंदिर लागतें. देवळांत जाण्यासाठीं थोडीशी चढण चढावी लागते. देवळाच्या आवारांत एक तलाव व तुलसी वृंदावन आहे. देवळाच्या प्रवेश द्वाराजवळच चौघड्यासाठीं एक खास घरकुल बांधलेलें आहे. त्यामुळें चौघड्याचा आवाज आसमंतात दुमदुमतो. येथें त्रिकाल नौबतीचा चौघडा मुंबईचे दानशूर गृहस्थ कै. नारायणराव दाभोळकर यांनीं ठेवला आहे. देवळाचा प्राकार विस्तीर्ण असून, देवळाच्या उभय बाजूस इमारती आहेत. तिथें महाजन मंडळी रहातात. देवळाजवळ दीपस्तंभ असून अग्रशाळा आहे. एक अग्रशाळा रामचंद्र मल्हार सुखटणकर यांनीं बांधून दिलेली आहे. प्रत्यक्ष देवळांत शिरल्यावर जोडे काढून ठेवण्याची

एक चौकोनी खोली आहे. तिथें एक जंगी आरसा असून तुताऱ्या वगैरे वाद्यें व्यवस्थित लावून ठेवलेलीं आहेत. ही खोली ओलांडली कीं भव्य सभागृह लागतें त्याला चौक असें म्हणतात. या चौकांतल्या पटईवर झुंबरें नि हंड्या यांनीं एकच गर्दी करून सोडलेली आहे. चौकांत जंगी समया आणि त्याखालीं पराती पण आहेत. चौकाच्या एका कडेला मध्यभागीं श्री शांतादुर्गेची छानदार मूर्ति असून एका हातांत तिनें विष्णु व दुसऱ्या हातांत शंकराला घेतलेलें आहे अशा थाटांत ती आहे. देवीची मूर्ति मोठी मोहक, शांत, सौम्य व सुहास्यवदना आहे. देवी इतकी सुंदर आहे कीं, मूर्तिपुढून नजर हालवूंच नये असें वाटतें. मूर्तिशेजारीच एक शिवलिंगहि आहे. देवीच्या देवळाजवळ नारायण नि गजाननाचें मंदिर आहे.

देवीची दरदिवशीं आरती करण्यांत येते त्यावेळीं पन्नास–साठ निरांजनांनीं तिला ओवाळलें जातें. या आरतीला झाड असें म्हणतात. त्या आरतीनंतर कापराची आरती करण्यांत येते. दर पंधरवड्यास पंचमीस देवीची पालखींतून मिरवणूक काढली जाते. या मिरवणुकीची सुरुवात रात्रीं साडेदहाला होते. याशिवाय वैशाख शुद्ध पंचमी, दसरा, कोजागिरी यावेळींहि तिथें उत्सव होतो. माघ शुद्ध प्रतिपदेपासून षष्ठीपर्यंत देवीचा मुख्य वार्षिक उत्सव होतो असतो. याला जत्राउत्सव असेंहि म्हणतात. प्रतिपदेपासून रोज निरनिराळ्या वाहनांतून देवीची मिरवणूक निघते. पंचमीचा महारथोत्सव हा त्यांतील सुवर्णकळस होय. षष्ठीच्या दिवशीं हरिजन मंडळी मंदिर प्रवेश करतात आणि नंतरच या महोत्सवाची समाप्ति होते. देवीची नवीन आद्यपीठ मूर्ति शके १८२३ फाल्गुन शुद्ध दशमीस प्रतिस्थापित करण्यांत आली व फाल्गुन शुद्ध सप्तमीस नूतन

तिचें आधुनिक काळांतलें नांव शांतादुर्गा असें जरी असलें तरी तिचें मूळ नांव सांतेरी. केळोशीला तिचें हेंच नांव रूढ होतें. 'माय' असेंहि तिला संबोधतात. केळोशीला जिथें तिचें देऊळ होतें ती जागा पोर्तुगीजांनीं उध्वस्त करून टाकली. परंतु गोमंतकीय आद्यकवि सारस्वत ब्राह्मण कृष्णदास शामा यानें 'कृष्ण चरित्र गाथा' या आपल्या मराठी ग्रंथाचा आरंभ इ. स १५२६ त या देवळांत बसून केला होता. ही देवता केळोशीहून कवळ्याला आली खरी, परंतु कवळ्याला येण्यापूर्वीं तिचें वास्तव्य बंगालला होतें. कोंकणचा पाया रचणाऱ्या श्री परशुरामानें बंगालहून जे ब्राह्मण गोमंतकांत आणले त्या दशगोत्रांतील ब्राह्मणांपैकीं कौशिक गोत्री ब्राह्मणांची ही देवता. या कौशिक गोत्री ब्राह्मणांस केळशी हें गांव अग्रहार मिळालें तेव्हां त्यांनीं तिथें आपली वरणी केली व आपल्याबरोबर नेलेल्या देवदेवतांची पण तिथें स्थापना केली. त्यापैकींच श्री शांतादुर्गा ही होय.

फोंड्याहून कपिलेश्वराचें मंदिर मागें टाकून गेल्यावर श्री शांतादुर्गेचें मंदिर लागतें. देवळांत जाण्यासाठीं थोडीशी चढण चढावी लागते. देवळाच्या आवारांत एक तलाव व तुलसी वृंदावन आहे. देवळाच्या प्रवेश द्वाराजवळच चौघड्यासाठीं एक खास घरकुल बांधलेलें आहे. त्यामुळें चौघड्याचा आवाज आसमंतात दुमदुमतो. येथें त्रिकाल नौबतीचा चौघडा मुंबईचे दानशूर गृहस्थ कै. नारायणराव दाभोळकर यांनीं ठेवला आहे. देवळाचा प्राकार विस्तीर्ण असून, देवळाच्या उभय बाजूस इमारती आहेत. तिथें महाजन मंडळी रहातात. देवळाजवळ दीपस्तंभ असून अग्रशाळा आहे. एक अग्रशाळा रामचंद्र मल्हार सुखटणकर यांनीं बांधून दिलेली आहे. प्रत्यक्ष देवळांत शिरल्यावर जोडे काढून ठेवण्याची

एक चौकोनी खोली आहे. तिथें एक जंगी आरसा असून तुताऱ्या वगैरे वाद्यें व्यवस्थित लावून ठेवलेलीं आहेत. ही खोली ओलांडली कीं भव्य सभागृह लागतें त्याला चौक असें म्हणतात. या चौकांतल्या पटईवर झुंबरें नि हंड्या यांनीं एकच गर्दी करून सोडलेली आहे. चौकांत जंगी समया आणि त्याखालीं पराती पण आहेत. चौकाच्या एका कडेला मध्यभागीं श्री शांतादुर्गेची छानदार मूर्ति असून एका हातांत तिनें विष्णु व दुसऱ्या हातांत शंकराला घेतलेलें आहे अशा थाटांत ती आहे. देवीची मूर्ति मोठी मोहक, शांत, सौम्य व सुहास्यवदना आहे. देवी इतकी सुंदर आहे कीं, मूर्तिपुढून नजर हालवूंच नये असें वाटतें. मूर्तिशेजारीच एक शिवलिंगहि आहे. देवीच्या देवळाजवळ नारायण नि गजाननाचें मंदिर आहे.

देवीची दरदिवशीं आरती करण्यांत येते त्यावेळीं पन्नास–साठ निरांजनांनीं तिला ओवाळलें जातें. या आरतीला झाड असें म्हणतात. त्या आरतीनंतर कापराची आरती करण्यांत येते. दर पंधरवड्यास पंचमीस देवीची पालखींतून मिरवणूक काढली जाते. या मिरवणुकीची सुरुवात रात्रीं साडेदहाला होते. याशिवाय वैशाख शुद्ध पंचमी, दसरा, कोजागिरी यावेळींहि तिथें उत्सव होतो. माघ शुद्ध प्रतिपदेपासून षष्ठीपर्यंत देवीचा मुख्य वार्षिक उत्सव होतो असतो. याला जत्राउत्सव असेंहि म्हणतात. प्रतिपदेपासून रोज निरनिराळ्या वाहनांतून देवीची मिरवणूक निघते. पंचमीचा महारथोत्सव हा त्यांतील सुवर्णकळस होय. षष्ठीच्या दिवशीं हरिजन मंडळी मंदिर प्रवेश करतात आणि नंतरच या महोत्सवाची समाप्ति होते. देवीची नवीन आद्यपीठ मूर्ति शके १८२३ फाल्गुन शुद्ध दशमीस प्रतिस्थापित करण्यांत आली व फाल्गुन शुद्ध सप्तमीस नूतन

प्रसादपट्टा स्थापन केला. याबद्दल दरवर्षीं फाल्गुन समाप्तीपासून दशमीपर्यंत उत्सव साजरा केला जातो. नवरात्रांत तर देवीच्या दर्शनास अतोनात गर्दी होते.

गोमंतकांतल्या बहुतेक सर्व गांवांत शांतादुर्गा ही जाऊन पोंचलेली आहे. कवळें येथें असलेलें तिचें देवालय हें मुख्य असलें तरी गोव्यांत खंडेपार, कुंकळ्ये, गोठण, माशेल, तिवरें, पाळयें, धारगळ, कांदोळी, नेरूल, बांदोडे, मुळगांव, आमोणे, कातरपें, वरडें, घुडा, पारोडें, कोळंब, कालापूर इ. ठिकाणीं या देवतेचीं ल्हान मोठीं मंदिरें आहेत.


गोमंतकांतल्या या सर्वांगसुंदर देवतेला नमस्कार असो.

३५५०९ दि. ... १५/२/६९
३५७

# गुजरातची श्री अंबाजी

भारतांतील निरनिराळ्या प्रांतांचीं निरनिराळीं कुलदैवतें आहेत. तुळजापूरची भवानीमाता, कोल्हापूरची अंबाबाई, मातापूरची रेणुकामाता हीं महाराष्ट्राचीं कुलदैवतें तर प्रसिद्धच आहेत. याशिवाय निरनिराळ्या पोटजातीच्या लोकांचीं कुलदैवतें पण भिन्न भिन्न आढळतील. मद्रास राज्यांतील कांहीं हिंदूंचें कुलदैवत तिरुपति येथला बालाजी आहे. तर गुजरात राज्यांतील असंख्य हिंदूंचें कुलदैवत अबु रोड स्टेशनपासून चौदा मैलांवर असलेलें अंबामाता किंवा अंबाजी हें समजलें जातें. गुजरात आणि सौराष्ट्रांतील लाखों गुर्जरांचें अंबाजी हें कुलदैवत आहे. राजापासून रंकापर्यंत सर्व थरांचे लोक या अंबाजीचें दर्शन घेतात आणि कृतकृत्य होतात. परप्रांतांतून किंवा परदेशाहून आलेले गुजराती श्री अंबाजीचें दर्शन घेतल्यावांचून पुन्हां परदेशांत वा परप्रांतांत जात नाहींत. गुजरातमध्यें स्थायिक झालेले महाराष्ट्रीय सुद्धां या देवीचे उपासक आहेत; भक्त आहेत. या अंबामातेला आरासुरी अंबिका असें म्हणतात. ती अखिल जगताची आद्यशक्ति आहे अशी समस्त गुर्जरबंधूंची भावना आहे. जेव्हां एखादी आसुरीशक्ति भूतलावर धुमाकूळ घालते तेव्हां भगवती आद्यशक्ति कोणत्या तरी स्वरूपांत या पृथ्वीतलावर अवतीर्ण होते आणि आसुरीशक्तीचा संहार करून भक्तांचें संरक्षण करते अशी दृढ श्रद्धा आहे.

गुजरातची कुलस्वामिनी अंबाजी किंवा अंबामाता याबद्दलची एक रंजक कथा आहे ती थोडक्यांत अशी—



गुजरातची श्री अंबाजी

प्राचीन काळीं कश्यप नांवाचे एक मुनि होऊन गेले. त्यांच्या पत्नीचें नांव दनु. तिला रंभ आणि करंभ असे दोन पुत्र झाले. हे दोघेहि भाऊ मोठे बलिष्ठ होते. त्यांची एक मोठी महत्त्वाकांक्षा होती. त्यांना हें पृथ्वीवरचें राज्य खूपच लहान वाटत होतें. तेव्हां आपण इंद्रपद मिळवावें अशी त्या दोघां भावांची खूप इच्छा होती व त्याकरितां त्यांनीं पंचनद म्हणजे पंजाब प्रदेशांतील घोर अरण्यांत जाऊन उग्र तपश्चर्येला सुरुवात केली.

सिंधु, वितस्ता, परुष्णि, असिक्नि व शतद्रु या पांच नद्यांच्या पवित्र संगमावर करंभानें योगसाधना आरंभिली. पाण्याच्या पृष्ठभागावर तो एकाग्रतेनें ध्यानस्थ बसला. त्याचें तें उग्र तप पाहून इंद्राला भीति वाटली आणि आपलें इंद्रपद शाबूत राखण्यासाठीं तो नाना युक्त्या योजूं लागला. त्यानें भयंकर मगराचें रूप घेतलें आणि करंभ जिथें तपश्चर्या करीत होता तिथें जाऊन त्यानें त्याला गिळंकृत केलें आणि अशाप्रकारें करंभाचा करुण मृत्यु झाला.

इकडे जवळच्या एका अरण्यांत वटवृक्षाखालीं रंभ पण तपश्चर्या करीत होता. तो अगदीं लीन झाला होता. तो अग्निदेवाची पूजा-अर्चा-जप करीत असे. इतक्यांत त्याला आपल्या बंधूच्या दुःखद निधनाची वार्ता समजली. ती ऐकून त्याला अतिशय दुःख झालें. विशेषतः मगरीनें त्याला गिळंकृत केलें यामुळें तर त्याला भारी राग आला. आतां आपल्याला भावाच्या मृत्यूनंतर जगून तरी काय करायचें आहे आपणहि देहत्याग करावा या हेतूनें अग्निदेवतेपुढें आपलें मस्तक कापून ठेवण्याचा त्यानें विचार केला. इतक्यांत अग्निदेव प्रगट झाले व त्यांनीं त्याला त्या विचारापासून परावृत्त केलें व 'वर माग' अशी आज्ञा केली. रंभानें, "हे प्रभो, माझ्या भक्तिभावानें जर तूं खरोखर प्रसन्न

झाली असशील तर मला असा पुत्र दे कीं, त्याला नर जातीपैकीं कुणीच मारूं शकणार नाहीं. अग्निदेवानें "तथास्तु" असें म्हटलें.

हें वरदान मिळाल्यावर रंभानें गंधर्वलोक, पिशाश्चलोक, नागलोक यावर विजय मिळविला. यक्षलोकांवर विजय मिळविण्याकरितां त्याला घनघोर लढाई करावी लागली, पण तिथेंहि त्यानें विजय मिळविला; व यक्ष राजाची लावण्यावति पत्नी महिषी ही सुद्धां त्यानें पळविली. तिला घेऊन तो आपल्या राज्यांत आला. याच महिषीला पुढें त्याच्यापासून एक पुत्र झाला. त्याचें नांव रंभानें महिषासुर असें ठेवलें.

महिषासुर रूपानें महाभयंकर असा होता. जस जसा तो मोठा मोठा होऊं लागला तसतसा तो अक्राळविक्राळ दिसूं लागला. राक्षसच तो. विविध प्रकारची भेसूर, भयानक रूपें घेऊन तो पृथ्वीतलावरील लोकांना घाबरवून सोडत असे. आपल्या बापानें आपल्याला कुणाहि नरजातीपासून मरण येऊं नये असा वर मिळविला आहे, हें त्याला समजतांच बापानें वर मागतांना कांहींतरी घोडचूक केली आहे, असें त्याला वाटलें आणि नरजातीपासूनच नव्हे, तर कोणत्याहि शस्त्र–अस्त्रांनीं सुद्धां आपणांला मरण येऊं नये, अशी वरांत सुधारणा करून घेण्यासाठीं म्हणून त्यानें अग्निदेवाची तपश्चर्या करण्यास सुरुवात केली. त्याची ती उग्र, कडक तपश्चर्या पाहून अग्निदेव प्रसन्न झाले आणि 'वर माग' असें म्हणतांच 'माणसांच्या कोणत्याहि हत्यारानें आपल्याला मृत्यु येतां कामा नये' अशी त्यानें मागणी केली. 'तथास्तु' म्हणून अग्निदेव अंतर्धान पावले.

ह्या वर मिळतांच महिषासूर मदोन्मत्त झाला आणि इंद्र, चंद्र, सूर्य, यम, वरुण आणि कुबेर यांना त्रास देऊं लागला. देवांनीं त्याचा नाश करण्याचे खूप प्रयत्न केले पण ते सारे व्यर्थ गेले.

महिषासुरानें नंतर आपल्या सैन्यांत चिक्षुर, चामर, दुर्धर, उदग्र, कराल, बाष्कळ, ताम्र, महासुर, अतिलोम, उग्रास्थ, उग्रवीर्य, महाहनु, बिडाल, दुर्मुख, रक्तबीज, शुंभ, निशुंभ, धुमाक्ष, चंड व मुंड इत्यादि एकाहून एक बलवान अशा राक्षसांची भरती केली. दिवसेंदिवस त्यांचा त्रास इतका वाढूं लागला कीं, आश्रमवासी मुनीजनांना पण तो भयंकर त्रास देऊं लागला. देवलोकांत जाऊन देवांगनांना पण तो छळूं लागला. इंद्रावर चाल करून सुद्धां त्यानें इंद्रपद मिळविलें तेव्हां बिचारे इंद्रदेव तेथून जीव घेऊन पळाले.

यानंतर ब्रह्मलोक, विष्णुलोक व कैलास यावर विजय मिळविण्याची या मदोन्मत्त महिषासुरानें तयारी चालविली. तेव्हां देवदेवता अतिशय घाबरून गेल्या व त्या ब्रह्मदेवाजवळ गेल्या व संरक्षणाची त्यांनीं मागणी केली. ब्रह्मानें त्यांचें म्हणणें ऐकून घेतलें व तो त्यांना घेऊन विष्णु-देवाकडे गेला. विष्णूनीं त्या सर्वांचें म्हणणें ऐकलें व तो त्यांना घेऊन कैलासावर शंकराकडे गेला.

अशा प्रकारें ब्रह्मा, विष्णु, महेश नि सर्व देव यांचा प्रचंड मेळावा कैलासावर चिंताग्रस्त होऊन जमला. त्यांनीं यथाविधि महादेवाचें पूजन-अर्चन करून आपल्यावर ओढवलेल्या महासंकटाची जाणीव करून दिली आणि संरक्षणाची याचना केली.

महादेवानें यावर योग्य उपाय म्हणून आद्यशक्ति जगदंबेची स्तुति करून तिला प्रसन्न करून घेऊं या. तीच आपल्याला या बिकट अडचणींतून सोडवूं शकेल, असें सांगितलें.

लागलीच सारे देव आद्यशक्ति जगदंबेची आराधना करूं लागले. तेव्हां त्यांच्या शरीरांतून एक अलौकिक तेजःपूंज निघाला. त्यानें बिंबाकार रूप धारण केलें. इतक्यांत महेशाच्या शरीरांतूनहि तसेंच तेजोवलय बाहेर

आलें व पूर्वीच्या बिंबाकारांत समाविष्ट झालें. हा तेजोगोल एवढा दैदिप्यमान झाला कीं, त्यामुळें अनेक देव मूर्च्छित पडले. हळू हळू या तेजोगोलांतून अति दिव्य अशी आकृति प्रगटली. तीच ही जगदंबा माता अंबाजी होय. सर्वांनीं तिला वंदन केलें व तिच्यापुढें संरक्षणाची याचना केली. या अंबामातेला शंकरानीं त्रिशूळ, विश्वकर्म्यानें परशु, यमराजानें दंड, विष्णूनीं सुदर्शनचक्र, हिमालयानें सिंह, कुबेरानें अमृतकुंभ इत्यादि वस्तु अर्पण केल्या. सर्व देवाधिदेवांनीं तिला शुभ आशीर्वाद दिले. याच अंबामातेनें पुढें घनघोर युद्ध करून महिषासुराचें मर्दन करून त्याला व त्याच्या सर्वच्या सर्व सहकारी दानवांना ठार मारलें. तेंव्हांपासून देवीला महिषासुरमर्दिनी असें संबोधण्यांत येऊं लागलें. अशी आहे ही या देवीची थोडक्यांत जन्मकथा:

पांडवांनीं सुद्धां आपला गुप्तवास यशस्वी व्हावा यासाठीं याच अंबादेवीची आराधना केली होती व तिच्याच कृपेमुळें त्यांचा मनोदय सिद्धीस गेला.

रावणानें सीतेचें हरण केल्यावर प्रभु राम व लक्ष्मण सीतेचा शोध करीत करीत अर्बुदारण्यांत शृंग मुनीच्या आश्रमांत आले असतांना मुनीवर्यांनीं तेंव्हां त्यांना अंबिका महात्म्य समजावून सांगितलें व संकटकाळीं भगवती आद्यशक्ति धांवून येते तेंव्हां तिची मनोभावें प्रार्थना करा असें सांगितलें. प्रभू रामचंद्रांनीं तिची आराधना केली तेंव्हां अंबाजी त्यांना प्रसन्न झाली व सीतेचा शोध लागेल, तुला सर्वत्र जय मिळेल असा आशीर्वाद दिला.

मेवाडचे अधिपति वीर चुडामणि महाराणा प्रताप याला ही देवी प्रसन्न होती व ती त्याला वेळोवेळीं दृष्टान्त देऊन सहाय्य करीत असे.

विदर्भ देशाचा राजा भिष्मक श्री अंबाजीचा परमभक्त होता. दर पौर्णिमेला तो न चुकतां अंबिकेच्या दर्शनास जात असे. एकदां देवी त्याच्या स्वप्नांत आली आणि म्हणाली, तूं पुत्रप्राप्तीसाठीं मजकडे धांव घेतोस हें मी जाणतें. तुजवर मी आतां प्रसन्न झालें आहे पण तूं आरासूरच्या आसपास एक नगर वसवावें अशी माझी इच्छा आहे. तुझी वंशवृद्धि अवश्य होईल. भीष्मकानें माताजीची आज्ञा शिरसावंद्य केली व शहर वसविलें तेंच आजचें कुंदनपूर होय.

अबू रोड या स्टेशनापासून अंबाजी या ठिकाणीं जाण्यास गाडीच्या वेळेस एस्. टी. च्या बसेस सुटत असतात. यात्रेच्या वेळेस नेहमीपेक्षां जास्त मोटारी सुटतात. अंबाजी गांवापर्यंत चांगला रस्ता आहे. तिथें पोंचण्यास साधारणपणें पाऊणतास मोटारला लागतो. दर पौर्णिमेस येथें गर्दी होते तशी गर्दी वर्षभर चालूच असते. आषाढी, कार्तिकी पौर्णिमेस त्याचप्रमाणें नवरात्रांत अत्यंत गर्दी होते. या ठिकाणीं आज कांहींसा यात्राकर यात्रेकरूला द्यावा लागतो. हें जागृत देवस्थान पूर्वीं दांता संस्थानच्या अधिकाराखालीं होतें तेव्हां दोन रुपये यात्राकर प्रत्येकाकडून वसूल करीत असत तरी सुद्धां श्रद्धाळू यात्रेकरू कोणत्याहि प्रकारें कुरकुर न करतां आनंदानें कर देत असत. संस्थानी लोक देव-धर्माच्या नांवानें अक्षरशः भाविकांना लुटत असत. येथें प्रवाशांना रहाण्यासाठीं धर्मशाळांची सोय आहे. पण त्या सर्वच दृष्टीनीं अत्यंत गैरसोयीच्या आहेत. अंबाजीला जातांना वाटेंत अबू रोड स्टेशनापासून तीन मैलांवर तेलिया नांवाची नदी लागते. ही नदी ओलांडली कीं, दर्शनेच्छूनें तेलकट पदार्थ परत नदीपार करेतोंपर्यंत खायचे नसतात. इतकेंच काय, पण डोक्यावर तेल सुद्धां घालावयाचें नसतें, मग दर्शन घेणारी व्यक्ति स्त्री असो अगर पुरुष असो.

श्री अंबाजी असंख्य भाविकांचें कुलदैवत, घराण्याची कुळदेवता, मुख्य देवता असल्याकारणानें भक्तांनीं केलेले सर्व प्रकारचे नवस फेडण्यासाठीं लोक मोठ्या संख्येनें येथें येतात. विवाहोत्तर सर्व जोडपींच येथें दर्शनाला येतात. बहुतेक सर्व बालकांचे जावळ याच ठिकाणीं करण्यांत येते.

अंबामातेचें मंदिर छोटेसें आणि अगदींच सामान्य प्रतीचें आहे. गाभाऱ्यांत भर दिवसासुद्धां अंधारच असतो. गाभाऱ्यांत देवीचा गळ्याचाच तेवढा भाग दिसतो; व इतर कांहींच दिसत नाहीं. या देवीला अंबाजी, भवानी, शक्ति, आद्यशक्ति, जगदंबा, जगत्‌जननी, अंबाराम, अंबिका, अंबादास या नांवानींहि संबोधलें जातें. ही देवी नवसाला पावते अशी भाविकांची श्रद्धा आहे.

देवीची दरदिवशीं षोडशोपचारें पूजा केली जाते. सकाळीं सात ते साडेसातच्या दरम्यान आरती होते व सुमारें बारा वाजेपर्यंत मंदिर उघडें असतें. नंतर मंदिर नैवेद्य दाखविल्यानंतर जें बंद करतात तें संध्याकाळीं पांच वाजतां उघडतात व रात्रौ साडेसातला पुन्हां आरती होते.

अंबाजी गांवापासून पश्चिमेला दोन मैलांवर गब्बड पर्वत आहे. अंबाजीचें दर्शन घेतल्यावर भाविक या पर्वतावर जातात. तिथें गेल्याशिवाय यात्रा पूर्ण होत नाहीं अशी समजूत आहे. हा डोंगर चढण्यास अवघड असून सुद्धां वयस्कर माणसें बायका-मुलें थेट पर्वतमाथ्यापर्यंत भराभर चढतात. देवीचें हें पूर्वीचें निवासस्थान होय. तेथून देवी रोज सकाळ-संध्याकाळ आरतीच्या जवळ खडकावर पावलासारखा देवीच्या पावलांचा ठसा दिसतो म्हणून सर्व लोक त्याच्यावर लोटांगण घालतात.

अशी आहे ही गुजरातची कुलस्वामिनी देवी अंबाजी आणि अशी आहे तिची ही कथा.

मानसिक साक्षात्काराचा अनुभव सांगणारी संतश्रेष्ठाची महान् कृति

पृष्ठें : ११६४ ] **तुकारामाची गाथा** [ किंमत : रु. ८ पो.: रु २-२५

संपादक : **श्री. अनंत वासुदेव मराठे**

एका साध्या संसारीजनाचा आत्म–साक्षात्कारी संत होण्यापर्यंतचा प्रवास म्हणजे तुकारामाची गाथा. साधक, शंकित व सिद्ध या जीवनांतील तीन अवस्थांत ‘काळोखी रात्र पार करून, अवघीं भूतें साम्या आलीं। देखिलीं म्यां कैक होतीं ॥’ असे साक्षात्कारी उद्गार काढण्यापर्यंत तुकारामांनीं ‘देह जावो अथवा राहो’ या निश्चयानें साधना केली. ‘आपुला आपणाशी संवाद’ अनुभवला! म्हणूनच ‘याति शूद्र वैश्य। केला वेवसाय–’ असें असलें तरी त्यांची गाथा वारकरीपंथास आणि भागवतधर्मास तीनशें वर्षें स्फूर्ति देत राहिली. पाइकीचे अभंग, विरण्या यांतून त्यांच्या भावजीवनाचें उत्तम दर्शन होतें. श्रेष्ठ संत आणि संवेदनाशील भावकवि यांच्या अजोड संगमामुळें तुकारामाची गाथा मराठीची गीता ठरली. त्यांच्या समग्र अभंगांची गाथा आम्ही चित्ताकर्षक स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

**या ग्रंथराजाचीं वैशिष्ट्यें :—**

१ पृष्ठसंख्या ११६४.
२ सिंगल डेमी एकअष्टमांश आकाराचा पांढरा शुभ्र कागद.
३ १६ पॉईंट टाईप.
४ तुकारामाच्या जीवनांतील मार्मिक प्रसंगांचीं ८ रंगीत छायाचित्रें.
५ अभंगाची विषयानुसार वर्गवारी.
६ कठीण शब्दांचे अर्थ.
७ अभंगाच्या आद्याक्षरानुसार अनुक्रमाची पुरवणी.
८ श्री. त्र्यंबक शिवराम भारदे, सभापति, महाराष्ट्र विधानसभा यांचें ‘प्रस्तवन.
९ न्यायमूर्ति राम केशव रानडे, संशोधक श्री. अ. का. प्रियोळकर व श्री. ताम्हणे यांचे पुरस्कार.
१० किंमत फक्त रुपये ८

**प्राप्तिस्थळ : सा हि त्य - र स मा ला**

**बुकसेलर्स आणि पब्लिशर्स**

२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर, मुंबई २

'ज्ञानेश्वर' संतांचे शिरोमणी तसेंच पंतांचे मुकुटमणि

# ज्ञानेश्वरी प्रसाद ( भाग १ )

पृष्ठें : १२०

ले. : न्याय. राम केशव रानडे

मूल्य : रु. ३·५०

न्यायमूर्ति **राम केशव रानडे** यांचीं कांहीं काळापूर्वी तत्त्वज्ञान मंडळ व चित्तपावन संघ यांच्या विद्यमानें गिरगांवांत ज्ञानेश्वरीवर प्रवचनें झालीं त्यापैकीं ज्ञानेश्वरीच्या पहिल्या ते सहाव्या अध्यायावरील प्रवचनांचें हें पुस्तक **'ज्ञानेश्वरी प्रसाद'** ( भाग १ ) या नांवानें नुकतेंच प्रसिद्ध झालेलें आहे.

आधींच ज्ञानेश्वरी हा ग्रंथ इतका रसाळ कीं, त्याची अवीट गोडी चाखावी तेवढी थोडीच वाटते. त्यांतहि न्यायमूर्तींसारखा एखादा विद्वान आपल्या व्यासंगपूर्ण प्रवचनांद्वारा 'ज्ञानियांच्या राजा'चें अमृतभांडार भाविकांना खोलून दाखवूं लागला म्हणजे त्या भावार्थदीपिकेच्या तेजानें सारें आसमंत उजळून निघत असते.

न्यायमूर्तींचीं हीं प्रवचनें प्रत्यक्ष ऐकतांना असंख्य श्रोत्यांना ज्ञानेश्वरीच्या अंतरंगांत प्रवेश करून घेण्याचा जो साक्षात्कार लाभला तोच साक्षात्कार पुस्तकरूपानें सिद्ध झालेल्या या **'प्रसादा'** वरून असंख्य वाचकांना लाभणें सुलभ झालें आहे.

श्री ज्ञानेश्वरांच्या चरित्रासंबंधीहि ग्रंथकारनें निरनिराळ्या उपलब्ध माहितीच्या आधारें या पुस्तकांत विवेचन केलेलें आहे.

दैवी कवित्वशक्ति, अलौकिक उपमा व भाषाविलास आणि भक्तिरसपूर्ण प्रतिपादन याद्वारा ज्ञानेश्वर महाराजांनीं घरोघरीं पहिल्यादांच विश्वबंधुत्वाचा तेजस्वी संदेश पोंचविला. साधुत्व आणि पांडित्य यांचा त्यांच्या ठिकाणीं अद्वितीय संगम झालेला होता. महाराष्ट्रांतील सर्व संतांचे ते जसे शिरोमणी तसेंच मराठींतल्या सर्व पंतांचे-पंडितांचे मुकुटमणि ठरले आहेत. सारांश, ज्ञानदेवांचें व्यक्तित्व, कर्तृत्व आणि कवित्व हाच मुळीं सर्वश्रेष्ठ अलौकिक चमत्कार आहे. त्यापुढें त्यांनीं भाविकांना करून दाखविलेल्या इतर अलोकिक चमत्कारांची काय महति ?

— **महाराष्ट्र टाइम्स** ( ३०–८–६४ )

## सारस्वत ब्राह्मणांसाठीं खास उपयुक्त असें त्यांच्या उपास्यदैवतांसंबंधी माहिती असलेलें पुस्तक

# श्रीमंगेश व शांतादुर्गा

पृष्ठें: ८०

ले. :—अनंत वासुदेव मराठे

मूल्यः रु. १—५०

**म**हाराष्ट्रांतील सारस्वतांची गोमंतकांत खूपच वस्ती आहे. पोर्तुगीजाच्या धार्मिक जांचाला कंटाळून अनेक सारस्वत कुटुंबांनीं गोव्याबाहेर प्रस्थान ठेवलें तरी त्यांच्या कुलदैवतांची स्थानें अढळ राहिलीं. गोमंतकांत सारस्वतांचीं जीं अनेक कुलदैवतें आहेत त्यांत **श्रीमंगेश व शांतादुर्गा** यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. गोमंतकांतील शिवपार्वती स्वरूपी या दोन देवतांचें स्वरूप भाविकजनांना एकत्रित स्वरूपांत देण्याचें कार्य या छोटेखानीं पुस्तिकेनें केलें आहे. यांत दोन्ही देवस्थानांची पौराणिक ऐतिहासिक माहिती देण्यांत आली असून या देवतांभोंवतींच्या 'परिवार देवतांची' हि ओळख करून देण्यांत आली आहे. नित्य उपचारासह उत्सव, पूजा—अर्चनविधि, नित्य नैमित्तिक देवकृत्यें, अन्नसमर्पण व अभिषेक इत्यादिविषयक माहिती सोप्या आणि प्रासादिक भाषेंत दिली आहे.

इष्टदेवतेस आळवून स्वेच्छापूर्वक आशीर्वाद मागण्याची, आपलीं गाऱ्हाणीं देवापुढें मांडून त्यांचा उलगडा करून घेण्यासाठीं जो कौल घेतात त्या संबंधीचीहि माहिती सर्वांना मनोरंजक वाटेल.

— लोकसत्ता (२७—९—६४)

संग्राह्य असें पंचरंगी अष्टविनायकांचें आकर्षक चित्र

## अष्टविनायक

पृष्ठें: ८+६१

लेः सदानंद चेंदवणकर

मूल्यः रु. १-५०

महाराष्ट्राच्या प्रमुख देवस्थानांमध्यें श्री अष्टविनायकांचा समावेश होतो. हीं अष्टविनायकांचीं ठिकाणें मोरगांव, सिद्धटेक, पाली, मढ, थेऊर, लेण्याद्रि, ओझर व रांजणगांव अशीं दूर दूर पसरलेलीं आहेत. गतसालीं गणेशोत्सवांत 'नवशक्ती' तून क्रमशः प्रसिद्ध झालेली ही लेखमाला 'अष्टविनायक' या पुस्तकरूपानें नुकतीच प्रसिद्ध झालेली आहे. या पुस्तकांत अष्टविनायकांच्या स्थानांशिवाय इतर कांहीं महाजागृत गणपति देवस्थानांची माहिती दिली आहे. त्याबरोबरच पौराणिक कथा, देवस्थानांचा इतिहास, तेथें जाण्याचे मार्ग, रस्ते, सुखसोयी वगैरेंची भरपूर माहिती संकलित केली आहे.

आमच्या भारतांत श्री गणपतीची उपासना अगदीं अनादिकालापासून चालू आहे व ही उपासना जे कोणी निष्ठेनें करतील, त्यांच्या मनःकामना पूर्ण होतात, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. त्यांची प्रचीति चिंचवडचे प्रसिद्ध गणेशभक्त श्री मोरया गोसावी, चिंतामण महाराज, थोरले माधवराव पेशवे; हरिपंत फडके, नाना फडणवीस, यांना कशाप्रकारें आली याचें सुरस वर्णन श्री. चेंदवणकर यांनीं केलें आहे.

—रविवार सकाळ (२०-९-६४)

# साहित्य-रस मालेचीं धार्मिक पुस्तकें

१ **गीतकृष्णायन**— रु. १—२५

ले.: म. पां. भावे

२ **तुकाराम गाथा**— रु. ८—००

संपादकः अनंत वासुदेव मराठे

३ **ज्ञानेश्वरी प्रसाद**—( भाग १ ) रु. ३—५०

ले.: न्याय. राम केशव रानडे

४ **अष्टविनायक**— रु. १—५०

ले.: सदानंद चेंदवणकर

५ **श्री मंगेश व शांतादुर्गा**— रु. १—५०

ले.: अनंत वासुदेव मराठे

६ **आमच्या दहा देवता**— रु. २—००

ले.: सदानंद चेंदवणकर

## आगामी प्रकाशनें

१ **ज्ञानेश्वरी प्रसाद**—( भाग २ )

२ **ज्ञानेश्वरी प्रसाद**—( भाग ३ )

ले.: न्या. राम केशव रानडे

## श्री. सदानंद चेंदवणकर यांचीं

# अन्य प्रकाशित पुस्तकें

### १ विमान फिरतें अधांतरी

भारतीय विमान-युगास पन्नास वर्षें पूर्ण झालीं या निमित्तानें विमानांच्या अगदीं सुरुवातीपासून तों आतांपर्यंतच्या ऐतिहासिक घटना कथन करणारें रंजक पुस्तक.

### २ श्री गणेश जन्मकथासार

श्री गणपतीच्या विविध जन्मकथा, गणेशव्रतें, परदेशांतील गणेश-पूजन, हरतालिका, अनंत चतुर्दशी, अष्टविनायक इ. संबंधीच्या मनोरंजक माहितीनें भरगच्च पुस्तक.

### ३ क्रांति विर चंद्रशेखर आझाद

एका उपेक्षित क्रांतिवीराचें खरेंखुरें जीवनदर्शन घडविणारें मराठींतील एकमेव पुस्तक.

### ४ बारा ज्योतिर्लिंगें

भारतांतील बारा ज्योतिर्लिंगांचें सचित्र दर्शन घडविणारें सुंदर पुस्तक.

### ५ ही पहा मुंबई

मुंबापुरीला नव्यानें भेट देणाऱ्या प्रवाशानेंच नव्हे, तर खुद्द मुंबईकरांना सुद्धां भरपूर माहिती देणारा नावीन्यपूर्ण संग्राह्य ग्रंथ.

### ६ मुलांसाठीं विवेकानंद

विवेकानंद जन्मशताब्दीनिमित्त मुलांना स्वामीजींचें चरित्र कथन करणारें उपयुक्त पुस्तक.

### ७ अष्टविनायक

महाराष्ट्रांतील स्वयंभू आठ गणेश-देवस्थानांची माहिती, तिथें जाण्याचे-सुखसोयीचे मार्ग, देवस्थानांच्या कथा इत्यादिसंबंधी भरपूर माहिती असलेलें आणि प्रत्येक गणेशभक्तानें अवश्य संग्रहीं ठेवावें असें पुस्तक.

# श्री. सदानंद चेंदवणकर यांचीं

# अन्य प्रकाशित पुस्तकें

## १ विमान फिरतें अधांतरी

भारतीय विमान-युगास पन्नास वर्षें पूर्ण झालीं या निमित्तानें विमानांच्या अगदीं सुरुवातीपासून तों आतांपर्यंतच्या ऐतिहासिक घटना कथन करणारें रंजक पुस्तक.

## २ श्री गणेश जन्मकथासार

श्री गणपतीच्या विविध जन्मकथा, गणेशव्रतें, परदेशांतील गणेश-पूजन, हरतालिका, अनंत चतुर्दशी, अष्टविनायक इ. संबंधीच्या मनोरंजक माहितीनें भरगच्च पुस्तक.

## ३ क्रांति विर चंद्रशेखर आझाद

एका उपेक्षित क्रांतिवीराचें खरेंखुरें जीवनदर्शन घडविणारें मराठींतील एकमेव पुस्तक.

## ४ बारा ज्योतिर्लिंगें

भारतांतील बारा ज्योतिर्लिंगांचें सचित्र दर्शन घडविणारें सुंदर पुस्तक.

## ५ ही पहा मुंबई

मुंबापुरीला नव्यानें भेट देणाऱ्या प्रवाशानेंच नव्हे, तर खुद्द मुंबईकरांना सुद्धां भरपूर माहिती देणारा नावीन्यपूर्ण संग्राह्य ग्रंथ.

## ६ मुलांसाठीं विवेकानंद

विवेकानंद जन्मशताब्दीनिमित्त मुलांना स्वामीजींचें चरित्र कथन करणारें उपयुक्त पुस्तक.

## ७ अष्टविनायक

महाराष्ट्रांतील स्वयंभू आठ गणेश-देवस्थानांची माहिती, तिथें जाण्याचे-सुखसोयीचे मार्ग, देवस्थानांच्या कथा इत्यादिसंबंधी भरपूर माहिती असलेलें आणि प्रत्येक गणेशभक्तानें अवश्य संग्रहीं ठेवावें असें पुस्तक.

REFBK-0014268